रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक २६० | पृष्ठे १० | RGD/016/2026-28 www.krushival.in

## आता जि.प.,पं.स.मध्येही स्वीकृत सदस्य

**मुंबई :** राज्यातील महापालिका आणि नगरपालिका निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर तेथे स्वीकृत नगरसेवकांची निवड करण्यात आली आहे. संख्याबळाच्या आधारावर पक्षांना हे स्वीकृत नगरसेवकपद मिळाले आहेत. त्यातच, नुकत्याच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकाही पार पडल्या असून, आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्य असणार आहेत. राज्य मंत्रिमंडळात या निर्णयावर शिक्कामोर्तब झाल्याची सूत्रांची माहिती आहे. जिल्हा परिषदेत सदस्य संख्येच्या १० टक्के तर पंचायत समितीत सदस्य संख्येमागे २० टक्के सदस्य निवडता येणार असल्याची माहिती आहे.

•> पान २ वर


# कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी २०२६

किंमत ४ ₹



B.com Receptionst
पाहिजे वयाची अट नाही.
अर्जासह समक्ष भेटा.
साई-इन हॉटेल चोंढी,
अलिबाग-रेवस रोड अलिबाग


### वेधक

## राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदी सुनेत्रा पवार



**मुंबई :** अजितदादांच्या पत्नी तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. पक्षाच्या बैठकीत एकमताने हा निर्णय घेण्यात आला आहे. मुंबईच्या वरळी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन २०२६ आयोजित करण्यात आले होते. यासाठी पक्षाचे सर्व महत्त्वाचे आणि वरिष्ठ नेते तसेच पक्षाचे इतरही काही नेते आणि पदाधिकार उपस्थित होते. यावेळी अधिवेसनात सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला. या प्रस्तावाला सर्वच नेत्यांनी एकमताने सहमती दाखवली. पक्षाचे कार्यकारी अध्ययक्ष प्रफुल्ल पटेल हेच असतील. तर महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी खा. सुनील तटकरे यांच्याकडे असेल.

# अलिबागचे ‘बिग बजेट’

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**शहराच्या सर्वांगीण विकासाचा रोडमॅप समोर ठेवत अलिबाग नगरपरिषदेने २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी १६०.८४ कोटी रुपयांचा विकासाभिमुख अर्थसंकल्प मंजूर केला. गुरुवारी (दि. २६) पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत नगराध्यक्ष अक्षया नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत हा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला. शहरातील रस्ते, सुधारित पाणीपुरवठा योजना, भुयारी गटार, पथदिवे, आरोग्य सेवा, कचरा व्यवस्थापन आदी मूलभूत सुविधांवर विशेष भर देत विकासकामांना प्राधान्य देण्यात आले आहे. विशेष म्हणजे, घरपट्टी व पाणीपट्टी या प्रमुख उत्पन्न स्रोतांमध्ये यावर्षी कोणतीही वाढ न करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

एकूण १६०.८४ •> पान २ वर

**१६०.८४ कोटींचा विकासाभिमुख अर्थसंकल्प मंजूर**

**रस्ते, पाणी, गटार, कचरा व्यवस्थापनावर भरीव तरतुदी**

**करांमध्ये वाढ नाही, नागरिकांना दिलासा**



### विविध विभागांसाठी भरीव निधी

| | |
|---|---|
| कचरा व्यवस्थापन | ३.३ कोटी |
| जंतुनाशक फवारणी | ४२ लाख |
| गटार व नालेसफाई | ५० लाख |
| खड्डे भरणे | २० लाख |
| स्मशानभूमी देखभाल व दुरुस्ती | २० लाख |
| उघडी गटारे बांधकाम | १ कोटी |
| उद्यान देखभाल व दुरुस्ती | ३५ लाख |
| सार्वजनिक स्वच्छतागृह निर्मिती व दुरुस्ती | २० लाख |
| मोकाट कुत्रे नियंत्रण | २० लाख |
| एलईडी पथदिवे | १५ लाख |

### निधीची कमतरता पडू देणार नाही : प्रशांत नाईक

बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांनी अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना सांगितले की, मागील चार वर्षांच्या प्रशासकीय कालखंडानंतर आम्ही लोकप्रतिनिधी म्हणून कार्यभार स्वीकारला आहे. शहरातील प्रलंबित प्रश्न आणि विकासातील बॅकलॉग आम्हाला पूर्णपणे ठाऊक आहे. रस्ते व विशेष रस्ता अनुदानातून मिळणाऱ्या ३ कोटी रुपयांच्या निधीतून शहरातील रस्त्यांची दुरुस्ती आणि मजबुतीकरणाला प्राधान्य दिले जाईल. ते पुढे म्हणाले, शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून राज्य व केंद्र शासनाकडून जास्तीत जास्त भांडवली अनुदान मिळविण्याचा प्रयत्न केला जाईल. शहराच्या विकासासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. नव्याने निवडून आलेल्या सर्व नगरसेवक-नगरसेविकांचे तसेच विरोधी सदस्यांचेही सहकार्य घेऊन अलिबागचा विकास वेगाने करण्याचा आमचा निर्धार आहे.

# श्रीवर्धनमध्ये लसींचा भीषण तुटवडा?



- **मंत्री आदिती तटकरे यांच्या मतदारसंघातच पोलिओ लस गायब**
- **आरोग्य यंत्रणेचा निष्काळजीपणा झाला उघड**

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

पर्यटन, विकास आणि प्रकल्पांच्या गाजावाजात चमकणाऱ्या श्रीवर्धनमध्येच सरकारी आरोग्य व्यवस्थेचा धक्कादायक चेहरा समोर आला आहे. राज्याच्या महिला व बालविकास मंत्र्यांच्या मतदारसंघात एक ते दोन महिन्यांच्या बालकांसाठी अत्यावश्यक असलेल्या पोलिओ आणि रोटा लसी उपलब्ध नसल्याचा गंभीर आरोप पालकांनी केला आहे. ही केवळ तात्पुरती अडचण नसून प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनाचा आणि आरोग्य यंत्रणेतील बेफिकीरीचा थेट पुरावा असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत.

गुरुवारी •> पान २ वर

## तपास योग्य दिशेने सुरू : रामानंद

**पुणे :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूच्या अनुषंगाने गुन्हे अन्वेषण विभाग अर्थात सीआयडीकडे वर्ग करण्यात आलेल्या प्रकरणाबाबतीत आम्हाला काही महत्त्वाचे पुरावे मिळाले आहेत. तपास अतिशय योग्य पद्धतीने सुरू आहे. अपघातामागे गुन्हेगारी कट आहे का? अकस्मित मृत्यूमागे घातपात आहे का? अशा दिशेने तपास सुरू असल्याची माहिती राज्य गुन्हे अन्वेषण विभागाचे अप्पर पोलीस महासंचालक सुनील रामानंद यांनी दिली. पुण्यात पत्रकार परिषदेत ते बोलत होते. अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूचा तपास सीआयडीकडून व्हावा, अशी मागणी पवार कुटुंबाने केली होती.

# आझाद मैदानावर धरणे आंदोलन

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिबांचे नाव देण्याची मागणी**

**। रसायनी । प्रतिनिधी ।**



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे, या मागणीसाठी सर्वपक्षीय कृती समितीने आझाद मैदान येथे धरणे आंदोलन केले. गेल्या चार वर्षांपासून या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असून, राज्य सरकारने केंद्राकडे नावाबाबत प्रस्ताव पाठविल्यानंतरही त्यावर सकारात्मक निर्णय न झाल्याने प्रकल्पग्रस्तांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला.

अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी स्थानिक प्रकल्पग्रस्त व भूमीपुत्रांनी आझाद मैदानात एकत्र येत राज्य सरकार व मंत्रिमंडळाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. लवकरच यासंदर्भात मोठे आंदोलन उभारण्यात येणार असून, पुढील रणनीती जाहीर केली जाईल, असे कृती समितीच्या नेत्यांनी सांगितले.

यावेळी कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, भूमीपुत्र नेते तथा खासदार बाळ्या मामा म्हात्रे, कृती समिती सदस्य व राष्ट्रवादी (शरद पवार गट) प्रदेश सरचिटणीस संतोष घरत, पनवेलचे उपमहापौर जगदीश गायकवाड आदींनी मनोगत व्यक्त केले. आंदोलनात मुंबई व रायगड जिल्ह्यातील आगरी-कोळी बांधवांसह विविध समाजघटकांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सरकारने दिबांच्या नावाचा तात्काळ निर्णय न घेतल्यास उग्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

# घोटभर पाण्यासाठी आदिवासींचा एल्गार

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

पनवेल तालुक्यातील घेरावाडी आणि कोरळवाडी या आदिवासी वाड्यांमध्ये जलजीवन मिशनअंतर्गत लाखो रुपयांचा निधी मंजूर होऊनही प्रत्यक्षात पाणीपुरवठा सुरू न झाल्याने संतप्त आदिवासी समाज आता थेट आंदोलनाच्या मार्गावर उतरला आहे. घोटभर पाण्यासाठी एकवटलेल्या ग्रामस्थांनी अलिबाग येथील जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे. सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारपासून हा लढा छेडण्यात आला असून, महिला, पुरुष आणि लहान मुलेही या आंदोलनात सहभागी झाली आहेत.

पनवेल परिसरात•> पान २ वर



- **जलजीवन मिशनचा दिखावा**
- **पनवेलजवळील वाड्या तीन वर्षांपासून तहानलेल्या**
- **जिल्हा परिषद कार्यालयासमोर बेमुदत उपोषण**

> **जलजीवन मिशन अंतर्गत मंजूर ७३ लाखांच्या योजनेत सिडकोच्या लाईनला कनेक्शन देण्यात आले असून, गावापर्यंत पाईपलाईन टाकण्यात आली आहे. मात्र, काही भाग वनक्षेत्रात येत असल्याने परवानगी उशिरा मिळाली. तसेच टाकलेली पाईपलाईन काही ठिकाणी डॅमेज झाल्याचे निदर्शनास आले आहे. ठेकेदाराला आतापर्यंत सुमारे १५ लाख रुपये अदा करण्यात आले असून, उर्वरित रक्कम मिळाल्यानंतर काम पूर्ण करण्यात येईल, असे ठेकेदाराने कळवले आहे. पाईपलाईनमधील गळती दुरुस्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, हे काम पूर्ण करण्यासाठी सुमारे पाच दिवस लागतील. त्यानंतर पाणीपुरवठा सुरळीत करण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असे त्यांनी नमूद केले आहे.**
> **– मोहन सरोदे,** कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, राजिप

## विनयभंगप्रकरणी सक्तमजुरीसह दंड

**पनवेल :** दहा वर्षीय मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी स्कूल व्हॅन चालक सागर भारत चव्हाण (रा. मोठा खांदा, सेक्टर १८) यास विशेष न्यायालयाने दोषी ठरवत शिक्षा सुनावली. न्यायालयाने पोक्सो कायदा कलम ८ अंतर्गत तीन वर्षे सक्तमजुरी व पाच हजार रुपये दंड, तसेच पाच वर्षे सक्तमजुरी व पाच हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली. २०२३ मध्ये घडलेल्या या घटनेत आरोपीने शाळेत जात असलेल्या पीडित मुलीला पुढील सीटवर बसण्यास सांगून तिच्याशी गैरवर्तन केले होते. पनवेल येथील विशेष न्यायालयात सुनावणीदरम्यान सहा साक्षीदारांची तपासणी करण्यात आली. विशेष सरकारी वकील प्रतीक्षा वडे-वारंगे यांनी सरकार पक्षाची बाजू मांडली.

# माची प्रबळगड दरीत तरुणीची आत्महत्या

**■ पोलिसांनी मृतदेह बाहेर काढला**

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

घरगुती कारणातून एका तरुणीने पनवेल तालुक्यातील माची प्रबळगडाच्या दरीत उडी मारून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. स्थानिक नागरिकांच्या मदतीने पनवेल तालुका पोलिसांनी दुर्गम दरीतून तिचा मृतदेह बाहेर काढला.

पोयंजे बीट येथील पोलिसांना एका महिलेने गडाच्या टोकावरून उडी मारल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सहाय्यक फौजदार मिस्त्री, पोलीस शिपाई जाधव व पोलीस उपनिरीक्षक हर्षल राजपूत हे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली घटनास्थळी दाखल झाले. प्रारंभी कोणतीही व्यक्ती दिसून न आल्याने पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीने शोधमोहीम राबवली.

दरम्यान, गडाच्या सुमारे १२०० मीटर खोल दरीत एक महिला पडलेल्या अवस्थेत आढळली. अत्यंत दुर्गम, निसरड्या व खडकाळ मार्गामुळे दोरीच्या सहाय्याने खाली उतरून तिला वर आणण्यात आले. तात्काळ रुग्णालयात हलविण्यात आले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तिला मृत घोषित केले. मृत तरुणीचे नाव प्रीती सिंग (रा. सेक्टर १२, कोपरखैरणे, नवी मुंबई) असे असून, घरगुती कारणामुळे तिने आत्महत्या केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

# महिलेचा खून करून मृतदेह जाळला

**■ आंबेनळी घाटातील घटनेने पोलादपूर हादरले**

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

आंबेनळी घाटात अज्ञात महिलेचा खून करून तिचा मृतदेह जाळल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून, संपूर्ण पोलादपूर तालुका हादरला आहे. पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह ज्वलनशील पदार्थ टाकून जाळण्यात आल्याची प्राथमिक शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. घाट परिसरात दुर्गंधी पसरल्यानंतर हा प्रकार समोर आला.

पोलादपूर तालुक्यातील बावळीटोकच्या खाली, चिरेखिंड गावाच्या वरच्या बाजूला मुख्य घाटरस्त्यालगत कॉंक्रिटच्या भिंतीतील मोरीच्या पाईपामध्ये जळालेल्या अवस्थेत महिलेचा मृतदेह आढळून आला. रस्त्याच्या कामावर असलेल्या कामगारांना दुर्गंधी आल्याने त्यांनी शोध घेतला असता हा प्रकार उघड झाला. याबाबत साईट सुपरवायझर अजित नथुनसाहा गुप्ता (वय २७, सध्या रा. कापडे बुद्रुक, ता. पोलादपूर, जि. रायगड; मूळ रा. सुकरवलिया, ता. इटाठी, जि. बकसर, बिहार) यांनी पोलादपूर पोलिसांत फिर्याद दिली.

माहिती मिळताच पोलादपूर पोलीस ठाण्याचे अधिकारी व महिला पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पाहणीत अज्ञात आरोपीने महिलेचा खून करून तिची ओळख पटू नये व पुरावा नष्ट व्हावा यासाठी मृतदेह जाळल्याचे दिसून आले. घटनास्थळी पंचनामा करण्यात आला असून, फॉरेन्सिक पथकानेही तपासणी केली आहे.

मृत महिलेच्या पायात चांदीची जोडवी आणि हाताच्या बोटात पिवळ्या धातूची अंगठी असल्याचे निदर्शनास आले. मृतदेह जळालेल्या अवस्थेत ताठर झालेला असल्याने जाळण्यापूर्वीच खून झाल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

याप्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल व अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू असून, श्रीवर्धन उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी परिसरातील

•> पान २ वर

## सासरच्या छळाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या; चौघांविरुद्ध गुन्हा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

सासरच्या मंडळींकडून होत असलेल्या कथित मानसिक व शारीरिक छळाला कंटाळून ३८ वर्षीय विवाहितेने आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. पुष्पा सतीश शिरोळे (रा. कामोठे) यांनी १६ फेब्रुवारी रोजी कुलाबा येथे समुद्रात उडी मारून जीवन संपविले. याप्रकरणी कामोठे पोलिसांनी सासू, नणंद व दोन दिरांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.



पतीच्या जून २०२३ मधील निधनानंतर विमा रक्कम व मालमत्तेच्या वादातून सासरच्या मंडळींकडून पैशांची मागणी व त्रास दिला जात असल्याचा आरोप आहे. या संदर्भात त्यांनी यापूर्वी तक्रारही केली होती. १६ फेब्रुवारी रोजी घरातून बाहेर पडल्यानंतर त्या बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली होती. दुसऱ्या दिवशी त्यांचा मृतदेह कुलाबा परिसरात आढळून आला. मृत महिलेचे भाऊ गणेश हाडवळे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

**मयांक गांधी यांचे परखड मत | नेरळमध्ये ३३ एसआरटी शेतकरी, १७ शेती शाळांचा सन्मान**

# महासत्तेचे स्वप्न जमिनीशिवाय अशक्य

**। संतोष पेरणे ।**

**। नेरळ ।**

देशाला आर्थिक महासत्ता बनवायचे असेल तर जमिनीशी नाळ जोडावी लागेल. जमीन आणि पाणी या मूलभूत संसाधनांकडे दुर्लक्ष करून केवळ मोठ्या घोषणा करून चालणार नाही. जमीन कमी होत आहे, पाण्याची टंचाई वाढत आहे, अशा परिस्थितीत जगातील तिसरी-चौथी महासत्ता बनण्याची स्वप्ने दाखवली जात असतील तर ती स्वप्नेच राहतील, असे परखड मत ग्लोबल विकास ट्रस्टचे प्रमुख मयांक गांधी यांनी व्यक्त केले.



### एसआरटी पुरस्कार प्राप्त शेतकरी

केशव गिराम (परभणी), परशुराम आगिवले (कर्जत), गोपाल झगडे (रत्नागिरी), रामचंद्र पुंड (छ. संभाजीनगर), दीपक जोशी (जालना), मीरा काळे (अहिल्यानगर), निलेश पानसरे (नाशिक), शंकर गायकवाड (नाशिक), डॉ. गणेश पोटे (जालना), प्रकाश खोब्रागडे (चंद्रपूर), दिनकर काळे (यवतमाळ), उमेश पोहदरे, अरुण तांडेल, रामचंद्र हाबळे (कर्जत, रायगड), डॉ. एस. डी. सोमवंशी (जालना), किशोर जैन (जालना), वामन कडाळी (बीड), शिवाजी बादाडे, विलास झुंजारराव (ठाणे), उषा देवरे (जळगाव), सुरेश नरवडे (संभाजीनगर), स्वप्नील महाजन (बुलढाणा), अभिनंदन सौंदते (कोल्हापूर), विद्याधर शिंदे (सातारा), राजाभाऊ देशमुख (वर्धा), पंकज देसले (नंदुरबार), महारू जाधव (नाशिक), किर्ती नगरे (नाशिक).

नेरळजवळील सगुणाबाग (ता. कर्जत, जि. रायगड) येथे स्वातंत्र्यसैनिक हरिभाऊ भडसावळे यांच्या जयंतीनिमित्त सगुणा रुरल फाउंडेशनतर्फे आयोजित एसआरटी (सगुणा राईस टेक्निक) शेतकरी सन्मान सोहळ्यात ते बोलत होते. या कार्यक्रमात महाराष्ट्रासह इतर राज्यांतील एसआरटी पद्धतीने शेती करणाऱ्या ३३ शेतकऱ्यांचा तसेच राज्यातील १७ ठिकाणी शेती शाळा चालवणाऱ्या १७ शेतकऱ्यांचा गौरव करण्यात आला.

> एसआरटी हे फळझाडांसह विविध पिकांमध्ये प्रभावी ठरत आहे. या तंत्रामुळे केवळ उत्पादन वाढत नाही, तर एक शेतकरी दुसऱ्या शेतकऱ्याला सक्षम बनवतो. शेखर भडसावळे यांच्या माध्यमातून हे पर्यावरणपूरक तंत्रज्ञान सर्वांपर्यंत पोहोचत आहे. एआय आणि शेती यामध्ये स्पर्धा नसून हे तंत्रज्ञान शेतीसाठी पूरक ठरणार आहे.
> – अंकुश माने, कृषी संचालक, महाराष्ट्र

मयांक गांधी म्हणाले, जमीन आपल्याला जगाचा महासत्ता बनवू शकते. मात्र, त्या

•> पान २ वर

# सुनंदा पवार यांचे निधन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षिका सुनंदा सखाराम पवार (आक्का) यांचे बुधवारी (दि.२५) सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. निधनसमयी त्या ८९ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, मुलगी, सुना, जावई नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. प्रभाकर पाटील सांस्कृतिक मंचाचे अध्यक्ष सखाराम पवार यांच्या त्या पत्नी, जिल्हा सरकारी वकील ॲड. संतोष पवार, अलिबागचे माजी नगरसेवक उमेश पवार तसेच उदय पवार यांच्या मातोश्री होत.



सुनंदा पवार या उत्तम गृहिणी होत्या. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षिका होत्या. असंख्य विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम त्यांनी शिक्षक म्हणून केले. ज्या काळात स्त्री शिक्षणाची वाट बिकट होती, सामाजिक रुढींचे अडथळे पावलोपावली होते, अशा काळात आपल्या जिद्दीने शिक्षिका बनून समाजाला ज्ञानाचा प्रकाश देण्याचे काम त्यांनी खंबीरपणे केले. अलिबागमधील जुनी पोस्टाची गल्ली मयेकरवाडीसमोर राहत्या घरी बुधवारी (दि.२५) सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास त्यांचे निधन झाले. रामनाथ येथील स्मशानभूमीत दुपारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी अलिबागचे वीज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक, अलिबागच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, ॲड. प्रवीण ठाकूर, ॲड. उमेश ठाकूर, चेतन पाटील, ज्येष्ठ पत्रकार उमाजी केळुसकर, आर. के. घरत, श्रीरंग घरत, शरद कोरडे, नंदू तळकर, सत्यजीत दळी, ॲड. राजेंद्र जैन, विनोद टेबुर्लेकर, हेमकांत सोनार, पंत भक्त मंडळाचे सदस्य, मराठा समाजाचे ज्येष्ठ मंडळी तसेच वाघोडे येथील ग्रामस्थ, नातेवाईक यांनी उपस्थित राहून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यांचा दशक्रिया विधी आणि उत्तरकार्य शुक्रवारी (दि.६) होणार असल्याची माहिती पवार कुटुंबियांकडून देण्यात आली.

पान १ वरून

# आता जि.प.,पं.स.मध्येही स्वीकृत सदस्य

राज्य मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार, जिल्हा परिषदेत सदस्य संख्येच्या १० टक्के, तर पंचायत समितीत सदस्य संख्येमागे २० टक्के सदस्य निवडता येणार असल्याची माहिती आहे. किमान ५ सदस्य निवडणे बंधनकारक असणार आहे. यासंदर्भात लवकरच विधिमंडळात कायदा पारीत केला जाणार असल्याची माहिती आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्वीकृत सदस्यसंदर्भात मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली होती.

# अलिबागचे 'बिग बजेट'

कोटींच्या अंदाजपत्रकात सुमारे ११० कोटी रुपये भांडवली अनुदानातून प्राप्त होणार असून, कर व इतर महसुलातून अंदाजे ३० कोटी रुपये मिळण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. विविध अत्यावश्यक खर्च व विकासकामांवर १६०.७४ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, दहा लाख रुपये शिलकी ठेवत संतुलित अंदाजपत्रक सादर करण्यात आले आहे. घरपट्टी व पाणीपट्टीमध्ये मोठ्या प्रमाणावर थकबाकी असून, त्यात शासकीय देयकांचे प्रमाणही लक्षणीय आहे. या थकबाकी वसुलीसाठी कठोर पावले उचलण्याच्या सूचना सदस्यांनी सभागृहात मांडल्या.

**पाणीपुरवठा आणि गटार योजनांवर मोठा भर**

मुख्याधिकाऱ्यांनी सभागृहात स्पष्ट केले की, शहरातील पाणी योजनेवरील खर्च हा उत्पन्नापेक्षा अधिक आहे. त्यामुळे ही तूट भरून काढण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांची गरज आहे. भुयारी गटार योजना व वाढीव पाणीपुरवठा योजनांसाठी एकूण ५८ कोटी रुपयांचा निधी अपेक्षित असून, या प्रकल्पांमुळे शहरातील पाणीपुरवठा आणि मलनिस्सारण व्यवस्था अधिक सक्षम होईल.

**पर्यटन आणि सौंदर्यीकरणासाठी विशेष तरतुदी**

नमो उद्यान आणि वैशिष्ट्यपूर्ण कमान प्रकल्पासाठी ४० कोटी रुपयांचा निधी अपेक्षित आहे. हिराकोट तलाव परिसरात नमो उद्यानाची निर्मिती करण्यात येणार असून, शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे. याशिवाय कंटेनर ॲक्वेरियम (मत्स्यालय) हा पर्यटनवृद्धीचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्णत्वास नेण्याचे नियोजन आहे. सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या समाधीच्या सुशोभीकरणासाठी १ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, ही या अर्थसंकल्पातील महत्त्वाची बाब असल्याचे नगराध्यक्षांनी नमूद केले.

तसेच जिल्हा अंतर्गत ३ कोटी, नागरी सेवा सुविधा २ कोटी, स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत २ कोटी, पंधरावा वित्त आयोग १ कोटी, दलित वस्ती २० लाख, अल्पसंख्याक कामांसाठी २० लाख आणि बचतगट भवनासाठी २ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मागासवर्गीय दुर्बल घटक, महिला व बालकल्याण आणि अंध-दिव्यांगांसाठी प्रत्येकी २५ लाख रुपयांचा निधी राखून सामाजिक बांधिलकीही जपण्यात आली आहे.

या सर्वसाधारण सभेत सर्व सभापती, नगरसेवक व सदस्यांनी चर्चेत सक्रिय सहभाग घेत विविध सूचना मांडल्या. विकासकामांना चालना देणारा आणि करभार वाढ न करता शहराचा पाया मजबूत करण्याचा प्रयत्न करणारा हा अर्थसंकल्प असल्याचे सभागृहात मत व्यक्त करण्यात आले.

# श्रीवर्धनमध्ये लसींचा भीषण तुटवडा?

लसीकरण, पण लसच नाही!

दर गुरुवारी नियमित लसीकरणाचा दिवस ठरलेला असतानाही सरकारी दवाखान्यात पोलिओ आणि रोटा लस उपलब्ध नसल्याचे पालकांना सांगण्यात आले. दुर्गम भागांतून लहान बाळांना घेऊन आलेल्या मातांना "लस नाही" असे सांगून परत पाठवण्यात आल्याने संतापाची लाट उसळली आहे. एकाच वेळी दिले जाणारे डोस तीन वेगवेगळ्या दिवशी घ्यावे लागणे ही केवळ गैरसोय नाही, तर व्यवस्थेतील नियोजनशून्यता आणि पुरवठा साखळीतील गंभीर त्रुटींचा नमुना असल्याचे बोलले जात आहे.

स्थानिक डिजिटल क्रिएटर पूजा पोरनाक पाटील यांनी सोशल मीडियावर आपला अनुभव मांडत प्रशासनाला थेट जाब विचारला आहे. १२ तारखेला १.५ महिन्यांच्या बाळाला लसीकरणासाठी नेले असता रोटा व पोलिओ लस उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले. सतत पाठपुरावा केल्यानंतर १७ तारखेला रोटा लस देण्यात आली, तर २५ तारखेला पोलिओ लस देण्यात आली. बालकांच्या आरोग्याशी संबंधित इतक्या संवेदनशील बाबतीत असा विलंब होणे हे निष्काळजीपणाचे ठळक उदाहरण असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे.

**पोलिओचा मुद्दा हलक्यात घेण्यासारखा नाही**

पोलिओ ही लस बालकांना आयुष्यभराच्या अपंगत्वापासून संरक्षण देते. तिचे वेळेवर डोस देणे अत्यंत आवश्यक मानले जाते. अशा लसीचा तुटवडा म्हणजे थेट बालकांच्या आरोग्याशी खेळ असल्याचा आरोप होत आहे. पर्यटन विकास, पायाभूत सुविधा आणि मोठ्या प्रकल्पांची चर्चा होत असताना, मूलभूत आरोग्य सेवा कोलमडत असतील तर त्या विकासाच्या दाव्यांना काय अर्थ उरतो, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

**मंत्र्यांनी तातडीने उत्तर द्यावे**

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या मतदारसंघातच अशी लाजिरवाणी परिस्थिती उद्भवत असेल, तर राज्यातील इतर दुर्गम भागांची अवस्था काय असेल, अशी चर्चा रंगू लागली आहे. बालआरोग्य ही थेट जबाबदारी असताना लसींचा तुटवडा का झाला? दोषी अधिकारी कोण? चौकशी कधी होणार? जबाबदारी निश्चित करून कारवाई होणार का? की हा विषयही इतर आश्वासनांप्रमाणेच विस्मरणात जाणार?

**घोषणा नकोत, हमी द्या!**

रिबन कापून उद्घाटने करण्यापेक्षा जनतेला लस उपलब्ध करून द्या. पोस्टरबाजीपेक्षा बालकांचे आरोग्य सुरक्षित करा. राजकारण कितीही मोठे असले तरी आईच्या हातातील १.५ महिन्याचे बाळ त्याहून मोठे असते.

**आता निर्णय प्रशासनाचा**

चौकशी करून जबाबदारांवर कठोर कारवाई करणार, की पुन्हा एकदा जनतेचा विश्वास गमावणार? हा प्रश्न केवळ आरोग्य व्यवस्थेचा नाही; हा शासनाच्या कार्यक्षमतेचा आणि राजकीय जबाबदारीचा कस लावणारा मुद्दा ठरत आहे.

# घोटभर पाण्यासाठी आदिवासींचा एल्गार

नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. उंच इमारती, मोठे प्रकल्प आणि शहरी विस्तारामुळे मुंबई अक्षरशः पनवेलच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे. मात्र, या विकासाच्या सावलीतच घेरावाडी व कोरळवाडी या वाड्यांतील सुमारे ४०० हून अधिक आदिवासी बांधव आजही पाण्यासाठी वणवण करत असल्याची वस्तुस्थिती समोर आली आहे. दैनंदिन मजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या या कुटुंबांना पाण्यासाठी मैलोनमैल पायपीट करावी लागते. टंचाईग्रस्त वाड्या म्हणून त्यांची ओळख झाली आहे.

जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत जलजीवन मिशन योजना राबविण्यात आली. या योजनेसाठी तब्बल ७३ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला. मात्र, तीन वर्षे उलटूनही काम पूर्ण झालेले नाही. कार्यकारी अभियंता आणि उपअभियंता यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करूनही केवळ आश्वासने देण्यात आली, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. २९ ऑक्टोबर २०२५ रोजी पनवेल उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आदिवासी समाज कुटुंबियांसह उपोषणाला बसला होता. त्यावेळीही लेखी आश्वासने देण्यात आली; परंतु प्रत्यक्षात कामाची गती वाढली नाही. त्यामुळे अखेर संतप्त ग्रामस्थांनी अलिबाग येथे जिल्हा परिषद कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे.

या आंदोलनात सोनाली पवार, प्रगती वाघे, सोनम वाघमारे, संतोष पवार, राजेश वाघे यांच्यासह अनेक आदिवासी महिला आणि त्यांची लहान मुले सहभागी झाली आहेत. "आम्हाला योजना नकोत, पाणी हवे," अशी भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. दररोज पाण्यासाठी होणारी धावपळ, उन्हातान्हात होणारी पायपीट आणि मुलांच्या आरोग्यावर होणारा परिणाम यामुळे महिलांमध्ये तीव्र संताप आहे.

पनवेलसारख्या विकसित होत असलेल्या तालुक्याच्या जवळच आदिवासी वाड्या पाण्यासाठी झगडत असतील, तर जलजीवन मिशनच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. घोटभर पाण्यासाठी सुरू झालेला हा लढा प्रशासनाला जाग आणणार का, की पुन्हा एकदा आश्वासनांच्या पोकळ शब्दांवरच थांबणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# महासत्तेचे स्वप्न जमिनीशिवाय अशक्य

जमिनीवर काम करण्याची तयारी असली पाहिजे. पाण्याची कमतरता किती गंभीर आहे, याची जाणीव धोरणकर्त्यांना नसल्यास भविष्यात मोठे संकट उभे राहील. जमीन आणि पाणी हीच खरी आर्थिक स्रोत आहेत. त्यांची घट होत असताना केवळ घोषणांनी विकास साध्य होणार नाही.

ते पुढे म्हणाले, आम्ही पाच हजार गावांमध्ये काम करत असून सुमारे ३० हजार शेतकरी आमच्यासोबत जोडले गेले आहेत. काही गावांमध्ये वार्षिक उलाढाल ३८ हजारांवरून ३ लाख ९० हजारांपर्यंत वाढली आहे. नीती आयोगानेही या उपक्रमाची दखल घेतली आहे. लहान शेतकऱ्यांना एकत्र करून समूहशेतीच्या माध्यमातून मोठे उद्दिष्ट समोर ठेवले, तर गावांचा आणि शेतकऱ्यांचा कायापालट होऊ शकतो. देशातील २३ ठिकाणी गावांना एकत्र करून अधिक नफ्याचे मॉडेल उभे केले आहे. परळी व पालघर परिसरात झालेले बदल पाहण्यासाठी या आणि अनुभव घ्या, असे आवाहन त्यांनी केले.

या सोहळ्यास ग्लोबल विकास ट्रस्टचे प्रमुख मयांक गांधी, कंट्रोल इंडिया युनियनच्या चिन्मयी देऊळगावकर, कृषी संचालक अंकुश माने, विभागीय सहसंचालक आमले, कृषीरत्न शेतकरी शेखर भडसावळे, अनुराधा भडसावळे आदी उपस्थित होते. या सन्मान सोहळ्याने शाश्वत शेती, समूहशेती आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्रामीण भागात परिवर्तन घडवण्याचा संदेश दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शेखर भडसावळे यांनी केले, तर सूत्रसंचालन दिपाली केळकर यांनी केले. आयोजनात अनुराधा भडसावळे, अनिल निवळकर, परशुराम आगिवले, संध्या देवस्थळे, शरद वागळे, प्रमोद शिंदे, निलेश मानकर यांचा सहभाग होता.

# महिलेचा खून करून मृतदेह जाळला

सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे. रायगड, रत्नागिरी व पुणे जिल्ह्यांतील बेपत्ता महिलांच्या तक्रारींचाही आढावा घेतला जात आहे. मोबाईल लोकेशन आणि इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास सुरू आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास सहायक पोलीस निरीक्षक आनंद रावडे करत आहेत. दरम्यान, गेल्या वर्षी कशेडी घाट परिसरातही अशाच प्रकारे एका व्यक्तीचा खून करून मृतदेह टाकून दिल्याची घटना घडली होती. त्या प्रकरणात पोलादपूर पोलिसांनी दोन महिन्यांच्या तपासानंतर आरोपींना अटक केली होती. त्यामुळे या प्रकरणाचाही छडा लवकर लागेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. आंबेनळी घाट, कशेडी घाट आणि डोंगरदऱ्यांच्या परिसरात वारंवार अशा घटना घडत असल्याने कायमस्वरूपी गस्तीपथक व सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. बुधवारी सकाळी उघडकीस आलेल्या या घटनेमुळे तालुक्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या छायाचित्रांमुळे संताप आणि हळहळ व्यक्त केली जात आहे.


**PRABHAKAR PATIL EDUCATION SOCIETY**

Teaching and Non Teaching Staff Required

Prabhakar Patil Education Society is one of the leading Education society, working since 2001. We run various English-medium schools (affiliated with CBSE and the State Board) located at Veshvi (Alibag), Nagaon, Sambari (Kurdus), Vavoshi and Khalapur.

**Requirement :** Teachers for Pre-Primary, Primary and Secondary Sections and Clerks.

**Subjects:** English, Mathematics, Science, Social Studies, Sanskrit, French, Drawing, Physical Education (P.T.), Karate, Marathi, Hindi.

**Qualification for Teachers :** Post Graduates or Graduates with M.Ed., B.Ed., D.Ed., ECCED, M.P.Ed., or B.P.Ed.

**Qualification for non Teaching :** Post Graduates or Graduates with excel and accounting experience of minimum 2 years

**Note:** Fluency in English is mandatory.

**Salary Scale:**

Teachers: Upto 30,000 per month,

Clerks : Upto 25,000 Per month.

(Salary will be commensurate with experience and qualifications.)

**For More Details Please Contact & Apply On:**

Rajashree Patil – 9892150116

Email: pnp.rajashree@gmail.com

Ankit Bhanushali – 9823897088

Email: ankitbhanushali02@gmail.com

**Interview Date :-** 6th March 2026

Timing :- 12 p.m. to 4 p.m

Venue :- PNP Education Society's Central office, Opposite Durg Suruchi Vada, Veshvi, Alibag, 402201


प्रो. फी जमा — अर्जदाराची वकील आझमा कुरेशी

**जाहिर नोटीस**

**अलिबाग येथील मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर यांचे न्यायालयात.**

जिल्हा : रायगड.

दिवाणी चौकशी अर्ज क्र. : १४०/२०२५

इब्राहिम हुसेनमिया लालछडी
वय ७१ वर्षे, धंदा-काहीनाही
राहणार- मु. शेखाचेगाव, पो. नारंगी
ता. अलिबाग, जिल्हा. रायगड
पिन नं-४०२२०९ ... अर्जदार

विरूद्ध

१. जीनतबी सईद अहमद खान
वय ७५ वर्षे, धंदा-गृहिणी-
राहणार- ओपन प्लॉट नं.७,
आर, रुम नं ७५९
भारतनगर रोड, बांद्रा ईस्ट,
मुंबई- ४०००५१ ...सामनेवाला
२. कैसर मो.युसुफ बागबान
वय ७३ वर्षे, धंदा-गृहिणी
राहणार- ओपन प्लॉट नं.७, आर रुम नं ७५७
भारतनगर रोड, बांद्रा ईस्ट, मुंबई- ४०००५१
ता. अलिबाग, जिल्हा, रायगड

या जाहिर नोटीसने तमाम लोकांस कळविण्यात येते की,

पै. हुसेनमीया युनूसमीया लालछडी यांना अर्जदार व सामनेवाला व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. त्याकरीता अर्जदार हेच पै. हुसेनमीया युनूसमीया लालछडी यांचे पश्चात त्यांना व त्यांचे अर्जातील नमुद मिळकतीला कायदेशीर वारस आहेत असा 'वारस दाखला' मिळण्याकरीता सदरचा चौकशी अर्ज दाखल केलेला आहे. पै. हुसेनमीया युनूसमीया लालछडी यांची मौजे शेखाचेगाव तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे स्थावर मिळकत आहे. सदरहु मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | मौजे | मालमत्ता क्र. | क्षेत्रफळ चौ.फु./ चौ.मि. |
|---|---|---|---|
| १ | शेखाचेगाव, ता. अलिबाग | १४१ | १९७६<br>१८३.६४ |

अर्जदार यांच्या हक्काबद्दल कोणालाही व्यक्तीगत हरकत करावयाची असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून वर नमूद मा. न्यायालयात एक महिन्याच्या आंत हजर राहून आपल्या हरकती घ्यावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहिर करण्यात येते की, वर नमूद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मा. न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्कांबद्दल पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करील व कै. विजय शांताराम आंबेरकर यांचे वारसपत्रास अर्जदार हक्कदार आहेत असे शाबीत झाल्यास त्यांना 'वारस दाखला' मंजूर करील.

सदरची नोटीस आज दिनांक माहे सन २०२५ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**कनिष्ठ लिपिक,** दिवाणी न्यायालय, व-स्तर, अलिबाग जि. रायगड.

**सहाय्यक अधीक्षक,** दिवाणी न्यायालय, व-स्तर, अलिबाग जि. रायगड.

# पाच लाख रुपयांची चोरी

**। पनवेल । प्रतिनिधी।**

राहत्या घरातून पाच लाख रुपये चोरून नेल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात अनोळखी इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. वर्षा तांबे या सेक्टर १६, खारघर येथे राहात असून, त्या वॉकिंगसाठी गेल्या. घरात दोघेजण असल्याने त्यांनी दरवाजा उघडा ठेवला. पावणेआठ वाजता त्या वॉकिंग करून घरी परत आल्या. यावेळी घरातील कपडे अस्ताव्यस्त पडलेले दिसले. त्यांनी कपाटात ठेवलेली रोख रक्कम चेक केली. यावेळी पाच लाख रुपये दिसून आले नाहीत. अनोळखी इसमाने ते चोरून नेले. याबाबत खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, तपास सुरू आहे.

जा.क्र. ४६६/२६
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
कल्पतरु इमारत, पोस्ट ऑफिसजवळ,
अलिबाग, जि. रायगड
दि.२६/०२/२६

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक : ६१/२०२६

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक : ''मारुती देव विश्वस्त मंडळ कामथ'' मु.पो. कामथ, पो. किहीम, ता. अलिबाग, जि. रायगड

श्री. संजय दत्तात्रय पुरव .... अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग, अलिबाग हे वर नमूद केलेल्या नोंदणी अर्ज याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत.

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय? २) खाली नमुद केलेली स्थावर/जंगम मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**(अ) जंगम मिळकत वर्णन**

| अ.क्र. | तपशील | नग | अंदाजे किंमत (₹) |
|---|---|---|---|
| १ | मुकुट सोन्याचा मुलामा दिलेले | १ | ६५,०००/- |
| २ | पितळी समई | ३ | २०००/- |
| ३ | पितळी घंटा | २ | १,५००/- |
| ४ | तांब्याचा ताट | १ | ५००/- |
| ५ | तांब्याचा तांब्या | १ | ५००/- |
| ६ | टेबल | १ | १,५००/- |
| ७ | खुर्च्या | २ | ५००/- |
| ८ | लहान निरांजन | ३ | ५००/- |
| ९ | स्टिल ग्लास | २ | २००/- |
| १० | स्टिलचे तांबे | २ | ३००/- |
| ११ | पितळी पंचपाळ | १ | २००/- |
| १२ | खुर्ची | २ | ५००/- |
| १३ | टेबल | १ | ७००/- |
| १४ | कपाट | १ | ३०००/- |
| १५ | ट्यूब लाईट | २ | ४००/- |
| | | एकुण | ७६,३००/- |

(ब) खाली नमुद केलेली स्थावर मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

स्थावर मिळकत : (वर्णन )

| अ. क्र. | गावाचे नाव | भुमापन/ गट क्र. | क्षेत्र (हे.आर.) | (पो. ख.) | आकार | किम्मत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | चोंढी | १७१ | ००-०३-५० | ०-००-५० | ०-३८ | ६ लाख |
| २ | कामथ | ५०२ | ००-०३-३० | --- | ०.५१ | ५ लाख |
| ३ | कामथ | १९४ | ००-०६-३० | --- | १.२५ | ९ लाख |
| ४ | कामथ | २७२ | ००-०३-१० | ०.००.२० | ०.५६ | ५ लाख |
| ५ | कामथ | २५५ | ००-०७-३० | ०.००.५० | १.६९ | १० लाख |
| | एकूण रक्कम रुपये | | | | | ३५ लाख |

मौजे कामथ ता. अलिबाग जि. रायगड येथील गट क्र. २७२ मधील ७/१२ प्रमाणे क्षेत्र ०-०३-१० पो. ख. ०-००-२० मधे असलेले मौजे ग्रुप ग्रामपंचायत किहीम, ता. अलिबाग येथील मालमत्ता क्र. ३२, मध्ये बांधलेले ७१५ चौ. फूट. क्षेत्रफळ असलेले दगड, माती, विटां मध्ये बांधलेली पत्र्याचे श्री मारुती मंदिर.

चतुर्सिमा :

| | | |
|---|---|---|
| १ | पुर्वेस | रस्ता |
| २ | पश्चिमेस | श्री. श्रीधर शंकर काठे यांचे घर |
| ३ | दक्षिणेस | समाज मंदिर (सभागृह) |
| ४ | उत्तरेस | रस्ता |

सदरच्या नोंदणी प्रकरणामध्ये हरकत घ्यावाची असेल अगर त्यांनी त्याची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहिनिशी व मी सहायक धर्मादाय आयुक्त रायगड अलिबाग यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक २६/०२/२०२६ रोजी दिली.

सही/-
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
रायगड विभाग, रायगड-अलिबाग

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. रजपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री.अरूण वसंत घाग यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| ३२ | १२ | १-१०-०० | १-०० |

**वरील जमिन मिळकतीमध्ये जमिन मालक यांचे मालकीचे असलेले क्षेत्र ०-७०-० हे. आर. पॉ विकत देत आहेत.**

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक: २७/०२/२०२६

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस-कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

ॲड रोशन रविंद्र पाटील
जिल्हा न्यायालय अलिबाग रायगड
मोबाईल नं. ८८३०४५४२१७

**जाहीर सूचना**

सर्व संबंधित व्यक्ती, आणि हितधारकांस सुचित करण्यात येते की, मौजे पाझर, ता. अलिबाग जि. रायगड येथील खाली नमुद केलेल्या जमीन आमचे आशिलाने खरेदी करण्याचे ठरवले आहे. म्हणून, खाली नमूद करण्यात आलेल्या जमिनीबाबत जर कोणत्याही व्यक्तीची, संस्था, ट्रस्ट, सहकारी संस्था, कुळधारक, खरेदीदार, मुद्रक, गहाणदान, तारणदार, भाडेकरू किंवा इतर कोणालाही काही हक्क, दावा, अडचण, अडथळा किंवा कोणताही कायदेशीर संबंध असेल किंवा सदर मिळकतीबाबत कोणीही खरेदीखत अथवा साठेकरार केला असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत योग्य त्या लेखी पुराव्यासह आपल्या हरकती खालील पत्त्यावर सादर कराव्यात.

जर दिलेल्या मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त झाली नाही, तर सदर जमीन निर्विघ्न आणि निर्विवाद आहे असे मानले जाईल आणि आमचे आशिल त्यानुसार खरेदी व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकती आमच्या आशिलावर कायदेशीरदृष्टया बंधनकारक राहणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | मौजे. | गट. क्र. | क्षेत्र | आकार | नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाझर | २६५ | ०.१७.७० | ५.३१ | जयंत गोविंद नाईक |

अलिबाग
दि. २६/०२/२०२६

सही
**ॲड रोशन रविंद्र पाटील**
**जिल्हा न्यायालय अलिबाग रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे - सहाण, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील नमूद वर्णनाची जमीन मिळकती पैकी क्षेत्र ०-१६-१० हे. आर श्री. श्रीकांत अनंत नाईक, व श्री. दत्तात्रेय अनंत नाईक रा. सहाण, पो. बामणगांव, ता. अलिबाग, जि.रायगड यांच्या मालकीचे असून, सदर जमिन मिळकत माझे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असून, तशा आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेला आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| सहाण, ता.अलिबाग जि. रायगड | ३२ | ०-७६-७०<br>पो.ख. ०-१०-९०<br>एकूण ०-८७-६० | १९.४८ |

सदर वर नमूद जमिन मिळकतीपैकी श्री. श्रीकांत अनंत नाईक वगैरे १ यांचे मालकीचे क्षेत्र ०-१४-१० हे. आर पो.ख. ०-०२-०० हे. आर आकार ३.५८ रु. पैसे एकूण क्षेत्र ०-१६-१० हे. आर मिळकत नोटीसीचा विषय आहे.

सदर जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. मात्र तरी देखील सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध व अन्य कोणताही बोजा, साठेकरार, ताबा, कब्जा, कुळव्यवहार, चार्ज, पोटगी हक्क, बक्षिस भाडेपट्टा, फरोक्तखत, जाण्या-येण्याचे मार्ग लिज, दावा वगैरे अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ (सात) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २४/०२/२०२६

सही-
**(ॲड. वैभव वसंत पाटील)**
रा.नवेदर बेली, ता.अलिबाग
जि.रायगड, मो. ९८५०२६१००८
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री नवनाथ ज्ञानेश्वर वास्कर, रा. घर नं. १९४, मु. ओवे पेठ, पो. खारघर, पनवेल, जि. रायगड, ४१०२१०, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे सावळे, ता. कर्जत, जि. रायगड, येथील जमिन मिळकत .**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ३/६ | ०.२२.००<br>पो.ख. ०.०२.००<br>एकुण ०.२४.०० | १.९४ | श्री.धनवी लहु धुळे. |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वानी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- २७/०२/२०२६.

सही/-
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे.
मो.नं.७३८५००४८०६.

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे नवेदर बेली, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील नमूद वर्णनाची जमीन मिळकत श्रीमती मंदाकीनी दत्तात्रेय पाटील, रा. सहाण, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या मालकीची असून, सदर जमिन मिळकत माझे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असून, तशा आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलां दरम्यान झालेला आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| नवेदर बेली, ता.अलिबाग जि.रायगड | ६८ | ०-१०-६०<br>पो.ख. ०-००-९०<br>एकूण ०-११-५० | २.१७ |

सदर जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. मात्र तरी देखील सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध व अन्य कोणताही बोजा, साठेकरार, ताबा, कब्जा, कुळव्यवहार, चार्ज, पोटगी हक्क, बक्षिस भाडेपट्टा, फरोक्तखत, जाण्या-येण्याचे मार्ग लिज, दावा वगैरे अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ०७ सात दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक: २६/०२/२०२६

सही/-
**(ॲड. प्रविण कृष्णा झेंडेकर)**
रा. आक्षी, ता. अलिबाग
जि. रायगड, मो.९०११३६२८६७
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री.सुरज अनंत म्हात्रे याने मौजे नारळाचीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालक खालील प्रमाणे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन : मौजे नारळाचीवाडी, ता.कर्जत, जि. रायगड**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|---|
| श्री.शांता मारूती पिंगळे | ४८ | २ | ०-१९-०० | ०-४३ |

वरील मिळकत ही आमचे अशिलांस विकत देणेचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, लिएन वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे.

दि. २६/०२/२०२६
**ॲड. निलेश रखमाजी पादीर**
मो.-९७६७६३७१००/
९२७२५६२१५८

**ॲड. हरिचंद्र अनंता हिंदोळा**
मु. पोंडयाचीवाडी, पो. पोशिर,
ता. कर्जत, जि. रायगड
मो. ७७७६८१८९४७

# पाण्यासाठी विद्यार्थ्यांचा आर्त टाहो

## || नेरळ विद्या भवन पाण्याविना || रस्त्याच्या कामात जलवाहिनी तोडली




| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील नेरळ कळंब रस्त्यालगत धामोते भागात नारायण फेणाणी प्रलंबित वेल्फेअर ट्रस्ट संचालित नेरळ विद्या भवन ही शाळा आहे. या शाळेत शेकडो विद्यार्थी शिक्षण घेत असून या शाळेचे पंचक्रोशीत नाव आहे. या शाळेत जाणारी नळपाणी वाहिनी रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदार कंपनीकडून दि.३ फेब्रुवारी रोजी तोडण्यात आली आहे. सध्या येथील विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा काळ सुरु आहे. असे असताना या शाळेच्या विद्यार्थ्यांवर रस्त्यावर उभे राहून 'पाणी पाहिजे पाणी', अशी म्हणण्याची वेळ आली आहे.

नेरळ-कळंब राज्यमार्ग रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्याचे काम सुरू आहे. या रस्त्याच्या बाजूला नेरळ विद्या भवन शाळा असून त्या शाळेची जलवाहिनी या रस्त्याच्या कडेने पुढे जाते. दि.३ फेब्रुवारी रोजी जेसीबी मशीनने या डांबरी रस्त्याचे खोदकाम करण्यात आले. त्यात विद्या भवन शाळेत जाणारी जलवाहिनी देखील तोडली गेली. तसेच, शाळेच्या मागच्या बाजूला या जेसीबी व पोकलन मशीन उभ्या केल्या जातात. त्यामुळे शाळेच्या आवारातूनच अवजड मशीनची ये-जा होत असल्याने पाईपलाईन अनेक ठिकाणी दबली गेली असल्याचे बोलले जात आहे. ही जलवाहिनी तुटून तब्बल २० दिवसांपेक्षा जास्त दिवस उलटले तरी तिची दुरूस्ती अद्याप करण्यात आलेली नाही. परिणामी या शाळेतील सुमारे २०० विद्यार्थ्यांना घरून पिण्याचे पाणी आणावे लागत आहे. तसेच, बाथरूममध्ये पाण्याचा थेंब नसल्याने विद्यार्थ्यांना खास करून विद्यार्थीनींची मोठ्या प्रमाणात कुचंबना होत आहे.

याबाबत नेरळ विद्या भवन शाळेच्या शिक्षकांनी कोल्हारे ग्रामपंचायत, कर्जत तहसीलदार आणि कर्जत पंचायत समिती गटविकास अधिकारी यांना निवेदन देऊन आपली कैफियत मांडली आहे. तरीदेखील संबंतिधत ठेकेदाराने जलवाहिनी दुरुस्तीचे काम केलेले नाही. त्यामुळे शाळा व्यवस्थापनासह विद्यार्थी आक्रमक झाले असून रस्त्यावर उतरून पाण्यासाठी आर्त टाहो फोडत आहेत. आमच्या पाण्याची लाईन हि ठेकेदाराने पूर्ववत करून द्यावी, अन्यथा विद्यार्थ्यांना घेऊन आंदोलन करण्याचा इशारा शिक्षकांनी दिला आहे. दरम्यान, परीक्षा काळात पाण्यासाठी संघर्ष करण्याची वेळ विद्यर्थ्यांवर आली असल्याने प्रशासन बघ्याची भूमिका घेणार की ठेकेदार कारवाईचा बडगा उगारत शाळेला न्याय मिळवून देणार, हे पाहणे आता महत्वाचे ठरणार आहे.

### आंदोलनाचा इशारा

शाळेच्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या समोरून जाणारा ट्रक अडवून ठेवला व त्यानंतर रस्त्याचे काम देखील अडविण्याचा इशारा दिला. यावेळी शाळेचे शिक्षक सचिन अभंगे आणि संतोष कांबरी यांनी शाळेच्यावतीने पुढील २ दिवसांत जलवाहिनी नवीन टाकण्याचे आवाहन केले आहे. जर २ दिवसांत शाळेची जलवाहिनी नव्याने टाकण्यात आली नाही, तर शाळेच्या विद्यार्थ्यांसह शिक्षक वर्ग नेरळ-कळंब रस्त्यावर बसून आंदोलन करतील, असे शिक्षकांनी जाहीर केले.

# सहाय्यक निबंधक कार्यालये 'वसुलीचे अड्डे?

| उरण | प्रतिनिधी |

उरण सहाय्यक निबंधकांचे दालन सध्या दलालांच्या विळख्यात अडकले असून सर्वसामान्य नागरिकांची अक्षरशः लूट सुरू असल्याचा संतापजनक आरोप पुढे आला आहे. शासकीय कार्यालय असताना येथे दलालांचेच राज्य असल्याची चर्चा रंगली आहे. प्रत्येक जमीन नोंदणीमागे ५ ते १० हजार रुपयेपर्यंत दर आकारला जात असल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे.

उरण तालुक्यात औद्योगिक प्रगतीमुळे आणि वाढत्या गुंतवणुकीमुळे जमिनींचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. मुंबई, पुणे तसेच इतर राज्यांतील गुंतवणूकदार मोठ्या प्रमाणावर जमिनी खरेदी करत आहेत. खरेदी-विक्री, गहाणखत, करारनामा अशा विविध नोंदणी व्यवहारांसाठी नागरिक सहाय्यक निबंधक कार्यालयात येतात; मात्र, येथे त्यांची पहिली भेट सरकारी अधिकाऱ्यांशी नसून दलालांशीच होत असल्याची चर्चा आहे. यावेळी प्रत्येक दस्त नोंदणीमागे अधिकाऱ्यांच्या नावाने आणि कर्मचाऱ्यांच्या नावाने ५ ते ६ हजार रुपये घेतले जात असल्याचा आरोप नागरिक करीत आहेत. कोणी उघडपणे तक्रार करण्यास धजावत नसले तरी असंतोषाचा ज्वालामुखी आतून धुमसत आहे. गोरगरीब शेतकऱ्यांवर अन्यायजमीन गहाण ठेवून कर्ज घेण्यासाठी आलेल्या गरजू शेतकऱ्यांनाही दलालांच्या जाळ्यात अडकावे लागत असल्याची खंत व्यक्त होत आहे. सावकारांच्या कर्जजाळ्यातून शेतकरी बाहेर पडावा म्हणून सरकार घोषणा करते; मात्र, येथे दलालांचा नवा फास गळ्याभोवती आवळला जात असल्याचे चित्र आहे.

## निवडक



### पीएनपी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची लघु उद्योगाला भेट

**अलिबाग :** प्रभाकर पाटील एज्यूकेशन सोसायटीचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील अर्थशास्त्र व वाणिज्य विभागांतर्फे विद्यार्थ्यांसाठी गुरूवारी (दि.२६) क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले होते. ही क्षेत्रभेट अलिबाग येथील देवकृत घाणा तेल प्रक्रिया उद्योग येथे आयोजित केली होती. यावेळी देवेंद्र नागोठकर यांनी, बाजारातील पाम तेल आणि घाण्यावर तयार केलेले तेल या दोघांमध्ये असलेला फरक विद्यार्थ्यांना समजावून सांगितला. तेल तयार करण्यासाठी आवश्यक असलेल्या कच्च्या मालाचे स्रोत, तेल तयार करताना आवश्यक तापमान, हे तेल आरोग्यासाठी कसे फायदेशीर आहे याचे सोदाहरण स्पष्टीकरण त्यांनी दिले. विलास कावजी यांनी, घाण्यावर तेल तयार करण्याची प्रक्रिया विद्यार्थ्यांना दाखवून दिली. या क्षेत्र भेटीसाठी कला व वाणिज्य विभाग प्रमुख रसिका म्हात्रे, सहा. प्रा. जयश्री ठाकूर, कला व वाणिज्य विभागातील प्रथम, द्वितीय वर्गातील विद्यार्थी उपस्थित होते.



### रक्तदान शिबिरासह आरोग्य तपासणी

**अलिबाग :** पीएनपी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि.२६) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रक्तदानाबरोबरच आरोग्य शिबिरात नेत्र तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी व एचआयव्ही तपासणी अशा अनेक तपासण्यांचा समावेश होता. या शिबिराच्या सुरुवातीला जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपक गोसावी यांनी उपस्थितांना रक्तदानाचे महत्त्व पटवून सांगितले. त्यानंतर डॉ. संजय माने यांनी, एचआयव्हीचे समज गैरसमज आणि उपाय यावर मार्गदर्शन केले. नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. श्रद्धा कुदळे यांनी डोळ्यांच्या आजारावर माहिती सांगितली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांनी या सर्वप्रथम रक्तदान करून शिबिराची सुरुवात केली. त्यानंतर महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी यांनीसुद्धा रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घेऊन शिबीर यशस्वीरित्या पार पाडले. यावेळी संचालक विक्रांत वार्डे, प्रा.डॉ. ओमकार पोटे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. रसिका म्हात्रे, विज्ञान विभाग प्रमुख प्रा. पूजा म्हात्रे, महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन आणि नियोजन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील प्रा. मिलिंद घाडगे, प्रा. पूजा पाटील, प्रा. कैलास सिंह राजपूत, प्रा.संपदा शिंदे यांनी केले.

### पालीतील जबरी दरोड्याचा पर्दाफाश



**पाली/बेणसे :** काही महिन्यांपूर्वी हातोंड ग्रामपंचायत हद्दीत झालेल्या जबरी दरोड्याच्या गुन्ह्यात पाली पोलिसांनी जाबाज कामगिरी करीत महत्त्वपूर्ण यश मिळवले आहे. पाली पोलीस ठाणे यांनी जप्त केलेला मुद्देमाल न्यायालयाच्या आदेशाने तक्रारदारांना परत केला आहे. या कारवाईमुळे परिसरात समाधान व्यक्त होत असून पोलिसांच्या तपास कौशल्याचे कौतुक होत आहे. या दरोड्याने हातोंड गोंदावं सह सुधागडात मोठी दहशत निर्माण केली होती. त्यातील पहिल्या दरोड्यातील ३७ हजार किमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले होते. ते संभाजी वाघमारे परत करण्यात आले. तसेच, दुसऱ्या दरोड्यातील २ लाख ५० हजार किंमतीची सोन्याची चैन जप्त करण्यात आली होती. या प्रकरणातील अनंत जाधव यांना न्यायालयाच्या आदेशानुसार सोन्याची चैन परत देण्यात आली. असा एकूण २ लाख ८७ हजार रुपये किमीचा मुद्देमाल पाली पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर व पथकामार्फत सबंधितांना परत करण्यात आला आहे. या कारवाईमुळे पाली परिसरात कायद्याचा धाक पुन्हा अधोरेखित झाला असून नागरिकांनी पोलिसांच्या कार्याचे स्वागत केले आहे.



● होळी सणानिमित्त मुरुडमधील कोळी बांधव आपल्या बोटी सजवून वाजत गाजत भंडारा उधळत आनंदाने आपल्या परिवाराला भेटायला आले. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# कोंडी सोडविण्यासाठी पोलीस सज्ज


## खासगी संस्थांची घेणार मदत

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

शनिवारपासून सलग चार दिवस सुट्टी आहे. या सुट्टीचा आनंद लुटण्यासाठी पर्यटक रायगड जिल्ह्यात दाखल होण्याची शक्यता आहे. याच कालावधीत होळीचा सण असल्याने चाकरमानीदेखील येणार आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाहतूक पोलिसांसोबत पोलीस ठाण्यातील कर्मचारी, होमगार्ड व खासगी संस्थाची मदत घेऊन कोंडी सोडविण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सरिता चव्हाण यांनी दिली आहे.

शनिवार व-रविवारी साप्ताहीक सुट्टी असून सोमवारी (दि.२) होळी आणि मंगळवारी (दि.३) धुलीवंदन आहे. त्यामुळे शनिवारपासून मंगळवारपर्यंत शासकीय कार्यालयांसह शाळांना सुट्टी आहे. या सुट्टीचा आनंद लुटण्यासाठी पर्यटक जिल्ह्यात येण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे मुंबई-गोवा महामार्गासह अलिबाग-पेण, अलिबाग-रेवदंडा व अलिबाग-रोहा मार्गावर चाकरमान्यांसह पर्यटकांची कोणतीही गैरसोय होऊ नये, वाहतुक कोंडीत न अडकता त्यांचा प्रवास आरामदायी व चांगला व्हावा, यासाठी जिल्हा वाहतूक शाखेने नियोजन केले आहे.यावेळी जिल्हा वाहतूक शाखेच्या ९० पोलीस कर्माचाऱ्यांच्या मदतीने वाहतूक कोंडी सोडविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. तसेच, त्यांच्याकडून १०० होमगार्डची देखील मदत घेतली जाणार आहे. वॉकी टॉकीसह अन्य साधन सामुग्रीच्या मदतीने वाहतूक कोंडीवर नियंत्रण ठेवण्याचे काम केले जाणार आहे. त्याचे नियोजन जिल्हा वाहतूक शाखेकडून करण्यात आले आहे. मुरूडकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी पर्यायी व्यवस्था केली जाणार आहे. जेणेकडून रोहा मार्गावर वाहतूक कोंडीचा भार पडणार नाही.

# पनवेल-कर्जत कॉरिडॉरचे काम प्रगतीपथावर

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल ते कर्जत दरम्यान उभारला जात असलेला पनवेल-कर्जत उपनगरीय रेल्वे कॉरिडॉर प्रकल्प ८५ टक्के पूर्णत्वास पोहोचला आहे. सुमारे २९.६ किलोमीटर दुहेरी मार्गाच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी २,७८२ कोटींचा खर्च मंजूर करण्यात आला आहे. या मार्गावर पनवेल, चिखले, पोयंजे (मोहोपे), चौक आणि कर्जत अशी पाच स्थानके उभारली जात आहेत. विशेष म्हणजे अवघड डोंगराळ व जंगल परिसरातून तीन बोगदे (एकूण ३,२०६ मीटर) आणि ४७ पूल उभारण्यात आले आहेत. पनवेल व कर्जत येथे रेल्वे फ्लायओव्हरचे काम अंतिम टप्प्यात असून सर्व प्रमुख व लघुपूल पूर्ण झाले आहेत. वावरले गावांत बोगदा अत्याधुनिक तयार करण्यात आला असून सर्व सुरक्षित यंत्रणा बसाविण्यात येत आहे.

पनवेल यार्डमधील जटिल बदल, सिग्नलिंग सुधारणा आणि वाहतूक न खंडता करण्यात आलेली कामे ही अभियांत्रिकी कौशल्याची उदाहरणे ठरली आहेत. सध्या बोगद्यांतील लाईनिंग, ट्रॅक बसविणे, वीजवाहिनी आणि सिग्नल प्रणालीची कामे वेगाने सुरू आहेत. हा कॉरिडॉर सुरू झाल्यानंतर कल्याण मार्गावरील ताण कमी होऊन सीएसएमटीकर्जत दरम्यान पर्यायी मार्ग उपलब्ध होणार आहे. तसेच, तळोजा व परिसरातील औद्योगिक क्षेत्रांना चालना मिळून नवी मुंबई व रायगड जिल्ह्यातील विकासाला गती मिळणार आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी कमी होऊन कार्बन उत्सर्जनात घट होईल आणि हजारो प्रवाशांचा प्रवास अधिक जलद, सुरक्षित व आरामदायी होणार असल्याने हा प्रकल्प प्रदेशासाठी विकासाची नवी जीवनवाहिनी ठरणार आहे.

### नुकसानग्रस्त नागरिक भरपाईच्या प्रतीक्षेत



**चिरनेर :** उरण तालुक्यातील चिरनेर या गावात गतवर्षी २६ मे रोजी सकाळी अचानक आलेला पाऊस व सोसाट्याच्या वाऱ्यामुळे येथील चौलकर कुटुंबीयांच्या घराचे छप्परच उडाले होते. दुर्घटनेच्या रात्री चौलकर कुटुंबाच्या तिन्ही भावांची कुटुंबे कार्यक्रमानिमित्ताने नातेवाईकांकडे बाहेरगावी गेली असल्यामुळे मोठी दुर्घटना टळली. दरम्यान, घराच्या संपूर्ण छपराबरोबर घरातील टीव्ही, फ्रिज, वॉशिंग मशीन यासारख्या व अन्य इलेक्ट्रॉनिक वस्तू तसेच सोपा, बेड, कपडे व अन्नधान्यासह तयार करण्यात आलेल्या गणेश मूर्तींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. तर, गावातील काही घरांमध्ये पावसाचे पाणी व घरांच्या भिंतींची पडझड होऊन, नुकसान झाले होते. पावसाने चिरनेर गावांना अक्षरशः झोडपून काढले होते. मात्र, वादळी पावसातील घरांच्या घटनेला ८ महिने उलटून गेले तरी अजून शासनाची नुकसान भरपाई मिळालेली नाही. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात असून जनतेप्रती शासनाची संवेदनशीलता संपली का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

### निर्यातदार, वाहतूक दारांसाठी द्राक्ष आंबट

| चिरनेर | प्रतिनिधी |

जेएनपीएतील द्राक्षांची निर्यात ५० टक्क्यांनी घटली आहे. सातत्याने बदलत्या हवामानामुळे उत्पादनात घट झाली आहे. त्यामुळे यावर्षीचा द्राक्षांचा हंगाम निर्यातदार, व्यापारी, वाहतूकदारांसाठी आंबट राहिला आहे. जेएनपीए बंदरातुन महाराष्ट्र राज्यातील बागायतदार, व्यापारी, शेतकऱ्यांकडून दरवर्षी डिसेंबर ते मार्च दरम्यानच्या हंगामात १४ हजार कंटेनर द्राक्षांची परदेशात निर्यात केली जाते. यंदा मात्र द्राक्षे उत्पादनाला उतरती कळा लागली आहे. यावर्षी द्राक्षे हंगाम बहरलाच नाही. त्यामुळे द्राक्षांचे उत्पादन घटले आहे. त्यामुळे निर्यातीयोग्य द्राक्षे कमी पडली आहेत.

### मंदिरातील चोरीप्रकरणी आरोपीला शिक्षा



| रेवदंडा | प्रतिनिधी |

थेरोंडा येथील मंदिरफोडी प्रकरणातील आरोपी महेश नंदकुमार चायनाखवा (३८) याला सोमवारी (दि.२३) अलिबाग न्यायालयाने दोषी ठरवत शिक्षा ठोठावली आहे. त्याला प्रत्येकी १ वर्ष सश्रम कारावास व प्रत्येकी २ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली. महेश चायनाखवा याने थेरोंडा गावातील पाच पाढे कोळी समाजाच्या खंडोबा मंदिरातील लाकडी देव्हाऱ्यातील ३ मोठ्या चांदीच्या मूर्तीचे टाक, ६ लहान चांदीच्या मूर्तीचे टाक व १ चांदीचा लोलक असा ९४ हजार ८०० किमतीचा मुद्देमाल लंपास केला होता. तसेच, आगल्याची वाडी येथील मुंबईकर व ढोलके कुटुंबीयांच्या कुलदेवतांच्या रूमची कडी तोडून ४ चांदीच्या मूर्तीचे टाक, एकवीरा देवीचा चांदीचा मुखवटा व चांदीचा लोलक असा एकूण १ लाख ६० हजार ८०० किमतीचा मुद्देमाल चोरला होता.

# गुरचरण जमीन हडपण्याचा डाव उघड



| रसायनी | प्रतिनिधी |

भिंगार ग्रुप ग्रामपंचायत हद्दीत एका कंपनीने केलेल्या थेट फसवणुकीचा आणि शासनाच्या आदेशांची पायमल्ली करणाऱ्या कृत्यांचा अखेर भांडाफोड झाला आहे. ग्रामस्थांच्या हक्काच्या, पारंपरिक वहिवाटीच्या रस्त्यावर कोणतीही पूर्वसूचना, परवानगी किंवा ग्रामपंचायतीची मंजुरी न घेता बळकावलेली जागा ग्रामस्थांच्या एकजुटीने ताब्यात घेण्यात आली आहे.

वाधवा ग्रुप ने भिंगार ग्रामपंचायतीच्या मालकीची गुरुचरण जमीन बेकायदेशीर कागदपत्रांच्या आधारे स्वतःच्या नावे करून घेतली होती. त्यांची न्यायालयीन लढाई सुरु होती. भिंगारवाडी गावकऱ्यांचा पारंपरिक रस्ता याच जागेतून जातो. मात्र, त्या रस्त्यावर स्वतःची रहदारी सुरू करून ग्रामस्थांचा हक्क हिरावून घेतला होता. मात्र, ग्रामस्थांचा एकजुटीचा विजयाने बळकवलेली जागा ग्रामस्थांना पुन्हा त्यांच्या ताब्यात मिळाली.

यावेळी ग्रामस्थांची अभूतपूर्व एकजूट दिसून आली. या निर्णायक वेळी पनवेल पंचायत समितीच्या सदस्या योगिता लहाने, योगेश लहाने, सरपंच, माजी उपसरपंच, युवक वर्ग आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. हा लढा फक्त एका रस्त्यासाठी नव्हता तो गावच्या स्वाभिमानासाठी होता, असेही सांगण्यात आले.

राज्यात १ हजार ४७ नवे विद्युत सहाय्यक | रायगड जिल्ह्यात ७४ कर्मचाऱ्यांची भर

# महावितरणकडून विद्युत सहाय्यक पदाची भरती

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |




महावितरण कंपनीचे जाळे ग्रामीण भागासह शहरी भागात ठिकठिकाणी वाढले आहे. अपूऱ्या कर्मचाऱ्यांमुळे सेवा देताना अडचणी निर्माण झाल्या होत्या. मात्र, नुकतीच महावितरण कंपनीकडून विद्यूत सहाय्यक पदाची भरती करण्यात आली. प्रतिक्षा यादीवर निवड झालेल्या उमेदवारांची नियूक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे राज्यात १ हजार ४७ नवे विद्यूत सहाय्यक महावितरण कंपनीच्या विभागात दाखल झाले आहेत. त्यात रायगड जिल्ह्यात ७४ कर्मचाऱ्यांची भर पडली आहे.

रायगड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील खेड्या पाड्यात, गावे, वाड्या वस्त्यांसह शहरी भागात ठिकठिकाणी महावितरण कंपनीने त्यांची विजेचे जाळे पसरविले आहे. 'मागेल त्याला विज' या भुमिकेतून नियमांची पुर्तता झालेल्या नागरिकांना नवीन विज कनेक्शन देण्याचे काम केले आहे. त्यामुळे आज रायगड जिल्ह्यासह अन्य जिल्ह्यातील भाग विज पोहचविण्याचा प्रयत्न केला आहे. घरगूती विजय कनेक्शनसह व्यावसायिक, औद्योगिक कामांसाठी विजेचा वापर प्रचंड वाढला आहे. वाढत्या मागणीसह वापरामुळे महावितरण कंपनीमध्ये कर्मचाऱ्यांचा तुटवडा कायमच भेडसावत राहिला आहे. पुर्ण वेळ कर्मचाऱ्यांचा अभाव अनेकवेळा महावितरण कंपनीला दिसून आला आहे. त्यामुळे महावितरण कंपनीने नुकतीच विद्यूत सहाय्यक या पदाची भरती काढली. या भरतीची परीक्षा मागील काही महिन्यांपुर्वी झाली. त्यातील काहीजण प्रतिक्षा यादीवर होते. अखेर या प्रतिक्षा यादीवर असलेल्या उमेदवारांची विदयूत सहाय्यक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, नगरपरिषद निवडणुकींसह महानगर पालिका व जिल्हा परिषद निवडणूकांमुळे नियुक्ती करता येत नव्हती. या निवडणुकांची आडकाठी नियुक्तीवर झाली होती. अखेर जिल्हा परिषद निवडणुका संपल्यावर प्रतिक्षा यादीवर निवड झालेल्या १ हजार ८४७ उमेदवारांची विद्यूत सहाय्यक म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यात रायगड जिल्ह्यातील ७४ उमेदवारांचा समावेश आहे.

विद्यूत सहाय्यक म्हणून पुणे, बारामती, कोल्हापूर, रत्नागिरी, जळगांव, कल्याण व नाशिक इत्यादी जिल्ह्यातील उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. निवडणूक झाल्यावर ते सर्व उमेदवार कामावर रुजू झाले आहेत. या सर्व कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे. तसेच कागदपत्रांची पडताळणीदेखील झाल्याची माहिती महावितरण कंपनीकडून देण्यात आली आहे.

> **प्रतिक्षा यादीवर असलेल्या राज्यातील विद्यूत सहाय्यक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यात रायगड जिल्ह्यातील ७४ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. आचारसंहिता संपल्यावर तातडीने या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**
> **- धनराज बिक्कड, कार्यकारी अभियंता, महावितरण कंपनी**

# आजारी शहराचा संकल्प

मुंबई हे अनेकांपैकी एक शहर असले तरी त्याच्या अर्थसंकल्पाचा आकार अनेक राज्यांपेक्षाही मोठा आहे. त्यामुळे बुधवारी मांडण्यात आलेल्या मुंबई महापालिकेच्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पाची दखल घेणे आवश्यक आहे. आपल्या सध्याच्या राज्यकर्त्यांची तथाकथित विकासाची दृष्टीही यातून दिसत असल्याने त्याचा विचार अधिक गरजेचा आहे. मुंबई शहर जसे वेडेवाकडे वाढतच चालले आहे तसाच याच्या अंदाजपत्रकाचा आकारही दिवसेंदिवस फुगत चालला आहे. गेल्या वर्षी तो ७४ हजार कोटी रुपये होता. यंदा तो ८० हजार कोटी रुपयांवर गेला आहे. पण यातली सर्वात महत्वाची बाब म्हणजे महापालिकेच्या ठेवी मोडून त्यातून मोठे खर्च करण्यात येणार आहेत. हे म्हणजे घरचे मंगळसूत्र किंवा सोने मोडून खाण्यासारखे आहे. पालिकेकडे सुमारे ८९ हजार कोटींच्या ठेवी आहेत. म्हणजे यंदा जितका अर्थसंकल्प आहे तितक्या रकमेच्या ठेवी महापालिकेकडे आहेत. हे अर्थातच वर्षानुवर्षांच्या उत्पन्नातून राखून ठेवलेले पैसे आहेत. ही बचत केल्याबद्दल इतकी वर्षे सत्तेत असलेल्या ठाकरे सेनेला खरे तर नव्या भाजपच्या सत्ताधीशांनी दुवा द्यायला हवा. त्यांनी पैसे राखले म्हणून हे आता मोडून खाऊ शकत आहेत. इतक्या प्रचंड प्रमाणावर ठेवी असल्यानेच हिला श्रीमंत पालिकेचे बिरुद प्राप्त झाले होते. आता यातील ३६ हजार कोटींच्या ठेवी मोडून त्यातून पालिकेचे खर्च भागवायला अर्थसंकल्पात परवानगी मागण्यात आली आहे. पालिकेत भाजपचेच बहुमत असल्याने ती मिळणार यात काही शंका नाही. ठेवींपैकी सुमारे ४४ हजार कोटी रुपये हे राखीव असल्याने त्यांना सामान्य स्थितीत हात लावता येत नाही. म्हणूनच ते पैसे बचावले आहेत. एकूण खर्चाचे कलम मोठे असले तरी उत्पन्नाच्या नावाने बोंब असल्याने मागच्यांनी साठवलेली गंगाजळी रिकामी करायची आणि त्यातून रस्ते वगैरे बांधून त्याला विकास म्हणायचे हे काम इथेही चालू राहणार आहे. गंमत म्हणजे मुंबईतील बहुसंख्य पूल, रस्ते किंवा इतर पायाभूत सोईंचे बांधकाम व देखरेख एमएमआरडीएकडे गेले आहे. त्यांचे सुमारे ५० हजार कोटींचे स्वतःचे बजेट आहे. तरीही पालिकेला मोठा खर्च करावा लागतो आहे हे लक्षात घ्यायला हवे.

## प्रदूषणावर इलाज

वास्तविक याच स्तंभात पूर्वी वारंवार म्हटल्याप्रमाणे मुंबईच्या वाढीची क्षमता आता संपली आहे. आता शहापूर, कर्जत, डहाणू किंवा अलिबागपर्यंत तिचा जो विस्तार चालू आहे ती आरोग्यपूर्ण वाढ नाही. ती आजारपणाने आलेली सूज आहे. मुंबई महापालिकेचे क्षेत्र मुलुंड व दहिसरपर्यंतच मर्यादित असले तरी तिथून लोक मुख्य मुंबईत नोकरीधंद्यासाठी येत असल्याने त्यांचा ताण सतत या शहरावर येत राहतो. शिवाय, या बाहेरच्या प्रदेशातून मुख्य शहरात वस्तीला येण्याची लोकांची धडपड सतत चालू असल्याने मुंबईतील गर्दी वाढतच चालली आहे. त्याचमुळे या शहरात कितीही रस्ते किंवा मेट्रोसेवा वाढवली तरी ती कमीच पडते आहे. त्यामुळे मग समुद्रातून पूल, जमिनीखालून रस्ते अशा कसरती चालू आहेत. त्यासाठी अधिकाधिक पैसे द्यावे लागत आहेत. या सर्वांमुळे मुंबईत कधी नव्हे इतके प्रदूषण वाढले आहे. वास्तविक मुंबई हे समुद्राकाठचे शहर असल्याने तेथून येणाऱ्या सततच्या वाऱ्यामुळे हवेतील प्रदूषण पूर्वी मर्यादित होते. शिवाय इथे रेल्वे आणि बेस्ट अशा दोन मजबूत वाहतूक यंत्रणा असल्याने एकूणच प्रदूषण कमी होते. आता मात्र मुंबई दिल्लीशी स्पर्धा करू लागली आहे. मुंबईत कायम एक धुरक्याची चादर पसरलेली दिसते. हरेक प्रकारच्या बांधकामांमुळे इतकी धूळ आहे की इथे आता सतत पाणी मारून प्रदूषण कमी करावे लागते. कालच मुख्यमंत्र्यांनी याबाबत एआयच्या मदतीने तातडीचे उपाय करण्याचे आदेश दिले आहेत. पालिका अर्थसंकल्पात यासाठी तब्बल १५९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. दरवर्षी पावसाळ्यानंतर मुंबईचे रस्ते खराब होतात व खड्डे भरावे लागतात. त्यासाठी कायम तरतूद करावी लागते. जगातील इतर कोणत्याही नामवंत शहरांमध्ये असे पैसे खर्चावे लागत असतील असे वाटत नाही. आता प्रदूषण नियंत्रण या नावाखाली या आजारी शहराचा खर्च सालोसाल असाच वाढत जाईल अशी लक्षणे आहेत.

## भिक्षेकऱ्यांच्या भूमिकेत

या अर्थसंकल्पात बेस्टच्या सार्वजनिक वाहतुकीसाठी केवळ एक हजार कोटींचे अनुदान देण्यात आले आहे. प्रत्यक्षात बेस्ट उपक्रमाला ९ हजार कोटींचा तोटा असून आता तर कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी दर काही दिवसांनी राज्य सरकारकडे हात पसरावे लागतात. पालिकेकडून बेस्टला किमान ५ हजार कोटी अनुदानाची अपेक्षा होती. ती पूर्ण न झाल्याने बेस्ट कायम भिक्षेकऱ्याच्या भूमिकेत राहील. सध्या बेस्टकडे स्वतःच्या जेमतेम ३०० बसेस असून भाड्याच्या बसेस व माणसे घेऊन काम चालवले जात आहे. अनेक बसेस कमी करण्यात आल्या आहेत. परिणामी रस्त्यावरच्या रिक्षा, टॅक्सी इत्यादींची वाहतूक वाढून प्रदूषणातही वाढ होत चालली आहे. पण या राज्यकर्त्यांना समस्येवर मूलभूत उपाय करण्यात रस नाही. उलट त्यांना बेस्टच्या जमिनी, वरळी व कुर्ला इथल्या डेअरीच्या जागा इत्यादी विकून खाण्यात अधिक रस आहे. मुंबई पालिकेचा आरोग्य विभाग हा आजवर चांगले काम करण्याबद्दल प्रसिध्द आहे. केईएम, नायर, सायन यासारखी इस्पितळे व वैद्यकीय महाविद्यालये चालवणारे ही देशातील एकमेव मोठी महापालिका आहे. पण या आरोग्यावरच्या खर्चातही आता कपात होत चालली आहे. यंदा गेल्या वर्षीच्या तुलनेत जेमतेम १ टक्का वाढ झाली आहे. या पैशांमध्येच कामाठीपुऱ्यात हे आलिशान इस्पितळ उभारण्याचे तसेच डायलिसिससारख्या उपचारांमध्ये वाढ करण्याचे ठरवण्यात आले आहे. पण पालिकेच्या उपनगरातील इस्पितळांची दुरवस्था झालेली आहे. केईएमसारख्या रुग्णालयावर खरे तर मुंबई व महाराष्ट्रवासियांचा पहिला हक्क हवा. पण तेथेही परप्रांतीयांची दाटीवाटी झाली आहे. पालिकेचा कारभार आजवर भूषण गगराणी व इतर त्यांच्यासारख्याच आयएएस बाबूंकडे होता. त्यामुळे जनतेच्या प्रश्नांचे गांभीर्य लक्षात न घेता आपल्या मनाने ते निर्णय घेत होते. यंदा अलिकडेच निवडणूक झाल्याने नगरसेवक नवे आहेत. पण इथून पुढच्या काळात ही प्रशासनातील लोकांची दादागिरी संपवून जनतेच्या भल्याचे निर्णय घ्यायला भाग पाडणे ही सर्वपक्षीय नगरसेवकांची जबाबदारी आहे. शिक्षण, आरोग्य, वाहतूक यासारख्या सोईंवर पालिकेला अधिक खर्च करायला लावण्याची भूमिका त्यांनी घ्यायला हवी. काल मांडलेला अर्थसंकल्प हा नोकरशाहीचा आहे. त्याला जनतेच्या हिताचे वळण लावणे आवश्यक आहे. उद्या सभागृहात व विविध समित्यांमध्ये या अर्थसंकल्पाची चर्चा होईल तेव्हा जनतेची बाजू घेतली जाईल अशी अपेक्षा आहे. खाऱ्या पाण्यापासून गोडे पाणी तयार करण्याच्या प्रकल्पासाठी तब्बल ५०० कोटी रुपयांची तरतूद आहे. पण जगात कोठेही मुंबईइतक्या शहराचे पाणी खाऱ्याचे गोडे करण्याचे प्रकल्प नाहीत. सिंगापूरला काही प्रयोग झाले आहेत. पण इतर देशांनी त्याला हात घातलेला नाही. असे असताना मुंबईतून त्यासाठी इतकी तरतूद म्हणजे कंत्राटदाराची धन आहे की काय अशा शंकेला जागा आहे. किंबहुना, सर्व अर्थसंकल्प हाच मुळी कंत्राटदारांना सवलती देणारा ठरेल अशी भीती आहे.

विचार

# संवाद साधतील वाहने...

*येत्या काळात वाय-फाय, ब्लूटूथ आणि अधिक प्रगत कनेक्टीव्हिटी वैशिष्ट्यांसह वाहने सज्ज असतीलच, पण आपण मागे बसलो असल्यास आपल्यासमोरील सीट हे वर्क स्टेशन बनेल. त्यामुळे मनोरंजन, संगणकाचा वापर सहजशक्य होईल. वाहने एकमेकांशी आणि रस्त्यावरील पायाभूत सुविधांशी संवाद साधू शकतील. यामुळे सुरक्षितता वाढेल आणि वाहतूक व्यवस्थापन अधिक प्रभावी होईल.*



डॉ. दीपक शिकारपूर

सुमारे सात हजार वर्षांपूर्वी समुद्रावर चालू शकेल अशी नौका कुवेतमधील उत्खननात दिसून आली. प्राण्यांचा वापर करून प्रवास ही पद्धत तर अनेक शतकांपासून लोकप्रिय आहे आणि अजूनही अनेक दुर्गम भागात प्रचलित आहे. उद्याच्या तंत्रमय भविष्यात अनेक पैलू क्रांतिकारी पध्दतीने बदलणार आहेत. अनेक उपकरणे, प्रथा, प्रक्रिया कालबाह्य होतील. मग या सर्व उत्क्रांतीला वाहन कसे अपवाद ठरेल? विसाव्या शतकात संगणक जन्माला आले. पूर्वी खूप मोठ्या आकाराचे हे उपकरण स्वस्त, छोटे आणि शक्तिशाली होत गेले. हे तिन्ही प्रवाह एकाच वेळी कार्यरत होते. पण भौतिक जग आणि संगणकीय बिट, बाइटचे व्हर्च्युअल जग पूर्णपणे वेगळे होते. त्यांची एकमेकात ढवळाढवळ नव्हती. उदा वाहनाचे फ्युएल गेज फक्त इंधनाची पातळी सांगायचे आणि संपत आले की लाल दिवा लागायचा. पण हे चित्र २०१० नंतर बदलू लागले. २०२६ नंतर तर त्यात आमूलाग्र बदल घडतील. सेलफोन, जीपीएस, इंटरनेट आणि नॅनो उर्फ सूक्ष्म तंत्रज्ञान यांच्या संगमातून एक अत्यंत वेगळ्याच प्रकारचे स्मार्ट जग लवकरच आपल्या आसपास दिसू लागणार आहे. संगणकीय सूक्ष्मतंत्राचा प्रवेश प्रत्येक पैलूमध्ये झालेला आढळेल. किंबहुना, तो तसा असणे हेच आपण गृहीत धरू इतक्या सहजपणे हा बदल होणार आहे. याला 'स्मार्ट कॉँप्युटिंग' म्हटले जाते.

भविष्यकाळात एक-दोन किलोमीटरवर वाहतूक-कोंडीची लक्षणे दिसू लागताच गाडीतील जीपीएस यंत्रणा पर्यायी मार्ग शोधेल. तंत्रज्ञानाची प्रगती होत आहे, तसतशी आपली वाहनेही अधिक स्मार्ट होत चालली आहेत. उद्याचे वाहन केवळ चालवण्यापुरते मर्यादित न राहता, आपले साथीदार, मदतनीस आणि सुरक्षिततेचे संरक्षक ठरणार आहे. उद्याचे स्मार्ट वाहन हे पूर्णपणे इंटरनेटशी जोडलेले असेल. त्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज आणि सेन्सर टेक्नॉलॉजी यांचा वापर असेल. याव्यतिरिक्त, स्मार्ट वाहने प्रदूषणविरहित असतील. ती सौर किंवा विद्युत ऊर्जेवर चालतील. त्यामुळे पर्यावरणाचे रक्षण होईल आणि हवामान बदलावरही सकारात्मक परिणाम होईल. उद्याचे स्मार्ट वाहन हे अधिक आरामदायक, कार्यक्षम आणि सुरक्षित असेल. ते अधिक वैयक्तिकृत आणि कनेक्टेड असेल आणि अधिक लवचिक आणि अत्याधुनिक प्रवास पर्याय प्रदान करेल. उद्याचे वाहन रचतेच्या बाबतीतही बदलत आहे. त्यात सुटे हलते भाग कमी होऊन सिलिकॉन चिप्स, इंटरनेट ऑफ थिंग्ज, लिथियम बॅटरी असे अवयव असतील. चालकासमोरचा डॅशबोर्ड अधिकाधिक स्मार्ट होऊन चालकाला बॅटरी किती चार्ज आहे, जवळ चार्जिंग स्टेशन कुठे आहे, ट्रॅफिक जाम व वाहतुकीच्या मार्गाचा स्मार्ट सल्ला इत्यादीची इत्थंभूत माहिती देईल. येत्या काळात वाहने अधिक प्रगत सस्पेन्शन आणि सीटिंग सिस्टीमसह येतील, जी अधिक आरामदायक प्रवास अनुभव प्रदान करतील. त्यात अधिक कार्यक्षम इंजिन असेल आणि ऊर्जा-सक्षम घटकांसह जास्त मायलेज आणि कमी उत्सर्जन देईल. इथे इलेक्ट्रिक, हायब्रीड असे अनेक घटक समाविष्ट असतील. स्मार्ट वाहने इंटरनेट आणि इतर उपकरणांशी सतत जोडलेली राहतील. यामुळे त्यांना रिअल टाइम वाहतूक माहिती, हवामानाचा अंदाज आणि इतर उपयुक्त माहिती मिळत राहील. उद्याचे स्मार्ट वाहन अधिक सुरक्षित असेल. स्वयंचलित ब्रेकिंग, लेन-बदल करण्यात मदत आणि अंधारात दृष्टी या बाबतीत ते चुणूकदार ठरेल. चालक गाडी ठीक चालवत नसेल तर ते अनेक प्रकारे त्याला सूचना देईल. गजर, झटका, समोरील वाहन वेगात उलट येत असेल तर आपोआप स्टिअरिंग वळवणे, अनेक निकटवर्तीयांना आपत्कालीन संदेश पाठवणे आदी गोष्टी करेल. उद्याचे स्मार्ट वाहन अधिक वैयक्तिकृत असतील. ते अधिक वैयक्तिकृत इंटीरियर आणि एक्सटीरियर डिझाइनसह उपलब्ध होईल, जे चालक आणि प्रवाशांच्या आवडीनिवडी पूर्ण करेल. प्रत्येक व्यक्ती वेगळी असल्यामुळे तिच्या वाहनाबद्दलच्या गरजा वेगळ्या असतात. उद्याचे स्मार्ट डिस्प्ले तंत्रज्ञान तुम्हाला स्मार्टफोन स्क्रीन समोर दाखवेल आणि ध्वनी सहाय्यक (व्हॉइस असिस्टंट) तुम्हाला वाहन चालवत असताना संदेश ऐकवेल. त्यातील एआय टूल आपोआप काही निर्णय घेईल. वाहनातील मनोरंजन प्रणाली अधिक प्रगत असेल आणि प्रवाशांना चित्रपट पाहणे, संगीत ऐकणे किंवा ऑनलाइन काम करणे शक्य होईल. येत्या काळात आपण गाडीमध्ये मागील बाजुला बसलो असल्यास समोरील सीट हे वर्क स्टेशन बनेल. त्यामुळे मनोरंजन, संगणकाचा वापर अशा अनेक गोष्टी शक्य होतील. वाहने एकमेकांशी आणि रस्त्यावरील पायाभूत सुविधांशी संवाद साधू शकतील. यामुळे सुरक्षितता वाढेल आणि वाहतूक व्यवस्थापन अधिक प्रभावी होईल यामध्ये अजून एक प्रवाह असेल तो स्वयंचलित वाहनाचा. सध्या ते प्रगत देशात प्रायोगिक स्तरावर प्रचलित आहे, पण भारतात त्याच्या अनेक समस्या आहेत. सतत बदलणारे रस्ते (आजचा नो एन्ट्री पॉइंट उद्याचा वनवे असू शकतो), कधीही कुठूनही वाहन अथवा प्राणी प्रगट होऊ शकते, अंधारात खड्डे असू शकतात. पुढील काही वर्षांमध्ये त्यावरही उपाय सापडतील, पण दुर्गम, असुरक्षित प्रदेशात स्वयंचलित तंत्र नक्कीच सोयीस्कर असेल. अशा वाहनांमुळे अपघातात घट, इंधनाचा कमी वापर आणि वेळेची बचत होणार आहे. इलेक्ट्रिक वाहने आधुनिक युगातील पर्यावरणपूरक वाहतूक स्रोत म्हणून उदयास आली आहेत. या वाहनांमध्ये पेट्रोल किंवा डिझेलऐवजी विद्युत ऊर्जा वापरली जाते. त्यामुळे प्रदूषण कमी होते आणि पर्यावरणाचे नुकसानही कमी होते. इलेक्ट्रिक वाहन ज्वलन इंजिनाऐवजी इलेक्ट्रिक मोटरवर चालते. त्यामध्ये मोठ्या रिचार्ज करण्यायोग्य बॅटरीमध्ये (किंवा इलेक्ट्रिक सेलच्या पॅकमध्ये) वीज साठवली जाते. इलेक्ट्रिक वाहने खूपच कमी आवाज करतात, उच्च प्रवेग आणि टॉर्क त्यांना आणखी आकर्षक बनवते. महत्वाचे म्हणजे त्यांना व्यावहारिकदृष्ट्या कोणत्याही देखभालीची आवश्यकता नसते.

गेल्या दशकापासून देशामध्ये हायड्रोजनवर चालणाऱ्या वाहनांवरील संशोधनाला गती मिळाली आहे. या वाहनांचा बोलबाला इलेक्ट्रिक कार्सइतका नसला तरी बीएमडब्ल्यू आणि स्टोलांटिस या मोठ्या कंपन्यांनी याबाबतच्या संशोधन आणि विकास कार्यक्रमांमध्ये मोठी गुंतवणूक केल्याने या क्षेत्राकडे अनेकांच्या नजरा वळल्या आहेत. अनेक देशांनी आपापल्या वाहन उत्पादकांवर कमीत कमी धूर सोडून पर्यावरणाची हानी शक्य तितकी टाळणारी इंजिने (व इंधनेही) शोधण्याचे, बनवण्याचे आणि वापरण्याचे बंधन आता घातले आहे. त्यामुळे वाहन उद्योगाच्या पारंपारिक चित्रात आणि एकंदर रचनेमध्ये मोठे बदल होऊ घातले आहेत. हायड्रोजन कार्स हे त्यातलेच एक महत्त्वाचे पाऊल आहे. ही हायड्रोजन कार चालते कशी हे आपण थोडक्यात वाचू. इथे हायड्रोजन पेट्रोलप्रमाणे, थेट जाळला जात नाही तर त्यातील रासायनिक ऊर्जेचे रूपांतर विजेमध्ये केले जाते. या विजेवर गाडीची चाके फिरवली जातात. मुख्य म्हणजे या वाहनाच्या एक्झॉस्ट पाइपमधून धूर नाही तर चक्क पाणी बाहेर येते; परिणामी प्रदूषण शून्य! हायड्रोजन तीन प्रकारे मिळतो. पेट्रोलियमच्या उत्पादन प्रक्रियेतून, कोळशापासून आणि पाणी व सेंद्रीय कचऱ्यातून. 'ग्रीन' म्हणजेच पर्यावरणस्नेही असल्याने या तिसऱ्या प्रकारच्या हायड्रोजनचा वापर या वाहनांसाठी केला जातो. या सर्व नवसंशोधनांकडे पाहताना कोणतेही एक विशिष्ट तंत्रज्ञानच श्रेष्ठ मानून त्याचाच वापर करण्याचा आग्रह धरण्यापेक्षा, सर्वोत्तम विविध तंत्रांचे एकत्रीकरण करून पर्यावरण रक्षणाचा अंतिम हेतू साध्य करणे महत्त्वाचे आहे, असे म्हणता येईल.

deepak@deepakshikarpur.com

**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

चर्चा आजची

# रायगडात लोकशाहीची गळचेपी?



राकेश लोहार

९ फेब्रुवारीला निकाल जाहीर झाला आणि दिवस मागे सरकत गेले; पण सत्तास्थापनेची साधी औपचारिकतादेखील पूर्ण झालेली नाही. हा केवळ उशीर नाही, तर ही लोकशाही प्रक्रियेची उघड थट्टा आहे. जनतेने मतपेटीत आपला निर्णय नोंदवला, पण तो निर्णय अंमलात आणण्याची इच्छाशक्ती सत्ताधाऱ्यांमध्ये दिसत नाही. त्यामुळे याठिकाणी एक प्रश्न उपस्थित होतोय, तो म्हणजे निकाल लागल्यानंतरही कारभाराची गाडी सुरू होत नसेल, तर कुणाच्या इशाऱ्यावर ब्रेक दाबला आहे?

रायगड जिल्हा परिषद आज अंकगणिताच्या राजकारणात अडकली आहे. कोणाच्याच हातात स्पष्ट बहुमत नाही, आणि म्हणूनच 'जोडा-तोडा'च्या बैठका रंगत असल्याच्या चर्चांना उधाण आले असून, नवनियुक्त सदस्यांना रिसॉर्टमध्ये हलवण्यापासून ते गुप्त बैठकींपर्यंत सगळे प्रयोग सुरू आहेत. मतदारांनी विकासासाठी कौल दिला; पण निवडून आलेले प्रतिनिधी मात्र सत्ता मोजण्यात, सत्तेच्या गणितात व्यस्त आहेत, याचाच खरा तर संताप करावासा वाटतो. जनतेचा कौल हा जणू बाजारात ठेवलेला माल आहे, अशी वागणूक, असाच आविर्भाव सत्ताधाऱ्यांमध्ये दिसून येत आहे. ही अवस्था केवळ राजकीय पक्षांची नाही, तर प्रशासकीय यंत्रणेचीही कसोटी आहे. Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 या कायद्यात निवडणुकीनंतरची प्रक्रिया स्पष्ट नमूद आहे. पहिली बैठक बोलावणे आणि त्यात अध्यक्ष-उपाध्यक्षांची निवड करणे ही औपचारिकता नव्हे, तर कायदेशीर जबाबदारी आहे. तरीही वेळ जातोय आणि बैठक होत नाही. मग हा उशीर नेमका कुणाच्या सोयीसाठी? कायदा फक्त पुस्तकापुरता आहे का?

जिल्हा प्रशासनाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात आहे. प्रक्रिया वेळेत न रेटणे म्हणजे प्रशासनाची निष्क्रियता की दबावाला शरण जाणे? राजकीय समीकरणे जुळेपर्यंत घड्याळ थांबवून ठेवण्याचा अधिकार कोणाला दिला? लोकशाही व्यवस्थेत प्रशासन हे तटस्थ असावे लागते; पण जर तेच अनिश्चिततेकडे पाहात बसले, तर सामान्य नागरिकांनी कुणावर विश्वास ठेवायचा? असे अनेक प्रश्न आज उपस्थित होत असताना, सत्तास्थापनेचा वेळकाढूपणा नक्की कोणासाठी?

दरम्यान, राजकीय नेत्यांकडून उघड-उघड संकेत दिले जात आहेत. मंत्री भरत गोगावले यांच्यासारख्या नेत्यांच्या वक्तव्यांमधून दबावाचे राजकारण सुरू असल्याचे दिसून येते. पुढील निवडणुकांची धमकी, गटबदलाचे सूचक इशारे, 'सोबत या नाहीतर परिणाम भोगा'चा संदेश, ही भाषा लोकशाहीची आहे की सत्तेच्या अहंकाराची? सत्तेचा मोह इतका प्रबळ झाला आहे की जनादेश दुय्यम ठरतोय.

निवडून आलेल्या सदस्यांची भूमिकादेखील प्रश्नांकित आहे. मतदारांनी त्यांना प्रश्न सोडवण्यासाठी पाठवले, स्वतःचे राजकीय भवितव्य सुरक्षित करण्यासाठी नव्हे. पाच वर्षांचा कालावधी मिळणार आहे; पण सुरुवातीलाच खुर्चीच्या खेळासाठी अशी धावपळ करणे म्हणजे लोकांच्या विश्वासाचा अपमान नाही का? विकासकामे थांबली, निर्णय रखडले, निधी अडकला याची जबाबदारी कोण घेणार? परंतु, आजच्या घडीला हे सर्व प्रश्न दुय्यम ठरत असून, सत्ता सर्वश्रेष्ठ असून, ती मिळविण्यासाठी राजकारणी जीवाचे रान करतानाचे चित्र दिसून येत आहे. जर ही कोंडी अशीच वाढत राहिली, तर न्यायालयीन हस्तक्षेप अटळ ठरू शकतो. एखादा सदस्य दाद मागण्यासाठी न्यायालयात गेला, तर आदेश, स्थगिती, अपात्रतेचे मुद्दे असे सगळेच पुढे येऊ शकतात. मग हा राजकीय पेच थेट कायदेशीर रणांगणात बदलेल. त्याची राजकीय किंमत मोजावी लागेल, आणि जनतेसमोर उत्तर द्यावेच लागेल. सध्याची परिस्थिती पाहता, हे स्पष्ट दिसून की, सत्तेसाठीची झुंज लोकशाहीपेक्षा मोठी समजली जात आहे. मतदानानंतरची प्रक्रिया जर मुद्दाम लांबवली जात असेल, तर ती लोकशाहीची गळचेपीच आहे. प्रश्न केवळ अध्यक्ष कोण होणार याचा नाही; प्रश्न असा आहे की जनतेच्या निर्णयाचा मान राखला जाणार की नाही? प्रत्येक पुढे ढकललेला दिवस हा लोकांच्या विश्वासावरचा घाव आहे. आणि, राजकारण्यांनी एक लक्षात घेणे गरजेचे आहे; ते म्हणजे, विश्वास एकदा ढासळला की तो परत उभा करणे कोणत्याही सत्तेला सहज शक्य नसते.

रायगड जिल्हा परिषद सध्या राजकीय अनिश्चिततेच्या भोवऱ्यात अडकली आहे. स्पष्ट बहुमत कोणालाच नाही. आकडे असे राष्ट्रवादी काँग्रेस १६, भाजप १५, शिवसेना (शिंदे) गट २१, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गट ५ आणि काँग्रेस २. जनतेने दिलेला कौल हा विकासासाठी होता की या अंकगणिती सौदेबाजीसाठी? सत्तेचा हिशेब जुळत नसल्याने सदस्यांना 'सुरक्षित' ठेवण्यासाठी गोव्यातील हॉटेलांचा आसरा घ्यावा लागतो, ही वेळ येते आणि तरीही सर्व पक्ष लोकशाहीचे गोडवे गात आहेत, याहून मोठी विडंबना काय असू शकते?

लोकसंसद

## आता दूषित हवेबरोबर दूषित पाण्याचे मोठे संकट

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने राज्यसभेत दूषित पाण्यासंबंधी मोठी आकडेवारी प्रसिद्ध केली आहे. त्या आकडेवारीनुसार गेल्या पाच वर्षात पाण्यापासून पसरणाऱ्या रोगात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. या आजारामध्ये हिपॅटायटिस, कॉलरा, लेप्टोस्पायरोसिस तसेच टाईफाईड याचा समावेश आहे. केंद्र सरकारने केंद्रशासित प्रदेश, व सर्व राज्ये यामधून केलेल्या आकडीवरी नुसार पाण्याचे पासून पसरणारे रोग मोठ्या प्रमाणात पसरत आहेत असे दिसते. २०२१ हे वर्ष विचार करता हिपॅटायटिस रुग्णामध्ये ८९० टक्के, तर कॉलरा रुग्णात ४२१ टक्के वाढ झाली आहे. याच बरोबर टायफाईड मध्ये १९१ टक्के, लेप्टोस्पायरोसिस मध्ये २४३ टक्के वाढ झाली आहे. ही बातमी नुकतीच वाचण्यात आली. आजपर्यंत दूषित हवेपासून रोग मोठ्या प्रमाणावर पसरतात असे ऐकत होतो पण आता दूषित हवेप्रमाणेच पाण्यापासून सुद्धा मोठ्या प्रमाणावर रोग पसरत आहेत असे दिसते आहे. २०२५ मध्ये मध्य प्रदेशामध्ये तब्बल टायफाईड चे ५६००७ एवढे रुग्ण आढळून आले आहेत. हे देशातील सर्वात जास्त रुग्ण आहेत. अलिकडे दूषित पाण्याचे मोठे संकट देशभर आहे. त्याने अलिकडे उग्र स्वरूप धारण केले आहे. नद्या स्वच्छ राहिलेल्या नाहीत. शहरीकरणामुळे नद्या मध्ये सांडपाणी व औद्योगिक वसाहतीमधील दूषित द्रव्ये मिसळत आहेत. यामुळे देशातील अनेक नद्या मोठ्या प्रमाणावर दूषित झालेल्या आहेत. दिवसेंदिवस हे संकट वाढत जाणार आहे. वेळीच सावध राहावयास हवे नाहीतर भविष्यकाळात आपण काहीही करू शकणार नाही इंदूर शहरात अलिकडेच दूषित पाणी पिल्यामुळे अनेकांचा जीव गेला होता ही आठवण नुकतीच स्मरणात आहे.

**- शांताराम वाघ, पुणे**

दिनविशेष

# माझी मराठीची बोलू कौतुके...

मराठी ही आपली मातृभाषा आहे तसेच ती महाराष्ट्राची राज्यभाषाही आहे. २७ फेब्रुवारी हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात राजभाषा दिन म्हणून साजरा केला जातो. आपल्या शैलीदार लेखणीतून ज्यांनी मराठी भाषेला मोठ्या उंचीवर नेऊन ठेवले ते जेष्ठ साहित्यिक ज्ञानपीठ विजेते वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रजांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस. कुसुमाग्रजांना १९८७ साली ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. हा मराठी भाषेला मिळालेला पहिला ज्ञानपीठ पुरस्कार होता. त्यामुळे त्यांचा जन्मदिवसच मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा करण्यास महाराष्ट्र शासनाने सुरवात केली. भारतातील २२ प्रमुख भाषांपैकी मराठी ही एक प्रमुख भाषा आहे. महाराष्ट्र आणि गोवा राज्याची मराठी ही अधिकृत राजभाषा आहे. मराठी मातृभाषा असणाऱ्या लोकसंख्येनुसार मराठी ही पंधरावी तर देशातील तिसरी भाषा आहे. २००१ च्या लोकसंख्येनुसार मराठी बोलणाऱ्यांची एकूण लोकसंख्या दहा कोटींच्या पुढे आहे. मराठी भाषा ९ व्या शतकापासून प्रचलित आहे. मराठी भाषेची निर्मिती संस्कृतपासून झालेल्या महाराष्ट्री प्राकृत व अपभ्रंश या भाषांपासून झाली आहे. मराठी भाषेला गौरवपूर्ण इतिहास आहे. देशातीलच नव्हे तर जगातील प्रमुख भाषा म्हणून मराठीकडे पाहिले जाते. ज्ञानेश्वरांपासून कुसुमाग्रजांपर्यंत अनेकांनी मराठी भाषेला समृद्ध करण्याचा प्रयत्न केला.

**माझी मराठीची बोलू कौतुके**
**परी अमृतातही पैजा जिंके**
**ऐसी अक्षरे रसिके....मेळवीन**

अशा शब्दात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी मराठीचा गौरव केला आहे.

**लाभले आम्हास भाग्य...**
**बोलतो मराठी...**

अशा शब्दात कविश्रेष्ठ सुरेश भटांनी मराठीचा गौरव केला आहे. मराठी भाषा जिवंत ठेवण्याचे काम मराठी, साहित्यिक व सरकारचे आहे असेच मराठी माणसाला वाटते. मराठी साहित्यिकांना, लेखकांना मराठी भाषेविषयी जन्मजात प्रेम आहेच. अभिमान आहे. मराठी भाषा गुणवत्तापूर्ण, दर्जेदार आणि आकर्षक होईल यासाठी ते आपल्या परीने प्रयत्न करीतही आहे. महाराष्ट्र सरकारही मराठी भाषा जिवंत रहावी यासाठी प्रयत्न करीत आहे. पण महाराष्ट्र सरकारचे हे प्रयत्न तोकडे आहेत असेच म्हणावे लागेल. मराठी भाषेवर इंग्रजी भाषेचे अतिक्रमण वाढत असताना ते रोखण्यासाठी सरकार ठोस प्रयत्न करीत असल्याचे दिसत नाही. इंग्रजी माध्यमांच्या शाळांना मागणी तसा पुरवठा या तत्वाने सरकार भराभर परवानगी देत आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळांना सढळ हाताने परवानगी देणारे सरकार नवीन मराठी शाळांना परवानगी देत नाही तसेच आहे त्या शाळांना अनुदान देताना हात आखडता घेते. सरकारी कार्यालयात मराठीचा वापर अनिवार्य असताना तिथेही मराठीची गळचेपी होते. अनेक सरकारी कार्यालयात आज देखील मराठीचा वापर नावापुरताच केला जातो. केंद्र सरकारच्या कार्यलयात तर मराठीचा वापर होतच नाही. सरकारी कार्यालयात मराठीचा वापर व्हावा असा आदेश असताना त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जाते. मराठी भाषा जगवण्यासाठी, वाचवण्यासाठी राज्य सरकारने खंबीर धोरण आखायला हवे. केवळ परिपत्रक काढून उपयोग नाही तर त्याची प्रभावी अंमलबजावणी होते का याचाही शोध सरकारने घ्यावा. राज्य सरकारच्या व्यवहारात मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करण्यासंबंधीच्या धोरणाची अंमलबजावणी करणे, सरकारच्या दैनंदिन कामकाजात मराठीचा जास्तीतजास्त वापर करणे, मराठी शाळांना जी उतरती कळा लागली आहे त्यासंदर्भात ठोस निर्णय घेऊन मराठी भाषेला उर्जितावस्था मिळवून देण्याचा प्रयत्न राज्य सरकारने करावा. मराठी भाषा दिनाच्या समस्त मराठी जनांना हार्दिक शुभेच्छा!!!

**- श्याम बसप्पा ठाणेदार, पुणे**

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२७ फेब्रुवारी
१)श्रीम.ज्योती प्रकाश सप्रे
मु.थळ अलिबाग,
दि.२७-०२-१९४९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**कै.विठ्ठल चिंतामण कुंटे, ५२ वा स्मृतिदिन, जुनी कुंटे खाणावळ, बाजार पेठ अलिबाग**

## ‘माऊली मराठी, सावली मराठी’ कार्यक्रम

**मुंबई :** मराठी भाषा दिनानिमित्त ‘‘माऊली मराठी, सावली मराठी‘‘ हा विविधांगी अभिमान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा शुक्रवार दि.२७ फ ेब्रुवारी रोजी, संध्याकाळी ६ वाजता, विलेपार्ले (पूर्व) येथील मा. दीनानाथ मंगेशकर नाट्यग्रुहात साजरा होणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन विलेपार्ले कल्चरल सेंटर आणि स्थानिक आमदार पराग अळवणी यांनी केले आहे. सारस्वत बँक, प्रस्तुत हा कार्यक्रम विनामूल्य असून, अंतर्भूत नामवंत कलाकारांद्वारे प्रस्तुत भारूड, कथाकथन, वाघ्या मुरळी पारंपरिक न्नृत्य, सुप्रसिद्ध कवी, गीतकार प्रविण दवणे प्रस्तुत कवितेची आनंदयात्रा आणि मराठी भाषेला सम्रुद्ध करणारी लोकप्रिय लोकगीते, अभंग, गोंधळ, पोवाडा, गवळण, लावणी, कोळीगीत, धनगर गीत, शेतकरी गीत, भक्तीगीत इ. लोकगीत प्रकारांचे सादरीकरण या कार्यक्रमात होणार आहे.

# स्वच्छता कर्मचाऱ्यांवर अन्याय?

## • हजेरी शेड हटविण्याच्या निर्णयाने संताप • सुविधांचा प्रश्न ऐरणीवर



| नवी मुंबई | प्रतिनिधी |
नवी मुंबई हे स्वच्छ व सुंदर शहर अशी ओळख मिळवून अनेक राज्यस्तरीय व केंद्रीय पुरस्कार मिळवत आहे. मात्र ज्या कर्मचाऱ्यांच्या जीवावर शहराची ही ओळख मिळविली आहे, त्यांच्यावरच आता अन्याय होत असल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील वाशी परिसरात कर्मचाऱ्यांसाठी उभारण्यात आलेली निवारा शेड हटविण्याची प्रक्रिया सुरू झाल्याने महिला व पुरुष कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

वाशी बस डेपो मागील भाजी मार्केट परिसरात, वाशी गुरुद्वाराच्या मागील बाजूस हे शेड भूमी कन्स्ट्रक्शन या कंत्राटदारामार्फत उभारण्यात आले होते. या ठिकाणी दररोज स्वच्छता कर्मचाऱ्यांची हजेरी घेतली जाते. तसेच महिला व पुरुष कर्मचारी येथेच गणवेश बदलतात. तसेच दुपारच्या विश्रांतीवेळी भोजन करतात. शहराच्या विविध भागांत साफसफाई आणि सौंदर्यीकरणाची जबाबदारी पार पाडणाऱ्या या कर्मचाऱ्यांसाठी हे शेड केवळ औपचारिक जागा नसून मूलभूत गरज बनली आहे. मात्र, गुरुद्वारा समितीकडून कोणताही प्रत्यक्ष त्रास होत नसतानाही हे शेड हटविण्याची मागणी करणारे पत्र मनपाला देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्या पत्राच्या अनुषंगाने मनपाकडून शेड हटविण्याची प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

### पर्यायी व्यवस्था करावी

हे स्वच्छता कर्मचारी आता गणवेश कुठे बदलणार? महिला कर्मचाऱ्यांनी कपडे बदलण्यासाठी सुरक्षित जागा कुठे मिळणार? दुपारचे भोजन उघड्यावर करावे लागणार का? शहर स्वच्छ ठेवणाऱ्यांनाच मूलभूत सुविधा नाकारणे कितपत न्याय्य आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे. स्वच्छता कर्मचाऱ्यांनी याप्रकरणी प्रशासनाकडे न्यायाची मागणी केली असून, पर्यायी व्यवस्था न करता शेड हटविण्यात येऊ नये, अशी ठाम भूमिका घेतली आहे. शहराच्या आरोग्याची जबाबदारी सांभाळणाऱ्यांच्या सन्मान आणि सुविधांचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

## अशोक लोखंडे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश

**मुरुड जंजिरा :** केंद्र शासनाच्या शाळेतील आर्थिक दुर्बल घटकांमध्ये मोडणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांसाठी एनएमएमएस परीक्षेचे नियोजन केले जाते. आर्थिक दुर्बल घटकांमधील मुलांना शैक्षणिक प्रेरणा व आर्थिक मदत होण्याच्या दृष्टिकोनातून ही परीक्षा देश पातळीवर घेण्यात येते. पीटसई येथील अशोक लोखंडे विद्यालय हे ग्रामीण व डोंगराळ भागातील विद्यालय असताना देखील या शाळेतील १४ विद्यार्थी या परीक्षेत बसले होते. त्यापैकी सहा विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यामुळे या शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे. येथील शिक्षक वृदांनी मुख्याध्यापक अरुण खुळपे यांच्या प्रमुख मार्गदर्शनखाली एनएमएमएस परीक्षेसाठी विशेष मेहनत घेत हे यश प्राप्त केले आहे. ही परीक्षा डिसेंबर २०२५मध्ये घेण्यात आली होती. या परीक्षेचा नुकताच निकाल लागला असून येथील विद्यार्थी अव्वल ठरले आहेत. उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन खेळूशेट वाजे व विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण खुळपे, सर्व मार्गदर्शक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



## ‘ज्येष्ठांची नियमित आरोग्य तपासणी गरजेची’



| रोहा | प्रतिनिधी |
ज्येष्ठ नागरिक मंडळ रोहा व डॉ. आशिता नांदगावकर यांच्या संयुक्त विद्यमाने रोहा न.प.च्या ज्येष्ठ नागरिक सभागृहामध्ये मंगळवारी (दि.२४) आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या आरोग्याची या वयात तपासणी करून घेणे अत्यंत आवश्यक आहे, असे ज्येष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष पी.बी. सरफळे रावसाहेब यांनी सांगितले.

यावेळी मंडळाचे उपाध्यक्ष गायकवाड, सचिव सुरेश मोरे, खजिनदार प्रकाश पाटील, प्रसिद्ध प्रमुख अरुण करंबे, सुरेश मेहता, नंदकुमार भादेकर, मंगेश जोशी, शरद गुडेकर, दत्ताराम तवटे, धनपाल तिरवे, अनुराधा धुमाळ तसेच शेकडो जेष्ठ नागरिक उपस्थित होते.

या शिबिरात सुमारे १०० ज्येष्ठ नागरिकांच्या संधी वात, सांधेदुखी, शुगर, कॅलशियम, मणके, हाडे, स्नायूंची तपासणी करण्यात आली. यावेळी रुग्णांची डॉ. आशिता नांदगावकर, डॉ.गजेंद्र शिलीमकर, डॉ.शेखर घोडके यांनी तपासणी व मौलिक मार्गदर्शन केले. सुरुवातीला नेहमीप्रमाणे कामकाजची मासिक सभा झाली. सभेपूर्वी राज्याचे उप मुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार व जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष स्व.भाईसाहेब पाशीलकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

## कर्जत नदीघाट स्वच्छता मोहीम



| नेरळ | प्रतिनिधी |
कर्जत शहरातून वाहणाऱ्या उल्हास नदीचे पावित्र्य राखण्यासाठी कर्जत नगरपरिषदमधील स्वीकृत नगरसेवक ॲड. रोहित ओसवाल यांनी पुढाकार घेतला आहे. नदी स्वच्छता मोहीमचे कार्यकर्ते असलेल्या ॲड. ओसवाल यांनी संत निरंकारी मिशन यांच्या माध्यमातून नदीघाट परिसरात स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ करून घेतला.

स्वच्छ पाणी आणि स्वच्छ मन या ध्येयाने संत निरंकारी मिशन काम करीत असून या संस्थेचे सचिव जोगिंदर सुखिया यांनी देशात प्रोजेक्ट अमृत राबविण्याचा निर्धार केला आहे. या मोहिमेअंतर्गत उल्हास नदीचा परिसर स्वच्छ करण्याची मोहीम संत निरंकारी मिशनकडून हाती घेण्यात आली. नदी परिसरात असलेल्या इमारतीत राहणारे कर्जत नगरपरिषदेचे स्वीकृत नगरसेवक ॲड. रोहित ओसवाल यांनी संत निरंकारी मिशनला सर्व सहकार्य करण्याचे प्रयत्न केले. संत निरंकारी मिशनचे असंख्य उल्हास नदी परिसरात घाट स्वच्छ करण्यात उतरले आणि काही तासात घाट परिसर स्वच्छ झाला. नद्या, तलाव, विहिरी आणि नैसर्गिक झरे यांचे संवर्धन करण्यासाठी मिशनकडून कार्य सुरू आहे. या स्वच्छता मोहिमेत काही ट्रॅक्टरचे ट्रॉली भरून कचरा नदीच्या पाण्यातून बाहेर काढण्यात आली. तसेच, घाटात वेगवेगळ्या प्रकारचा साचून राहिलेल्या कचऱ्याचे संकलन देखील करण्यात आले. त्या ठिकाणी असलेल्या कचरा कुंड्या कचऱ्याने भरून गेल्या होत्या. त्यामुळे दुर्गंधीदेखील पसरली होती. मात्र ही मोहीम राबविताना परिसर दुर्गंधीमुक्त होईल, याकडेदेखील संत निरंकारी मिशनकडून लक्ष देण्यात आले.



## सरकत्या जिन्याचे काम अंतिम टप्प्यात

| नेरळ | प्रतिनिधी |
मध्य रेल्वेवरील कर्जत एंडकडे असलेल्या नेरळ जंक्शन रेल्वे स्थानकात उभारण्यात येत असलेल्या सरकता जिन्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. फलाट एकवर हा नवीन सरकता जिना बसविला जात असून त्या फलाटावर आणखी एक सरकता जिना असून तो सरकता जिना मुंबई दिशेकडे आहे.

मध्य रेल्वेच्या मेन लाईनवरील कर्जत दिशेकडे असलेल्या नेरळ जंक्शन स्थानकाचा कायापालट केला जात आहे. या स्थानकात प्रवासी वर्गाच्या सोयीसाठी नव्याने विकासकामे केली जात आहेत. ही विकासकामे करताना प्रवाशांची सोय याला प्राधान्य देण्यात आले आहे. नेरळ जंक्शन स्थानकातून माथेरानसाठी मिनीट्रेन सोडली जात असल्याने मोठ्या प्रमाणावर पर्यटनासाठी जाणारे पर्यटक यांची गर्दी असते. त्यात मुंबईकडून येणाऱ्या उपनगरीय लोकलमधून प्रवासी नेरळ स्थानकात अधिक संख्येने येत असतात. ही बाब लक्षात घेऊन नेरळ स्थानकात फलाट एकवर एकाच वेळी तीन पादचारी पूल तसेच सरकता जिना कार्यान्वित केला आहे. हा सरकता जिना फलाटाच्या मध्यभागी असल्याने वृद्ध प्रवासी वर्गासाठी मदतगार ठरणार आहे.

मात्र नेरळ स्थानकातील प्रशासनाकडून हा सरकता जिना कार्यान्वित करण्यात आलेला नाही. त्यामुळे प्रवासी वर्गाकडून नेरळ रेल्वे प्रवासी संघटनेकडे सातत्याने मागणी होत असून मध्य रेल्वे प्रशासनाने तात्काळ सरकता जिना कार्यान्वित करावा, अशी मागणी नेरळ रेल्वे प्रवासी संघटना यांच्याकडून अध्यक्ष संदीप म्हसकर यांनी नेरळ स्थानक प्रबंधक गणपत पाटील यांच्याकडे करण्यात आली होती. त्यानंतर सरकता जिन्याचे काम अंतिम टप्प्यात नेले जात असून तेथे सध्या जिन्याच्या साफ सफाईची कामे कर्मचारी वर्गाकडून सुरू आहेत.

## नागरिकांनी कर्करोग तपासणीसाठी पुढे यावे

### आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचे आवाहन

| मुंबई | प्रतिनिधी |
राज्यात सर्व प्रकारच्या कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे. कर्करोगाच्या तातडीने निदानासाठी सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये तपासणी करण्यात येत आहे. तपासणीसाठी नागरिकांमध्ये जागृती वाढविण्यात येत असून नागरिकांनी या तपासणीसाठी पुढे यावे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले. कर्करोग तपासणीसाठी राज्यात सध्या आठ वाहने असून यांची संख्या वाढवून सर्व जिल्ह्यांमध्ये वाहने उपलब्ध करुन दिली जातील, असे त्यांनी सांगितले. महिलांमधील स्तनाच्या कर्करोगासंदर्भातील तपासणीवर भर देण्यात येत असून याअंतर्गत ३ कोटी २० लाख महिलांची तपासणी करण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

कर्करोगाचे वेळेत निदान व्हावे, यासाठी उपाययोजना करण्यासंदर्भात सदस्य सुनील प्रभू यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. सदस्य सर्वश्री अमीन पटेल, रईस शेख, बाबासाहेब देशमुख, भास्कर जाधव, राजकुमार बडोले, शेखर निकम, दिलीप लांडे, तमिल सेल्वन, समीर कुणावार, किशोर पाटील, सुलभा खोडके, देवयानी फरांदे आदींनी या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सहभाग घेतला. या लक्षवेधीला उत्तर देताना आरोग्यमंत्री आबिटकर बोलत होते.

याबाबत अधिक माहिती देताना आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, १६ ऑक्टो २५ च्या शासनाच्या धोरणाप्रमाणे तालुका, जिल्हा आणि राज्यस्तर अशा तीन स्तरावर उपचार पद्धती राबवून जागृती, तपासणी आणि उपचार यावर भर दिला जात आहे. २६ ठिकाणी पीपीपी तत्वावर रेडिओथेरपीचे केंद्र सुरू करण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या वतीने ९ ते १३ वर्ष वयोगटातील मुलींच्या तपासणीची मोहीम देशभरात सुरू होणार असून त्यांचे लसीकरण देखील करण्यात येईल. मुंबईत कर्करोगाच्या तपासणी आणि उपचाराबाबत महानगरपालिका आयुक्तांसोबत बैठक घेण्यात येईल. कोकणामध्ये कर्करोगाच्या तपासणीसाठी केंद्र सुरू करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

### विद्यार्थ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित होणार | चालकांच्या कामकाजावरही राहणार नजर

# ‘डॅश कॅम’ टिपणार स्कूल बसचा प्रवास

| ठाणे | प्रतिनिधी |
विद्यार्थ्यांची सुरक्षितता ही शाळांसाठी सर्वोच्च प्राधान्यांपैकी एक आहे आणि वाहतूक ही बहुतेकदा सर्वात असुरक्षित क्षेत्र असते. दररोज, लाखो मुले स्कूल बसने शाळेत जातात. पालकांना या प्रवासादरम्यान आपल्या पाल्याविषयी पूर्ण सुरक्षितता हवी असते. यासाठी विद्यार्थ्यांना शाळेत घेऊन जाणारा स्कूल बसचालक गाडी कशी चालवतो, त्याच्या हालचाली कशा आहेत यावर आता वॉच ठेवला जाणार




आहे. त्यासाठी ८ हजार स्कुल बसेसवर डॅश कॅम बसवण्यात येणार असल्यामुळे मुला-मुलींचा प्रवास अधिक सुरक्षित होणार आहे. हा डॅश कॅम स्कूल बसेसचा मार्ग आणि पुढील व मागील दृश्य टिपणार आहे. अत्याधुनिक डॅश कॅम बसवण्याच्या सूचना सर्व स्कूल बसचालकांना वाहतूक शाखेने दिल्या आहेत.

जिल्हास्तरीय स्कूल बस सुरक्षितता समितीची त्रैमासिक बैठक मंगळवारी ठाणे शहर वाहतूक शाखेच्या उपायुक्त कार्यालयात पार पडली. ही बैठक ठाणे शहर वाहतूक विभागाचे उपायुक्त पंकज शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी पंकज शिरसाट तसेच समितीचे सदस्य ठाणे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी रोहित काटकर आणि कल्याणचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांनी विविध सुरक्षाविषयक निर्देश दिले. यावेळी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. स्कूल बसच्या आतील भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. पण बस चालू असताना बाहेरील भागाची दृश्य टिपली जात नाहीत. दुर्दैवाने एखादा अपघात झाला तर नेमकी चूक कुणाची हे या डॅश कॅममुळे लगेच कळणार आहे. बसचालक कशा प्रकारे गाडी चालवतो हेदेखील समजणार आहे.

### वाहतूक कोंडी टळेल

डॅश कॅम म्हणजे एक छोटा व्हिडीओ कॅमेरा असून तो ड्रायव्हिंग सुरू असताना समोरील रस्ता व ट्रॅफिकची दृश्य सतत रेकॉर्ड करत असतो. एखादा गैरप्रकार घडल्यास ही दृश्य पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येणार आहेत. स्कूल बसच्या मालकांनाही चालकांच्या कामकाजावर देखरेख ठेवता येणार आहे. स्कूल बस शाळा भरण्यापूर्वी व सुटण्यापूर्वी अर्धा तास आधीच शाळेजवळ उभ्या कराव्यात. त्यामुळे वाहतूक कोंडी टळेल, अशा सूचना बैठकीत करण्यात आल्या.

### सुरक्षेला सर्वाधिक प्राधान्य

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. पोलीस तसेच अन्य प्राधिकरणे व प्रशासन, परिवहन विभाग, शाळा व्यवस्थापन, बसमालक व चालक यांनी समन्वयाने काम केल्यास शालेय विद्यार्थ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित व निर्धास्त होईल. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे ठाणे शहर वाहतूक शाखेचे उपायुक्त पंकज शिरसाट यांनी सांगितले.

# निवडक

## महेश मोरेंना डॉक्टरेट पदवी प्रदान



**कोलाड :** नवी दिल्ली येथे पार पडलेल्या दीक्षान्त कार्यक्रमामध्ये महेश गोपाळ मोरे यांना सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सीडरब्रुक युनिव्हर्सिटी यांनी गोल्ड मेडल देऊन डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी ही पदवी प्रदान करण्यात आली. महेश मोरे हे गेली अनेक वर्षे रायगड जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करीत आहेत. ते कृषी पदवीधर असून त्यांना समज सेवेतील असलेली आवड पाहता अनेक कायद्यांना धरून त्यांनी आदिवासी समाजा मध्ये परिवर्तन घडवून आणलेले पाह्यला मिळत आहे. वनहक्क कायदा, अन्न सुरक्षा कायदा, रोजगार हमी कायदा, माहितीचा अधिकार कायदा, शिक्षण हक्क कायदा, बाल विवाह प्रतिबंधक कायदा, कुळ कायदा यावर प्रभावीपणे कार्य केल्यामुळे त्यांना यापूर्वी रायगड भूषण पुरस्कार,(पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते) व माणगाव तालुका आदिवासी समाजाच्या वतीने आदिवासी मित्र पुरस्कार देण्यात आला तसेच रायगड जिल्हाधिकारी मा. डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते जनजाती गौरव सन्मान देऊन गौरविण्यात आले होते.

## विठ्ठल रूक्मिणी मंदिराचा वर्धापन दिन

**खांब :** रोहा तालुक्यातील अध्यात्मिक व धार्मिक क्षेत्रात नावाजलेल्या श्री क्षेत्र तळवली येथे बुधवारी (दि.२५) श्री हनुमान व विठ्ठल रूक्मिणी मंदिराचा वर्धापनदिन सोहळा मोठ्या भक्तीभावाने साजरा करण्यात आला. या वर्धापन दिन सोहळ्याप्रसंगी देवतांचे अभिषेक व महापूजा, कळव स्थापना, ध्वजारोहण, श्रीसत्यनारायणाची महापूजा, आरती, श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे ९ व १२ व्या अध्यायाचे सामुदायिक पारायण, हरिपाठ व सायं. ७ वा. हभप उदय महाराज बंद्री यांची



हरिकिर्तनरूपी सेवा त्यानंतर महाप्रसाद व जागर भजन आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम पार पडले. या सोहळ्यासाठी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी उपस्थिती दर्शवून विविध प्रकारच्या कार्यक्रमांचा लाभ घेतला. तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामस्थ व महिला मंडळ तसेच जय हनुमान क्रीडा मंडळाचे सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले.

## अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता



**खांब :** रोहा तालुक्यातील वरसगाव येथे संपन्न झालेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता काल्याचे किर्तन व पालखी मिरवणुकीने मोठ्या भक्तीभावाने करण्यात आली. या सप्ताहप्रसंगी दररोज पहाटे काकड आरती, ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायण, संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या गाथ्यावरील भजने, सायं. प्रवचन व सामुदायिक हरिपाठ, महाप्रसाद तर रात्रौ. हरिकिर्तन व सामुदायिक जागर भजन आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम करण्यात आले. तर गुरूवर्य ब्रह्ममूर्ती जगन्नाथ महाराज गोसावी (लांजा) यांचे काल्याचे किर्तन व भव्य पालखी मिरवणुकीने या सप्ताहाची मोठ्या भक्तीभावाने सांगता करण्यात आली. या सप्ताहाचे यशस्वीतेसाठी समस्त ग्रामस्थ व महिला मंडळ व तरूण मंडळाचे सदस्य यांनी मोलाचे सहकार्य केले.

## ‘गाव तिथे स्मशानभूमी’ योजना विचाराधीन

### ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे प्रतिपादन

**मुंबई :** प्रत्येक गावात स्मशानभूमी असणे आवश्यक असल्याच्या दृष्टीने ‘गाव तिथे स्मशानभूमी’ ही नवीन योजना ग्रामविकास विभागाच्या विचाराधीन असून, राज्यातील सर्व गावांमध्ये ही सुविधा उपलब्ध करून देण्याचा सरकारचा मानस असल्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी विधानपरिषदेत सांगितले. विधानपरिषद सदस्य परिणय फुके यांनी राज्यातील स्मशानभूमींच्या उपलब्धतेबाबत अर्धा तास चर्चेत प्रश्न उपस्थित केला, त्यास उत्तर देताना मंत्री गोरे बोलत होते. ते म्हणाले की, शासनाच्या कोणत्याही विकास योजनेसाठी निधी मंजूर करताना संबंधित गावात स्मशानभूमी असल्याचा दाखला बंधनकारक करण्यात आला आहे. स्मशानभूमी नसलेल्या गावांमध्ये प्रथम त्या कामासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल, त्यानंतरच इतर विकास कामांना मंजुरी दिली जाईल, असा निर्णय घेण्यात आला आहे. ज्या ठिकाणी शासकीय जमीन उपलब्ध नाही, तेथे खासगी जमीन संपादन करण्यासाठी डीपीडीसीचा निधी वापरण्याची तरतूद करण्यात आली असून, जिल्हाधिकाऱ्यांना याबाबत सूचना देण्यात आल्या.

## तीन पावसाळे उलटूनही घरं नाहीत

### घरकुल योजनेबाबत विजय वडेट्टीवार यांचा सवाल

**मुंबई :** राज्यातील घरकुल योजनेतील घरं मंजूर होऊनही गेल्या तीन वर्षांपासून गरिबांना मिळाली नाही. या योजनेसाठी हक्काचा निधी मिळालेला नाही. या गंभीर मुद्द्यावरून विधानसभेच्या प्रश्नोत्तराच्या तासात विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आक्रमक पवित्रा घेत सरकारला धारेवर धरले. राज्यात अनेक लाभार्थ्यांना घरकुल योजनेअंतर्गत घरे मंजूर झाली आहेत. मात्र, गेल्या तीन वर्षांपासून या घरांसाठीचा निधी रखडलेला आहे. अनेक लाभार्थ्यांनी घरांची बांधकामे सुरू केली आहेत, परंतु पैसे न मिळाल्याने ही कामे अपूर्ण अवस्थेत आहेत. लोक आपली घरे सोडून कुठे राहत असतील, याचा विचार सरकार करते का? सरकारकडून सतत लवकरात लवकर निधी देऊ, ही उत्तर आहेत. हा लवकर नक्की कधी येणार? असा सवाल वडेट्टीवार यांनी विधानसभेत विचारला. तीन वर्षांपासून निधी रखडल्याने लाभार्थ्यांनी तीन पावसाळे त्यांनी कसे काढले असतील, याची सरकारला जाणीव आहे का? हे अधिवेशन संपेपर्यंत तरी गरिबांच्या खात्यात निधी जमा होणार का? असे प्रश्न वडेट्टीवार यांनी घरकुल योजनेबाबत उपस्थित केले.घरकुल योजनेबाबत विधानसभा अध्यक्षांनी गंभीर दखल घेतली. केंद्र शासनाकडून या उपक्रमासाठी किती निधी येणे अपेक्षित आहे आणि तो कधी उपलब्ध होणार, याचा सविस्तर पाठपुरावा करून हे अधिवेशन संपण्यापूर्वी शासनाने संपूर्ण माहिती सभागृहासमोर सादर करावी, असे निर्देश अध्यक्षांनी दिले आहेत.

## निवडक



### गतिरोधक दर्शक पट्ट्याची मागणी

**सुतारवाडी** : भिरा फाटा ते विळे दरम्यान गतिरोधकांवर गतिरोधक दर्शक पट्ट्या नसल्यामुळे अनेक वाहनांची आदळा आपट होते. या दरम्यान बारा गतिरोधक आहेत. मात्र, अनेक महिन्यांपासून या गतिरोधकांवर गतिरोधक दर्शक पट्ट्या नाहीत. यामुळे दुचाकी वाहन चालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अन्य वाहनांची या ठिकाणावरून जाताना मोठ्या प्रमाणात आदळा आपट सातत्याने होत असते. सुतारवाडी ते पुणे अंतर शंभर किलोमीटर आहे, त्यामुळे येथून जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. या परिसरातून मोठमोठ्या कॉइल घेऊन जाणारे ट्रेलर सुद्धा सातत्याने ये-जा करत असतात. सुतारवाडी आणि अन्य परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर फार्म हाऊस असल्यामुळे वर्षभर पर्यटक येत असतात. विळा परिसरात मोठ्या कंपन्या असल्यामुळे कच्चामाल घेऊन येणारे आणि तयार माल घेऊन जाणाऱ्या वाहनांची वर्दळ सतत असते. त्याचप्रमाणे म्हस्करवाडी ते ढोकळेवाडी दरम्यान सात खडी क्रेशर आहेत. तेथून खडी नेण्यासाठी अनेक डंपर सातत्याने धावत असतात. काही ठिकाणचे गतिरोधक तर सपाट झालेले आहेत. त्यामुळे गतिरोधक दिसत नसल्यामुळे दुचाकी वाहन चालकाचे अपघात झालेले आहेत. त्यामुळे या परिसरामध्ये लवकरात लवकर गतिरोधक दर्शक पट्ट्या बसण्याची मागणी अनेक नागरिकांनी केली आहे.

### मराठी गौरव दिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धा

**श्रीवर्धन** : मराठी भाषेचा अभिमान जागवण्यासाठी व विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजवण्यासाठी सार्वजनिक वाचनालय, श्रीवर्धन आणि कोकण मराठी साहित्य परिषद, शाखा श्रीवर्धन यांच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी भाषा गौरव दिना'निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवारी (दि.२७) फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४.३० वाजता सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात होणार आहे. मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांमध्ये भाषाप्रेम, वक्तृत्वकौशल्य आणि वाचनाची आवड वाढवण्यासाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत विविध वयोगटांतील विद्यार्थ्यांचा सहभाग अपेक्षित असून कार्यक्रमाबाबत परिसरात उत्सुकता निर्माण झाली आहे. स्पर्धेचे तीन गट करण्यात आले आहेत. इयत्ता २ री ते ४ थी गटासाठी मला आवडलेली गोष्ट हा विषय देण्यात आला असून प्रत्येक स्पर्धकाला ३ मिनिटांचा कालावधी दिला जाणार आहे. इयत्ता ५ वी ते ७ वी गटासाठी मला आवडलेले पुस्तक हा विषय असून ५ मिनिटांची वेळमर्यादा असेल. तसेच इयत्ता ८ वी व ९ वी गटासाठीही 'मला आवडलेले पुस्तक' या विषयावर ५ मिनिटांची वक्तृत्व स्पर्धा होणार आहे. विद्यार्थ्यांनी निवडलेल्या गोष्टी किंवा पुस्तकाविषयी आत्मविश्वासाने व प्रभावीपणे मांडणी करावी, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला चालना मिळून त्यांच्यातील वाचन, चिंतन आणि अभिव्यक्ती कौशल्याला प्रोत्साहन मिळणार आहे. या कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, शिक्षक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मराठी भाषा गौरव दिन साजरा करावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### नवघरच्या विद्यार्थ्यांची अभ्यास सहल

**पाली/बेणसे** : भारत सरकारच्या 'राष्ट्रीय आविष्कार अभियान' अंतर्गत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागावी आणि जागतिक दर्जाच्या वास्तूंचा अभ्यास करता यावा, यासाठी आयोजित राज्यबाहेरील शैक्षणिक सहलीसाठी सुधागड तालुक्यातील आदर्श शाळा नवघर येथील १२ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. सहल दि. २४ ते २७ फेब्रुवारी दरम्यान गुजरात राज्यामध्ये संपन्न होत आहे. जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, शिक्षणाधिकारी ललिता दहितूले, सुधागडचे गटशिक्षणाधिकारी बांगारे, केंद्रप्रमुख अनिल राणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील इयत्ता ६ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांची विज्ञान विषयाची विशेष परीक्षा घेण्यात आली होती. शाळांचा सरासरी निकाल उत्कृष्ट लागला, अशा जिल्ह्यातील टॉप ५ शाळांची निवड या विशेष सहलीसाठी करण्यात आली. यामध्ये नवघर शाळेने आपल्या गुणवत्तेच्या जोरावर स्थान पटकावले आहे. चार दिवसीय सहलीमध्ये विद्यार्थी गुजरातमधील सायन्स सिटी, स्टॅचू ऑफ युनिटी, नीलकंठधाम, अक्षरधाम, सयाजीराव म्युझियम, जंगल सफारी आणि लेजर शोचा समावेश आहे.



### आरक्षणासाठी नागरिकांची गर्दी

**पनवेल** : होळी सण जवळ आल्यामुळे पनवेल एस.टी. डेपोमध्ये आरक्षणासाठी नागरिकांची मोठी गर्दी उसळली आहे. कोकणात जाण्यासाठी प्रवासी आगाऊ तिकीट काढण्यासाठी सकाळपासूनच रांगा लावत आहेत. विशेषतः चिपळूण, रत्नागिरी, खेड, गुहागर आदी मार्गांवर तिकिटांना मोठी मागणी आहे. विद्यार्थी, पालक तसेच नोकरदार वर्ग होळी सण कुटुंबासोबत साजरा करण्यासाठी कोकणाकडे रवाना होणार आहेत. त्यामुळे डेपो प्रशासनाने अतिरिक्त बसेसची तयारी सुरू केली आहे. गर्दी लक्षात घेता नागरिकांनी ऑनलाईन आरक्षणाचा पर्यायही वापरावा, असे आवाहन करण्यात आले आहे.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे. वय २५ ते ४५ ९२७०५६०४५६
- अलिबाग एसटी स्टँडजवळ दुकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९
- सुवर्णसंधी (WORK FROM HOME) वाढत्या महागाईमध्ये एक्स्ट्रा इन्कम कसे घेऊ शकतो? घरबसल्या कामाची सुवर्णसंधी नोकरदार, गृहिणी, विद्यार्थी इतर सर्वांसाठी घरातून मोबाईलवरून किंवा ऑफिसमधून काम करा. Income- 12000 To 15000 Age 18+ Contact Number- 7744956912
- जाहिरात : 'विहीर' आपल्या शेती, वाडी, बंगला सोसायटीत पाण्याच्या सोयीसाठी RCC रिंगाची विहीर बनवून घेण्यासाठी संपर्क करा. रणजित पाटील. फोन : ९८३४३०३९४१, ९८८१६३७०४७ अलिबाग

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# डंपर व्यवसाय आर्थिक संकटात



- रॉयल्टी मिळण्यास होतोय विलंब
- वीट मालकांचे मोठे नुकसान

**। महाड । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील डंपर व्यावसायिक सध्या मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत. खडी, वाळू तसेच विटा वाहतूक करणाऱ्या वाहनांना रॉयल्टी मिळण्यात होत असलेल्या विलंबामुळे व्यवसाय ठप्प होण्याच्या मार्गावर आहे. शासनाच्या खनिज विभागाकडून आवश्यक परवानग्या व रॉयल्टी वेळेवर उपलब्ध होत नसल्याने अनेक डंपर मालकांना गाड्या उभ्या ठेवाव्या लागत आहेत. त्यातच रत्नागिरी जिल्ह्यामधून दिवस रात्र होणाऱ्या जांभा दगडांना कशी रॉयल्टी मिळते हेच येथील व्यवसायिकांना आज तगायत समजलं नाही एका जिल्ह्याला एक न्याय व दुसऱ्या जिल्ह्याला दुसरा न्याय अशी परिस्थिती आज रायगड जिल्ह्यामध्ये पहावयास मिळत आहे.

जर सगळीकडे रॉयल्टी मिळत नाही मग जांभा दगडाला रॉयल्टी कोण देतो हा ही प्रश्न अनुउत्तरीत आहे. या गाड्या रत्नागिरी जिल्ह्यामधून दिवसाढवल्या जांभा दगडाची वाहतूक करत असतात पण या लोकांना कोणी थांबवत सुद्धा नाही व रॉयल्टी आहे की नाही हे विचारत सुद्धा नाही यामुळे साथनिक माती वीट व्यवसायिक मोठ्या अडचणीत सापडला आहे.

कारण जांभा दगडाला रॉयल्टी नाही, पण मातीचा विटा ला रॉयल्टी असल्याने माती विट वाहतूक करताना अडचण होत आहे.

महाड तालुक्यात बांधकाम व्यवसाय मोठ्या प्रमाणावर सुरू असून खडी, वाळू आणि विटांची मागणी कायम आहे. मात्र, रॉयल्टी अभावी मालाची कायदेशीर वाहतूक करता येत नसल्याने व्यापारी आणि ठेकेदार यांचेही नुकसान होत आहे. अनेक डंपर चालकांवर कर्जाचा बोजा असून हप्ते, विमा आणि इंधन खर्च भागवणे कठीण झाले आहे. काही वाहन चालकांना बँकेच्या नोटिसाही मिळू लागल्या आहेत.

रॉयल्टी प्रक्रिया सुलभ करून नियमित वितरण करण्यात यावे, तसेच प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकाली काढावीत, अशी मागणी व्यावसायिकांनी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तोडगा काढावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### ऑनलाईन प्रणालीतील अडचणी

व्यावसायिकांचे म्हणणे आहे की, ऑनलाईन प्रणालीतील अडचणी, तांत्रिक त्रुटी आणि मंजुरी प्रक्रियेत होणारा विलंबामुळे रॉयल्टी वेळेत मिळत नाही. परिणामी, रोजंदारीवर काम करणाऱ्या चालक व कामगारांनाही बेरोजगारीचा सामना करावा लागत आहे. तालुक्यातील डंपर संघटनेने प्रशासनाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे.

## जासई शाळेत बाल आनंदी बाजार उपक्रम

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी तसेच त्यांचे व्यवहार ज्ञान वाढविण्यासाठी उरण तालुक्यातील जासई प्राथमिक शाळेत मुख्याध्यापिका मीनल माळी यांच्या नेतृत्वाखाली बाल आनंदी बाजार हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचे उद्घाटन बुधवारी (दि.२५) उरण पंचायत समितीच्या शेकापच्या नवनिर्वाचित सदस्या निर्मला नरेश घरत, यामध्ये शाळेतील एकूण ४८६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

उपक्रमाला शाळेतील शिक्षकांनी चांगले सहकार्य केले.



या आनंदी बाजार उपक्रमात ६० स्टॉल लावण्यात आले होते. दरम्यान या स्टॉलमध्ये विविध प्रकारचे स्वीट, फळांचे सलाड, शीरकुर्मा, पुरणपोळी, भजी, मासवडी, मूगडाळ हालवा, लस्सी असे कितीतरी विविध पदार्थ मांडण्यात आले होते.

याप्रसंगी उरण पंचायत समितीचे माजी सभापती नरेश घरत, गटशिक्षणाधिकारी सागर पवार, विस्तार अधिकारी निर्मला घरत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जासई ग्रुप ग्रामपंचायत सदस्य धिरज घरत, आदित्य घरत, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा वंदना पाटील, उपाध्यक्ष गणेश पाटील, सुहास म्हात्रे, विनायक घरत, मयुरेश पाटील, विमल केणी यांची उपस्थित होते.

### रेल्वे स्थानकासमोर रिक्षांची गर्दी

पनवेल : पनवेल रेल्वे स्थानकाच्या शेजारी असलेल्या नवी मुंबई परिवहन सेवा बस डेपोसमोर मोठ्या प्रमाणात रिक्षा उभ्या राहत असल्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. डेपोमधून बस बाहेर काढताना चालकांना अडथळ्यांचा सामना करावा लागत असून प्रवाशांनाही उशीर सहन करावा लागत आहे. सकाळ-संध्याकाळच्या गर्दीच्या वेळी परिस्थिती अधिक बिकट होते. याकडे वाहतूक विभागाने लक्ष देऊन योग्य नियोजन करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## 'छ.शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचा जनतेने लाभ घ्यावा'

**। तळा । प्रतिनिधी ।**

शासनाच्या महसूल विभागामार्फत क्षेत्रीय स्तरावर ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचा महसूल विभागाशी संबंधीत दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकाली काढणे तसेच महसूल प्रशासन आधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतीमान करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील तालुक्यामध्ये मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान करण्याबाबतचा निर्णय शासनाने पारीत केला आहे. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचा टप्पा क्र. १ हा सुरु होत असून तळा तालुक्यातील तळा मंडळामध्ये ७ मार्च रोजी अभिनव विद्यामंदीर उसर खुर्द येथे सकाळी ११ पासून सुरु होणार आहे. या दिवशी महसूल विभागाकडून उत्पन्नाचा दाखल, रहिवाशी दाखल, डिजीटल सातबारा आदी नागरी सुविधा देण्यात येणार आहेत. सदर शिबीरामध्ये जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार स्वाती पाटील यांनी केले आहे.

## तळा बाजारपेठ रंगानी सजली

**। तळा । प्रतिनिधी ।**

अवघ्या चार दिवसांवर होळीचा सण येऊन ठेपला असल्याने तळा बाजारपेठेत होळीसाठी लागणाऱ्या विविध साहित्यांना मागणी वाढली आहे. होळी, धुळवड, रंगपंचमीसाठी आकर्षक पिचकाऱ्यांसह विविध रंग तळा बाजारपेठेत विक्रीसाठी दाखल झाले असून बच्चे कंपनीसह नागरिकांकडून हे साहित्य खरेदी करण्यास सुरुवात झाली आहे. भारतीय संस्कृतीत होळी सणाला अत्यंत महत्व असून सर्वत्र पारंपरिक पद्धतीने होळीचा सण अगदी उत्साहात साजरा केला जातो.

होळीनंतर येणारे धूलिवंदन हे दोन दिवस रंगाची उधळण करीत नागरिक रंग खेळण्याचा आनंद घेतात. या दिवसांची तयारी करण्यासाठी बाजारामध्ये रंगाची खरेदी करण्यात ग्राहक मग्न आहेत.



विक्रेत्यांकडून रंग उडविण्यासाठी असलेल्या पिचकाऱ्या या विविध स्वरूपात विक्रीसाठी ठेवण्यात आल्याने बच्चे कंपनी आकर्षीत होऊन या पिचकाऱ्यांसह रंगपंचमीचे साहित्य खरेदी करीत असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. दरम्यान येत्या काही दिवसात ग्राहकांच्या गर्दीमध्ये अजून वाढ होण्याची शक्यता विक्रेत्यांनी व्यक्त केली आहे.

### मराठी भाषा गौरव दिनाचे आयोजन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

जागतिक मराठी भाषा दिनानिमित्ताने महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पनवेल व कोकण मराठी साहित्य परिषद,नवीन पनवेल शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिन समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवारी (दि.२७) फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात होणाऱ्या या समारंभास महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लोककवी प्रशांत मोरे हे प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे. कोकण मराठी साहित्य परिषद नवीन शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी यांची असणार आहे.

## आंबा पिकाच्या पंचनाम्याची मागणी

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यातील अनेक ठिकाणी हवामानातील सतत बदलामुळे आंब्याचा मोहर करपल्याचे चित्र दिसून आले आहे. यावर्षी आंबा पिक चांगल्या पद्धतीने येईल अशी अपेक्षा होती; मात्र वातावरणातील अनिश्चिततेमुळे मोहर वाळल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक बागांमध्ये मोहर जळाल्याने फळधारणेवर थेट परिणाम झाला असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान गंभीर स्वरूपाचे झाले आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, हवामान बदलामुळे झालेल्या नुकसानीची केवळ पाहणी पुरेशी नाही. नुकसानग्रस्त बागांचे पंचनामे करून शासनाकडे अहवाल पाठवणे ही कृषी विभागाची जबाबदारी आहे. शासनाच्या निर्देशांनुसार पिक विमा योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना योग्य ती नुकसानभरपाई मिळावी,



अशी मागणी सर्व शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय किसान संघ रायगड जिल्हावतीने तहसीलदार व कृषी विभागाकडे निवेदन दिले. संघटनेचे पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रशासनाला ठामपणे सांगितले की, पंचनामे न झाल्यास शेतकऱ्यांना न्याय मिळणार नाही. भारतीय किसान संघाने स्पष्ट इशारा दिला आहे की, कृषी विभागाने तातडीने सर्व नुकसानग्रस्त ठिकाणी पंचनामे करून अहवाल शासनाकडे पाठवावा. अन्यथा शेतकऱ्यांना रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करावे लागेल.

या निवेदनावर भारतीय किसान संघ रायगड जिल्हा अध्यक्ष प्रमोद तुकाराम लंगी, जिल्हा मंत्री राजू केरू कदम, जिल्हा सहमंत्री रसिका अनिल फाटक, राजेंद्र राऊत यांच्यासह पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मोहर करपल्याने शेतकरी चिंताग्रस्त

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील शेतकरी भात शेती समवेत फळ झाडांची शेती करीत आहे. या माध्यमातून शेतकऱ्यास मोठ्या प्रमाणात नफा होत असतो. हिवाळा ऋतू सुरू होताच यावर्षी मोठ्या प्रमाणात आंब्याला मोहर आल्यामुळे शेतकरी बागायतदार चेहऱ्यावर हास्य झळकले होते. छोटे-छोटे आंबे तयार झाले. मात्र बदलत्या वातावरणामुळे आलेल्या मोहरावर विपरीत परिणाम फळ गलती आणि मोहर करपत असल्याचे लक्षणे निर्दर्शनास आहे. हा तुडतुडा किड्यांचा प्रादुर्भाव असल्याचे



शेतकऱ्याचे म्हणणे आहे.

यावर्षी विविध प्रकारचे आंबे गावरान तसंच कलबी आंबे खाण्यास मिळतील ही आशा मात्र ही फोल ठरत चालली आहे. वातावरणामुळे जवळजवळ सर्वच मोहर करपून जात असल्याचे निर्दर्शनास येते असल्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकट सापडला असून मोहरा पासून ते फलधारणेपर्यंत केलेला खर्च वाया जात असल्यामुळे शेतकरी नुकसान भरपाईच्या प्रतीक्षेत आहे.

> बदलत्या हवामानामुळे थंडी मुळे आलेला मोहराचा गुच्छे काळे पडले आहेत. तसेच कृषीतज्ञांनी सुद्धा पाहणी केली आहे. मात्र फवारणी केल्यास तातडीने लगेच प्रभाव दाखवत नाही. शासनाला आंबा बागायतदारांचे झालेल्या नुकसान संदर्भात कळविण्यात आले असून, आर्थिक नुकसान भरपाई शेतकऱ्यांस मिळू शकते.
> -सुनील निंबाळकर
> तालुका कृषी अधिकारी

## कशेळे रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाला सुरुवात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत मुरबाड राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावरील कशेळे गाव येथील रस्ता काँक्रीटीकरण करण्यात आलेला नाही.त्यामुळे रस्ता धुळीचा बनला होता, त्याबद्दल स्थानिक व्यावसायिक दुकानदार यांनी एकदा रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठी श्रमदान केले होते. शेवटी ग्रामस्थ आणि व्यापाऱ्यांच्या सततच्या मागणीनंतर आणि उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला होता. राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडून रस्त्याची कामे केली जात नसल्याने स्थानिकांनी श्रमदान करून रस्ता दुरुस्त केला होता. मात्र तरीदेखील महामंडळाला जाग येत नव्हती त्यामुळे स्थानिकांनी शेवटी राज्य रस्ते विकास महामंडळाच्या मुंबई येथील कार्यालयात जाऊन मुख्य अभियंता यांची भेट घेतली होती. तेथे मुख्य अभियंता यांनी आठ दिवसात येथील कामाला सुरुवात होईल असे आश्वासन दिले होते, मात्र महिना लोटला तरी महामंडळाकडून कोणतेही काम सुरू केले जात नव्हते.

शेवटी सोमवारी (दि.२३) फेब्रुवारी पासून कर्जत मुरबाड राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावरील कशेळे गाव येथील प्रत्यक्ष रस्त्याच्या कामाला सुरुवात केली आहे.

स्थानिक बाजारपेठेत विक्री जोरात सुरू | गोड, रसाळ फळ ग्राहकांच्या पसंतीस

# उन्हाच्या काहिलीत कलिंगडाचा आधार

**। पाली/बेणसे, उरण । प्रतिनिधी ।**

जानेवारी, फेब्रुवारी महिन्यात उन्हाची तप्त काहिली जाणवत आहे. अशातच भर उन्हात नागरिक पोटाला थंडावा म्हणून कलिंगडाचा आधार घेत आहेत. रायगड जिल्ह्यातील सुधागड (पाली) परिसरात कलिंगडाचा हंगाम सुरू झाला असून,सतत गजबजलेल्या उन्हेरे फाटा व स्थानिक बाजारपेठेत या फळाची विक्री जोरात सुरू झाली आहे. पाली सुधागडात उन्हाच्या झळा अधिक तीव्र आहेत, त्यामुळे येथे कलिंगडाला मोठी मागणी दिसून येतेय. तसेच, सुधागड तालुक्यातील ओसाड आणि नापीक जमिनीवर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कलिंगडासारखे नंदनवन



फुलवण्यात येत आहे. हे पीक साधारणपणे जानेवारी-फेब्रुवारीमध्ये लावले जाते. पाली खोपोली राज्यमहामार्गावर उन्हेरे फाटा येथे मोठ्या प्रमाणावर कलिंगडाची आवक सुरू असून ५० रुपयांपासून १५०, २०० अडीशे रुपयांपर्यंत आकारानुसार कलिंगड उपलब्द आहेत. गोड, रसाळ व गरयुक्त कलिंगड ग्राहकांच्या पसंतीस येतायत. दिवसेंदिवस तापमानाचा पारा चढत असल्याने कलिंगड खरेदी करण्यासाठी ग्राहकांची झुंबड पहावयास मिळतेय. येथील उन्हेरे फाट्यावर २० ते २५ वर्षांपासून कलिंगड विक्रीचा व्यवसाय करणारे सुनिल ठोंबरे म्हणाले की अनेक वर्षे मी इथं व्यवसाय करतो. यावर्षी दरवर्षीच्या तुलनेत कलिंगडाचे दर जास्त आहेत. सध्या २० ते २५ हजार रुपये टन कलिंगड मिळत आहेत. येथील कलिंगड उच्च प्रतीचे गोड, खुसखुशीत कलिंगड मिळतात. सध्या पाली, रोहा, इंदापूर माणगाव महाड भागात कलिंगड लागवड करण्यात आली आहे. ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे ठोंबरे यांनी सांगितले.

### उरणमध्ये संकरीत कलिंगडाचे वाण

उरणमध्ये अलिकडच्या काळात विविध संकरीत जातींचे वाण विकसित झाल्यामुळे पावसाळयात लावलेले विविध जातीचे कलिंगड ऑक्टोबर ते जानेवारी महिन्यापर्यत उरणमध्ये विक्रीसाठी ठेवण्यात येते. मात्र हा मोसम हिवाळयात असल्यामुळे कलिंगडाची फारशी विक्री होतेच असे नाही, परंतु महाशिवरात्रीनंतर खऱ्या अर्थाने न उन्हाळा जाणवायला लागतो. त्याच दरम्यान कलिंगडे बाजारात येतात. यावेळी उन्हाच्या वेदना उशीरा जाणवू लागल्या आहेत. होळीनंतर खऱ्या अर्थाने उन्हाचे चटके बसायला सुरूवात होते. गेल्या आठवड्यापासून उरणमधील विविध स्टॉलवर मोठ्या प्रमाणात गर्दी निदर्शनास येऊ लागली. काळे आणि पट्टे असलेले कलिंगड विक्रीकरीता उरणमध्ये विविध ठिकाणी ठेवण्यात आले आहे. ८० रू पासून दोनशे रूपयांपर्यंत नग विकले जात असल्याचे उरणमधील विक्रेत्यांनी सांगितले. दिवसभरात २०० ते ३०० नगाची विक्री होत असून सट्टीच्या दिवशी हा आकडा ४०० पर्यंत जातो अशी माहितीही त्यांनी दिली. एप्रिल आणि मे महिन्यात पारा आनखी चढणार आहे.त्यामुळे कलिंगड फळाला ग्राहकांची पसंती वाढली आहे.

# चाकरमान्यांसाठी एसटीच्या जादा गाड्या

**खरोशी:** चाकरमान्यांचा आवडता सण म्हणजे होळी. यानिमित्ताने मुंबई, ठाणे, पालघर येथील कोकणवासी गावी जात असतात. यासाठी एसटीच्या जादा गाड्या सोडण्यात येणार आहेत. महामंडळाने २७ फेब्रुवारी ते ५ मार्चपर्यंत जादा गाड्यांची व्यवस्था मुंबई, बोरीवली, ठाणे, पुणे येथून केली आहे. यामध्ये बोरीवली-महाड, आंबेत, भांडूप-महाड, नालासोपारा खुटील, मुंबई-गोरेगाव, बोरीवली, श्रीवर्धन तर प्रवासासाठी महाड-बोरीवली सकाळी ६:४५, महाड-भांडुप दुपारी १.००, खुटील-नालासोपारा सकाळी ६.३०, श्रीवर्धन-बोरीवली सकाळी ८:४५ व अन्य गाड्या सोडण्यात येणार आहेत. महाड-पनवेल विना वाहक गाड्या, पेण-पनवेल, पेण-खोपोली, पेण-नागोठणे, पेण-अलिबाग, श्रीवर्धन-पनवेल, कर्जत-अलिबाग, रोहा-पनवेल, मुरुड-अलिबाग, पनवेल-माणगाव-पनवेल अशा २७ जादा गाड्या सोडण्यात येणार आहेत.

## जाहिरनामा

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

पार्वती बाळकृष्ण पाटील,
रा.तारा-बारापाडा,ता. पनवेल,जि. रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रामपंचायत रोडे — सामनेवाला
ता.पेण,जि.रायगड

या जाहीर नोटीशीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांचा मुलगा सुजित बाळकृष्ण पाटील यांचा जन्म दिनांक ०८/०४/१९७८ रोजी मौजे रोडे. ता.पेण, जि.रायगड येथे झाला असून त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत रोडे. ता.पेण, जि.रायगड यांचेकडे झालेली नसल्याने जन्म नोंद घालणेसाठी या कार्यालयांत अर्ज दाखल केला आहे. तरी या अर्जाची चौकशी तात्काळ करावयाची असल्याने याकामी जर अर्जदार यांच्या जन्माची नोंद घालण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पुढील १५ दिवसांत कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालयांत समक्ष हजर राहून आपले म्हणणे मांडावे, कोणाचेही काही म्हणणे किंवा आक्षेप या कार्यालयांत मुदतीत प्राप्त न झाल्यास अर्जावर उपलब्ध पुरावे. कागदपत्र विचारात घेऊन अर्जदार यांना उशिरा जन्म नोंद दाखला देणेबाबत पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- पेण
दि.२७/०२/२०२६

सही /-
**(तानाजी शेजाळ)**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

---

दिनांक : ०५/०१/२०२६

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे शहाबाज, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत या आमचे अशिल यांचे खालील वर्णनाची वडीलोपार्जित मिळकत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | ग.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| शहाबाज | ५०६ | ०.६०.५०<br>पो.ख. ०.०९.१०<br>०.६९.६० | ८.२४ |

वर वर्णन केलेली मिळकती या वडीलोपार्जित मिळकती असून त्या मिळकतीचा वाद जिल्हा न्यायालय रायगड यांचेकडे रेग्यूलर सिव्हिल अपिल क्र. ४८/२०१९ दाखल असून सदर अपिलाची कार्यवाही चालू आहे.

अशा परिस्थितीत विरुद्ध पक्षकार हे सदर मिळकतीचे तेच मालक आहेत असे भासवून मिळकतीचे इच्छूक खरेदीदारांस मिळकती पाहण्यासाठी घेवून येत आहेत व विक्री करण्याचा प्रयत्न करीत आहेत असे निदर्शनास आलेले आहे.

तरी सर्व संबंधितांना असे कळविण्यात येत आहे की, वर वर्णन केलेल्या मिळकतीविषयी मा. जिल्हा न्यायालय अलिबाग रायगड येथे अपिल चालू आहे. त्यामुळे वर वर्णन केलेल्या मिळकतीचा व्यवहार कुणीही करु नये. तसा कोणताही व्यवहार केल्यास तो बेकायदेशीर होईल व तो आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. हि नोटीस डावलून अथवा दुर्लक्षित करुन कुणीही व्यवहार केल्यास त्याबाबत योग्य ती कायदेशीर कारवाई सर्व संबंधितांवर करण्यात येईल, तसेच सदर व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे सर्वांस कळावे

अलिबाग.
दिनांक : २६/०२/२०२६

सही/-
**ॲड. निखिल राजाराम पाटील**
ॲकॉन क्लासिक रुम नं. १०६,
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग समोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड
९१४५५८७२००

---

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अनंत गोविंद चौलकर यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | ग.नं. | क्षेत्र हे आर | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| मापगाव ता.अलिबाग | २१२ | ०.२७.९०<br>पो.ख.००.०४.००<br>एकुण क्षेत्र ०.३१.९० | ६.६९ |

वर वर्णन केलेली भात शेती मिळकतीचे पुर्ण क्षेत्र हे या जाहिर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी मेन्टेनस, मेहेर, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधाचा लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील व मागून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही यांची नोंद घ्यावी. मागाहून येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही हे सर्वांना कळावे.

अलिबाग.
दिनांक २६/०२/२०२६

सही/-
**ॲड. सौ.कांचन प्र.नार्वेकर**
ॲकॉन क्लासिक १०६, पहिला
मजला जिल्हा न्यायालया समोर
अलिबाग, रायगड

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सुधागड यांचे न्यायालयात**

क्र.फौजदारी/कात-९/आवक क्र.१३८१/२०२६

श्री. ज्ञानेश्वर लक्ष्मण वाघमारे,
रा. घोडपापड आदिवासीवाडी ता. सुधागड.जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत चिवे
ता. सुधागड.जि. रायगड — सामनेवाले

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म-मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, श्री. ज्ञानेश्वर लक्ष्मण वाघमारे, रा. घोडपापड आदिवासीवाडी ता. सुधागड जि.रायगड यांनी त्यांची मुलगी प्रतिक्षा ज्ञानेश्वर वाघमारे यांचा मृत्यू दिनांक १९/०३/२०२२ रोजी मौजे चिवे आदिवासीवाडी ता. सुधागड जि.रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करून त्यांच्या मृत्यू नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर प्रतिक्षा ज्ञानेश्वर वाघमारे यांच्या मृत्यू नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरूपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे मृत्यू नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसीद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड पाली
दिनांक :- २५/०२/२०२६

सही/-
**(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

---

**पंजाब नॅशनल बँक (punjab national bank — Together for the better)**

एआरएमबी, ठाणे,
३रा मजला, पीएनबी प्रगती टॉवर, ब्लॉक-जी, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०००५१,
मेल: cs8325@pnb.co.in

परिशिष्ट IV
[ नियम ८ (१) पहा ]

## कब्जा सूचना

(स्थावर मिळकतकरिता)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे पंजाब नॅशनल बँक, एआरएमबी ठाणे चे प्राधिकृत अधिकारी म्हणून दि सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४ सन २००२) अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ सहवाचता कलम १३ अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून दिनांक **१६.१२.२०२५** रोजी मागणी सूचना जारी करुन **कर्जदार मे. ब्लू स्टार कॅन्स्ट्रक्शन कं., पांडुरंग गजानन ठाकूर, राम गजानन ठाकूर, चेतन पांडुरंग ठाकूर, बिनू रतिलाल पटेल, नारायण गजानन ठाकूर आणि मे. ब्लू स्टार बिल्डिंग मटेरियल्स प्रा.लि.,** यांना सूचनेमध्ये नमूद केलेली रक्कम दि. **रु. ३४,२७,५९,१०६.४३/- (रुपये चौतीस कोटी सत्तावीस लाख एकोणसाठ हजार एकशे सहा आणि त्रेचाळीस पैसे मात्र) १५.१२.२०२५ रोजी** सह संपूर्ण प्रदानाच्या तारखेपर्यंत पुढील व्याज आणि खर्चासह ही सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत चुकती करण्यास सांगितले होते.

कर्जदार/हमीदार/गहाणदार यांनी सदरहू रक्कम चुकती करण्यामध्ये कसूर केलेली आहे, म्हणून कर्जदार/हमीदार/गहाणदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकर्त्यांनी त्यांना प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करून सदरहू अधिनियमाचे कलम १३(४) चे सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये **२६ फेब्रुवारी २०२६** रोजी याखाली वर्णन केलेल्या मिळकतीचा सांकेतिक कब्जा घेतलेला आहे.

विशेषत: कर्जदार/हमीदार/गहाणदार आणि सर्वसामान्य जनता यांना याद्वारे सावधान करण्यात येते की, त्यांनी सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा व्यवहार करू नये आणि सदरहू मिळकतीवरील कोणताही देवघेवीचा व्यवहार हा पंजाब नॅशनल बँकेच्या रक्कम **रु. ३४,२७,५९,१०६.४३/- (रुपये चौतीस कोटी सत्तावीस लाख एकोणसाठ हजार एकशे सहा आणि त्रेचाळीस पैसे मात्र)** सह संपूर्ण प्रदानाच्या तारखेपर्यंत **१५.१२.२०२५** रोजीपासून पुढील व्याज आणि खर्च यांच्या अधीन राहील.

तारण मत्तेच्या विमोचनासाठी उपलब्ध वेळेत सदर ॲक्टच्या कलम १३च्या उप-कलम (८) च्या तरतुदी अन्वये कर्जदारांचे लक्ष वेधले जाते.

**स्थावर मिळकतीचे वर्णन**

१. जमिन धारक सर्व्हे क्र. ४४/१३, मोजमापित सुमारे एच-० आर-११ पी-९ असलेले वसलेले आणि येथे स्थित गाव धुतुम, ता. उरण, जिल्हा रायगड एकत्रित त्यावरील स्ट्रक्चर चे ते सर्व भाग आणि विभाग., पांडुरंग गजानन ठाकूर यांचा नावाने.

२. जमिन धारक सर्व्हे क्र.३, हिस्सा क्र.११, मोजमापित सुमारे एच-० आर-६२ पी-१ असलेले वसलेले आणि येथे स्थित गाव धुतुम, ता. उरण, जिल्हा रायगड एकत्रित त्यावरील स्ट्रक्चर चे ते सर्व भाग आणि विभाग., पांडुरंग गजानन ठाकूर यांचा नावाने.

३. जमिन धारक सर्व्हे क्र.१०३, हिस्सा क्र.१९ए१, मोजमापित सुमारे एच-१ आर-०८ पी-५ असलेले वसलेले आणि येथे स्थित गाव जसाई, ता. उरण, जिल्हा रायगड त्यासह जसाई ग्रामपंचायतच्या हद्दीत त्यावरील स्ट्रक्चर चे ते सर्व भाग आणि विभाग., पांडुरंग गजानन ठाकूर यांचा नावाने.

४. जमिन धारक सर्व्हे क्र.१०३, हिस्सा क्र.५बी, मोजमापित सुमारे एच-० आर-६१ पी-५ असलेले वसलेले आणि येथे स्थित गाव जसाई, ता. उरण, जिल्हा रायगड त्यासह जसाई ग्रामपंचायतच्या हद्दीत त्यावरील स्ट्रक्चर चे ते सर्व भाग आणि विभाग., पांडुरंग गजानन ठाकूर यांचा नावाने.

५. जमिन धारक सर्व्हे क्र.१०३, हिस्सा क्र. १९ए१, मोजमापित सुमारे एच-० आर-०८ पी-५ आणि जमिन धारक सर्व्हे क्र.१०३ हिस्सा क्र.५बी मोजमापित सुमारे एच-० आर-६१, पी-५ शेड सह असलेले बिल्ट अप क्षेत्र चे सुमारे ३०० चौ.फू. असलेले वसलेले आणि येथे स्थित गाव जसाई, ता. उरण, जिल्हा रायगड सह ग्रामपंचायत जसाईच्या हद्दीत चे ते सर्व भाग आणि विभाग., पांडुरंग गजानन ठाकूर यांचा नावाने.

६. जमिन धारक सर्व्हे क्र.८०, हिस्सा क्र.१, मोजमापित सुमारे एच-० आर-६७ पी-६ असलेले वसलेले आणि येथे स्थित गाव जसाई, ता. उरण, जिल्हा रायगड एकत्रित त्यावरील स्ट्रक्चर चे ते सर्व भाग आणि विभाग., पांडुरंग गजानन ठाकूर आणि राम गजानन ठाकूर, नारायण गजानन ठाकूर यांचा नावाने.

७. जमिन धारक सर्व्हे क्र.८०, हिस्सा क्र.२, मोजमापित सुमारे एच-० आर-२२ पी-८ असलेले वसलेले आणि येथे स्थित गाव जसाई, ता उरण जिल्हा रायगड एकत्रित त्यावरील स्ट्रक्चर चे ते सर्व भाग आणि विभाग., पांडुरंग गजानन ठाकूर आणि राम गजानन ठाकूर, नारायण गजानन ठाकूर यांचा नावाने.

८. जमिन धारक सर्व्हे क्र.८०, हिस्सा क्र.४, मोजमापित सुमारे एच-० आर-४७ पी-० असलेले वसलेले आणि येथे स्थित गाव जसाई, ता उरण जिल्हा रायगड एकत्रित त्यावरील स्ट्रक्चर चे ते सर्व भाग आणि विभाग., पांडुरंग गजानन ठाकूर आणि राम गजानन ठाकूर, नारायण गजानन ठाकूर यांचा नावाने.

९. जमिन धारक सर्व्हे क्र.१७८, हिस्सा क्र.ए, मोजमापित सुमारे एच-३ आर-६० पी-० असलेले वसलेले आणि येथे स्थित गाव पागोटे, ता. उरण जिल्हा रायगड एकत्रित त्यावरील स्ट्रक्चर चे ते सर्व भाग आणि विभाग., पांडुरंग गजानन ठाकूर आणि राम गजानन ठाकूर, नारायण गजानन ठाकूर यांचा नावाने.

१०. जमिन धारक सर्व्हे क्र.१८१(पी) हिस्सा क्र. १/२, मोजमापित सुमारे एच-१ आर-८० पी-० असलेले वसलेले आणि येथे स्थित गाव पागोटे, ता. उरण जिल्हा रायगड एकत्रित त्यावरील स्ट्रक्चर चे ते सर्व भाग आणि विभाग., पांडुरंग गजानन ठाकूर आणि राम गजानन ठाकूर, नारायण गजानन ठाकूर यांचा नावाने.

११. जमिन धारक सर्व्हे क्र.१८१, हिस्सा क्र.२, मोजमापित सुमारे एच-१ आर-७६ पी-० असलेले वसलेले आणि येथे स्थित गाव पागोटे, ता. उरण जिल्हा रायगड एकत्रित त्यावरील स्ट्रक्चर चे ते सर्व भाग आणि विभाग., पांडुरंग गजानन ठाकूर आणि राम गजानन ठाकूर, नारायण गजानन ठाकूर यांचा नावाने.

**दिनांक : २६/०२/२०२६**
**ठिकाण: रायगड**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी,**
**पंजाब नॅशनल बँक**

---

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सुधागड यांचे न्यायालयात**

क्र.फौजदारी/कात-९/आवक क्र.१४१६/२०२६

श्री. रमेश रावजी जाधव, रा. महागाव
ता. सुधागड जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत परळी — सामनेवाले
ता. सुधागड. जि. रायगड

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म-मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की श्री. रमेश रावजी जाधव, रा.महागाव ता.सुधागड जि.रायगड यांनी त्यांचे वडील रावजी वारकु जाधव यांचा जन्म दि.२१/०३/१९४६ रोजी मौजे ढोकशेत ता. सुधागड जि.रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमूद करून त्यांच्या जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर रावजी वारकु जाधव यांच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरूपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड पाली
दिनांक :- २५/०२/२०२६

सही/-
**(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

---

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी सदरील जमीनीचे विद्यमान मालक सुजाता अनंत जोशी, रा. कोल्हारे, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडून विकत घेण्याचे ठरविलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे,

**मौजे एकसळ, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे क्र. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|
| ६९/२ | ०-३५-५०<br>पो.ख. ०-०२-५०<br>एकुण ०-३८-०० | ०-३४ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तदंगभूत हक्क हितसंबंधासह मला विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकित पान, कुळवहिवाट, बोजा, वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार माझ्याकडे (खरेदीदार यांचेकडे) प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचेवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. २७/०२/२०२६

अशिलातर्फे
**ॲड. प्रविण गजानन चव्हाण**
मु. डिकसळ, ता.कर्जत, जि.रायगड
मोबा.नं. ७७२००६६२१२

---

**MAHATRANSCO** — Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## e-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-1/26-27 **RFX 7000038985** | Hiring of vehicle (LMV) for PID Unit Kharghar under EHV (O&M) Circle, Panvel for the F.Y. 26-27 (LMV type Ertiga / Mahindra TUV/SUMO etc.) **Tender Fee Rs. 500/- + GST** | **Limited to Rs. 6.00 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 25.02.2026 at 18:00 Hrs. to 11.03.2026 up to 10:59 hrs, Opening date :- 11.03.2026 @ 11:00 Hrs.**
For further details visit our website
**https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person :** The Executive Engineer (Adm) Mob. No. 8412050202. E-mail ID **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

---

## जाहीर सूचना

तमाम जनतेस सदर नोटिसीद्वारे कळिवण्यात येते कि, माझ्या अशिलांच्या सूचनेवरून, मी, १) श्रीमती क्षमता एकनाथ परब २) श्रीमती शीला हरीश बाईत ३) श्री. अविनाश आत्माराम खांबे, यांच्या खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या स्थावर मिळकतीबाबत हक्क व अधिकारांची चौकशी आणि पडताळणी करीत आहे.

खालील नमूद केलेल्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा अथवा कोणत्याही बँक आणि/किंवा वित्तीय संस्था आणि/किंवा प्राधिकरण यांचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठेकरार, विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, अभिहस्तांतरण, वाटप, पोटगी, मृत्यूपत्र, अख्त्यारपत्र, बोजा, लिन, एकाधिकार, करार, हक्कसोड, वारसा, उत्तराधिकार, सुविधाधिकार, न्यास, कुळाने, भाडे व पोट-भाडेदारी, भोगवटा, कब्जा, कुटुंब व्यवस्था / तडजोड, कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश, करार / करारनामे, भागिदारी, विकास अधिकार, प्रकल्प व्यवस्थापन करारनामा, विकास व्यवस्थापन करारनामा, हक्कविलेख दस्तऐवज अनामत करण्याचे ज्ञापन, किंवा अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणत्याही स्वरूपाचे कोणतेही दावे, आक्षेप, अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, शेअर आणि/किंवा मागणी असेल तर त्यांनी निम्नस्वाक्षरीकर्त्यांना या जाहीर सुचनेच्या जाहिरातीच्या तारखेपासून २१ (एकवीस दिवसांच्या आत त्याच्या दस्तावेजी पुराव्यासह लेखी स्वरूपामध्ये ज्ञात होण्यासाठी कळविणे आवश्यक आहे. अन्यथा माझे अशिल सदर मालमत्तेमधील असे अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, दावा, शेअर आणि / किंवा मागणी यांचा अधित्याग, परित्याग, अधित्यजन आणि / किंवा परीत्यजन करण्यात आल्याचे आणि / किंवा सोडून देण्यात आल्याचे गृहीत धरून मालमत्तेच्या प्रस्तावित खरेदीची कार्यवाही करतील आणि सदर मालमत्तेच्या संबंधातील अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, दावा, शेअर आणि / किंवा मागणी अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल.

**यात यावर संदर्भित केलेले परिशिष्ट (मिळकतीचे वर्णन )**

| मौजे | भूमापण क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पैसे) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| कोळगांव, ता. अलीबाग, जि. रायगड | २०९ | क्षेत्र: ०.४१.८०<br>पो. ख.: ०.००.००<br>**एकूण: ०.४१.८०**<br>**पैकी**<br>क्षेत्र ०.३१.३५<br>पो. ख : ०.००.००<br>**एकूण ०.३१.३५** | १०.६९ | १) श्रीमती क्षमता एकनाथ परब २) श्रीमती शीला हरीश बाईत ३) श्री. अविनाश आत्माराम खांबे |

**अलिबाग**
**दिनांक : २७/०२/२०२६**

**ॲड. जान्हवी कृष्णा शिंदे**
ऑफिस क्र. ३१८, तिसरा मजला, प्लॅटिनम टेक्नो पार्क, प्लॉट क्र. १७ व १८, सेक्टर ३०ए, वाशी, नवी मुंबई - ४००७०३. मो.: 7506588008

---

अर्जदार तर्फे ॲड. स्नेहेंद्र पवार
जा.क्र.०२१/२/शाखा/४३८/२०२६
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
कल्पतरू इमारत, पोस्ट ऑफिसजवळ
अलिबाग जि.रायगड
दि.२६/०२/२०२६

## चौकशी जाहीर नोटीस

**महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ५० अ (१) अन्वये**

योजना अर्ज क्र :-१७/२०२५

सार्वजनिक न्यासाचे नांव:- श्रीदेव हरिहरेश्वर मंदिर, हरेश्वर, ता. श्रीवर्धन, जि. रायगड
न्यास नोंदणी क्रमांक :- अे - ११४ (रायगड)
श्री. सिध्देश सु. पोवार : — अर्जदार

सर्व सबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग रायगड हे वर नमूद केलेल्या अर्ज यासबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० कलम ५० अ (१) अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

३. खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीचे आहे काय ?

**ई) स्थावर मिळकत :- (वर्णन)**

| अ. क्र. | गांव/मौजे | गट क्र.व उपविभाग नं. | खाते क्र. | क्षेत्रफळ | पोट खराबा क्षेत्र | आकारणी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | देवघर | ३७ | २०९ | ०.००.० | ०.४६.०० | ०.०० |

आ) स्थावर मिळकत :- (वर्णन)

मौजे देवघर, ता. श्रीवर्धन, जि. रायगड, ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत गट क्रमांक व उपविभाग गा. नं. ३७, खाते क्र. २०९ क्षेत्रफळ ०.००.०० पोट खराबा क्षेत्र ०.४६.००, आकारणी ०.०० च्या खरेदीखतानुसार श्रीदेव हरिहरेश्वर मंदिर, हरेश्वर, ता. श्रीवर्धन, जि. रायगड यांच्या नावे करण्यात आली सदर मिळकतीचे आज रोजीचे अंदाजे मुल्यांकन

सदरच्या चौकशी प्रकरणांमध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग, रायगड यांचे शिक्यानिशी आज दिनांक २६/२/२०१६ रोजी दिली.

सही/-
**प्र.अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**रायगड विभाग, रायगड**

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक १. श्री. नाना गोविंद आसवले, २. श्री. चंदर गोविंद आसवले, ३. श्रीमती. फसाबाई मारूती आसवले यांचे ताबेकब्जातील व वहीवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्श्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन आमचे अशिलांनी त्यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहू जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मौजे नांदगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| भूमापन क्र. | उपविभाग क्र | क्षेत्र: लागवड योग्य हे.आर.चौ.मी | क्षेत्र: पोट खराबा हे.आर चौ.मी | क्षेत्र: एकुण हे.आर. चौ.मी | आकारणी रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| ९३ | १ | ०.९२.५० | ०.१२.५० | १.०५.००<br>पैकी ०.२४.०० | ३.८० |

वरील वर्णणाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने, कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमिन निर्वेध व बोजारहीत आहे असे समजणेत येवून सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पूर्ण केला जाईल व मूदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशीलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दिनांक : २७/०२/२०२६

**ॲड. मोनाली रामदास हजारे**
एम. कॉम. एल.एल.बी,
पत्ता ए.व्ही.एफ रेसिडन्सी, ललानी रोड,
कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड.
मो. नं: ९२६०१०९२८२

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक १. पारूल स्वप्नील वाघाये २. स्वप्नील अशोक वाघाये यांचे ताबेकब्जातील व वहीवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्श्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन आमचे अशिलांनी त्यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहू जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मौजे नांदगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| भूमापन क्र | उपविभाग क्र | क्षेत्र: लागवड योग्य हे.आर चौ.मी | क्षेत्र: पोट खराबा हे.आर.चौ.मी | क्षेत्र: एकुण हे.आर चौमी | आकारणी रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १४४ | १/अ | ०.३२.९० | ०.०३.०० | ०.३५.९० | २.१२ |

वरील वर्णणाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने, कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमिन निर्वेध व बोजारहीत आहे असे समजणेत येवून सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पूर्ण केला जाईल. व मूदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशीलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दिनांक : २७/०२/२०२६

**ॲड. मोनाली रामदास हजारे.**
एम.कॉम.एल एल.बी,
पत्ता-ए.व्ही.एफ रेसिडन्सी, ललानी रोड,
कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड.
मो. नं : ९२६०१०९२८२

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, मौजे चोरावळे ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल यांनी त्याचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्या कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हि. नं. | क्षेत्र. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| भागा हरी माळी | ३० | ५/ब/२/क | १-०७-०<br>यापैकी<br>०-२०-० | १=२७ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

ठिकाण :- कर्जत
दिनांक :- २७/२/२०२६

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभात दर्शन अपार्टमेंट
ब्लॉक नं. १०१ नेरळ कर्जत जि. रायगड
मो. ९८८१२७९८१७

---

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर, यांचे न्यायालयात**
**तालुका खालापूर. जि. रायगड**

दुरध्वनी क्रमांक ०२१९२/२७५०४८ ई मेल-tahasil.khalapur3@gmail.com

क्र.जन्म/रजि/एसआर ५३/२०२६/१०२२

(१) श्री. लहानु लक्ष्मण पवार (कातकरी) — वादी
रा.न्यु.एस.ई.बी.आई. रोड कातकरीवाडी शिवनगर,
पो.मोहोपाडा, ता.खालापुर, जि.रायगड

**विरुद्ध**

१) निबंधक जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी, — प्रतिवादी
ग्रुप ग्रामपंचायत वासांबे, ता.खालापूर, जि.रायगड

**विषय:- जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्री. लहानु लक्ष्मण पवार (कातकरी), रा. न्यु.एस.ई.बी.आई. रोड कातकरीवाडी शिवनगर, पो. मोहोपाडा, ता. खालापुर, जि. रायगड (अपिलार्थी) यांनी यांचे वडील कै.शंकर गणु कातकरी यांचा मृत्यू दिनांक १९/०९/१९९५ रोजी रिसवाडी, ता. खालापूर येथे झाला आहे. सदर मृत्यूची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मृत्यूची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी. सदरची जाहीर नोटीस आज दि २४/२/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.

ठिकाण:- खालापूर
दिनांक:- २४/०२/२०२६

सही/-
**(अभय चव्हाण)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार खालापूर**

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांच्या सुचनेवरून आम्ही मौजे चोरढे, ता.मुरुड, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतींच्या, विद्यमान मालकांचे त्या-त्या मिळकतींचे मालकी हक्कांचे निर्वेधतेची पडताळणी करीत आहोत. परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतींचे मालकांनी असे निवेदीत केले आहे की, खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतींमध्ये त्यांस पुर्णपणे व निर्वेध मालकीहक्क आहेत.

तरी ज्या इसमांचा त्या मिळकतींमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, कुळवहिवाट, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असेल, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट अे.डी. द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतींमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायम स्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**परिशिष्ट**
**मौजे चोरढे, ता. मुरुड, जि. रायगड येथील**

| गट क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पैसे | विद्यमान मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| २८७ | ०-२४-२०<br>पो.ख.०-०४-४०<br>०-२८-६० | ०.२८ | भारती मधुकर गायकर<br>मयुर मधुकर गायकर<br>जानवी(जान्हवी) जयेश जाईलकर |
| ३२०/१ | १-३१-००<br>पो.ख.०-३१-००<br>१-६२-०० | १.३६ | सुलताना महमद कासकर |
| ३२०/६ | १-३१-००<br>पो.ख.०-३०-००<br>१-६१-०० | १.३६ | सविता दौलत शिवदे<br>मिना दौलत शिवदे<br>पुनम दौलत शिवदे |
| ३२२ | २-२२-००<br>पो.ख.०-५१-००<br>२-६३-०० | २.३१ | विनोद परशुराम भगत |
| ३२३ | २-२३-००<br>पो.ख.०-५०-००<br>२-६३-०० | २.३२ | विनोद परशुराम भगत |
| ३३३ | ९-३५-००<br>पो.ख.०-५६-००<br>९-९१-००<br>पैकी ४-३१-९० | १४.०७<br>पैकी<br>६.५० | लता विनोद भगत |
| ३३६ | ४-४५-००<br>पो.ख.०-९८-००<br>५-४३-०० | ४.६३ | विनोद परशुराम भगत |


अलिबाग
तारीख : २७/२/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हौ. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

---


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## निवडक



### चौथ्या दिवशी प्रशासनाचे आश्वासन

**माथेरान :** येथे सुरू असलेल्या ई-रिक्षा संपाचा बुधवारी (दि.२५) चौथा दिवस होता. या पार्श्वभूमीवर इ-रिक्षा संघटनेच्या शिष्टमंडळाची तहसील कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीदरम्यान शासनाची भूमिका संघटनेसमोर स्पष्ट करण्यात आली. या बैठकीस तहसीलदार सुरेंद्र सिंग ठाकूर व मुख्याधिकारी राहुल इंगळे हे उपस्थित होते. यावेळी सर्व रिक्षाधारकांना न्याय देण्याबाबत शासन सकारात्मक असून, रिक्षा परवानग्या व संबंधित प्रक्रियेबाबत लवकर निर्णय घेण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. तहसील कार्यालयाच्यावतीने ई-रिक्षा संघटनेला संप मागे घेण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच, येत्या १५ ते २० दिवसांचा अवधी देण्याची विनंती करण्यात आली. या कालावधीत संबंधित मॉनिटरिंग कमिटीची बैठक तातडीने आयोजित केली जाईल आणि त्या बैठकीत रिक्षाधारकांच्या प्रश्नांवर सकारात्मक व ठोस निर्णय दिला जाईल, असे आश्वासन देण्यात आले. दरम्यान, निधी उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने रिक्षा देण्याचा मुद्दाही चर्चेत आल्याची माहिती आहे. या आश्वासनानंतर आता रिक्षा संघटना कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



### शहाबाज येथे वि.दा. सावरकरांची पुण्यतिथी साजरी

**अलिबाग :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची पुण्यतिथी गुरूवारी (दि.२६) शहाबाज येथील सार्वजनिक वाचनालय आणि ग्रंथालय येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सावरकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शहाबाज मराठी शाळेतील साधना पाटील आणि मंगला पाटील यांनी सावरकरांच्या देशभक्ती, त्याग आणि विचारांचे महत्व आजच्या पिढीसाठी कसे प्रेरणादायी आहेत, हे अधोरेखित केले. या कार्यक्रमात विविध देशभक्तीपर गीते देखील सादर करण्यात आली. यावेळी सार्वजनिक वाचनालयाचे मनिष पाटील, सचिता पाटील, रुपाली पाटील, उपाध्यक्ष मंगेश भगत आदी उपस्थित होते.



### 'कांदा खरेदी करताना काळजी घ्या'

**श्रीवर्धन :** सध्या श्रीवर्धन शहरात कांदा व लसूण विकणाऱ्या फेरीवाल्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. पुणे जिल्ह्यातून किंवा सातारा जिल्ह्यातून चारचाकी पिकअप किंवा टेम्पो घेऊन हे फेरीवाले कांदा व लसूण विक्रीसाठी श्रीवर्धन शहरात आणतात. बाजार भावापेक्षा कमी भावाने हे लोक कांदा व लसणाची विक्री करतात. परंतु, या फेरीवाल्यांकडून कांदे व लसूण खरेदी करताना नागरिकांनी काळजी घेण्याची आवश्यकता आहे. बहुतांश फेरीवाले कांदा थेट गोणीच्या संख्येने विकत असतात. अशा कांदा विक्रेत्यांकडून गोण खरेदी केली असता, गोणी मधील जवळजवळ अर्धे कांदे मोड आलेले, त्याचप्रमाणे खराब झालेले आढळुन येतात. जर गोण घ्यायची झालीच तर ती गोण संपूर्ण ओतून कांदा पाहून घ्या. हीच परिस्थिती लसुण विक्रेत्यांची आहे. लसूण देखील आत मध्ये पिकलेली व खराब झालेली असतात. बाहेरून लसणाचा कांदा चांगला दिसत असला तरी आतील लसूण ही पिवळी पडलेली किंवा काळी पडलेली आढळुन येतो.

### ट्रेलरमधून डिझेलची चोरी

**पनवेल :** राजकुमार यादव यांनी कळंबोली सर्कलवरून जेएनपीटीकडे जाणाऱ्या सेवा रस्त्यावर त्यांचा ट्रेलर विश्रांतीसाठी उभा केला होता. पहाटे सुमारे पावणेपाच वाजण्याच्या सुमारास तीन अनोळखी व्यक्तींनी ट्रेलरच्या टाकीचे डिझेल कुलूप तोडून त्यामधील अंदाजे २५० लिटर डिझेलची चोरी केली. या प्रकरणी २२ हजार ५०० रुपयांचे डिझेल चोरीला गेल्याची नोंद कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली.

# उरण मूलभूत समस्यांच्या विळख्यात

## कोट्यवधींचा खर्च, तरी विकासाची प्रतीक्षा

**| उरण | प्रतिनिधी |**

**औद्योगिक आणि बंदर विकासामुळे राज्याच्या नकाशावर वेगाने पुढे येणारे उरण आज मूलभूत समस्यांच्या विळख्यात सापडले आहे. कोट्यवधी रुपयांचे प्रकल्प जाहीर झाले, बैठका आणि भूमिपूजनांचा सपाटा सुरू राहिला; मात्र, सामान्य नागरिकांच्या दैनंदिन आयुष्यात अपेक्षित बदल दिसत नाही. विकासाच्या नावाखाली आकडे झळकत असले तरी प्रत्यक्षात सुविधांची कमतरता प्रकर्षाने जाणवत आहे.**




उरणमधील प्रशासकीय कारभारानंतर आता लोकप्रतिनिधींच्या हाती सूत्रे आली आहेत. मात्र, तरी देखील त्यांच्या समोर प्रश्नांचा डोंगर उभा आहे. स्थानिक नागरिकांशी संवाद साधल्यावर उरणमधील किमान १० प्रमुख समस्या ठळकपणे समोर येत आहेत. रखडलेले विकास प्रकल्परस्ते, गटारे, पाणीपुरवठा योजना आणि विविध पायाभूत सुविधा प्रकल्प संथ गतीने सुरू आहेत. काही कामे वर्षानुवर्षे अपूर्ण अवस्थेत आहेत. निधी मंजूर होतो; परंतु, कामांची गती आणि गुणवत्ता यावर प्रश्न उपस्थित होत आहेत.

उरणमधील उद्योगवाढीमुळे अवजड वाहनांची संख्या वाढली आहे. परंतु, त्यानुसार रस्त्यांचे मजबुतीकरण झालेले नाही. अनेक अंतर्गत रस्त्यांवर खड्डे, अपूर्ण कामे आणि वाहतूककोंडी नित्याचीच झाली आहे. सिमेंट रस्त्यांच्या नावाखाली झालेल्या कामांवरही दर्जाबाबत शंका व्यक्त केली जाते. त्याचबरोबर औद्योगिक क्षेत्र, बंदर आणि वाढती लोकसंख्या यामुळे वाहतूकीवर प्रचंड ताण वाढला आहे. येथील अरुंद रस्ते, नियोजनाचा अभाव आणि पार्किंगची कमतरता यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. तसेच, बस सेवेची वारंवारता आणि मार्ग नियोजन पुरेसे नसल्याने येथील प्रवाशांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे देखील वाहतूकीवर ताण वाढत आहे.

तसेच, दरवर्षी पावसाळ्यापूर्वी नालेसफाईवर मोठा खर्च केला जातो. तरीही मुसळधार पावसात पाणी साचण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे गटारे तुंबणे व पावसाचे पाणी रस्त्यावर साचणे ही समस्या कायम आहे. उरण तालुक्यातील काही भागांत पाण्याचा दाब कमी असल्याच्या तक्रारी आहेत. उद्योगवाढीबरोबर निर्माण होणाऱ्या कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी सक्षम यंत्रणा आवश्यक आहे. काही भागांत स्वच्छतेबाबत तक्रारी वाढल्या आहेत. वाढत्या लोकसंख्येनुसार पाणीपुरवठा व्यवस्थेत सुधारणा आवश्यक आहे. आम्ही कर भरतो, परंतु मूलभूत सुविधा वेळेवर का मिळत नाहीत? असा प्रश्न नागरिक सातत्याने विचारत आहेत. उरण तालुक्याची तिसऱ्या मुंबईकडे वाटचाल सुरू असताना या ठिकाणी स्थानिक आरोग्य केंद्रे आणि रुग्णालयांमध्ये आवश्यक तज्ज्ञ डॉक्टर व साधनसामग्रीचा अभाव असल्याची भावना आहे. त्यामुळे गंभीर आजारांसाठी उरणमधील नागरिकांना शहराबाहेर जावे लागत आहे.

उरणचा विकास हा केवळ औद्योगिक वाढीपुरता मर्यादित नसून तो स्थानिकांच्या जीवनमानाशी निगडित आहे. कोट्यवधींचा खर्च झाला तरी मूलभूत सुविधा सक्षम झाल्या नाहीत, तर विकासाच्या संकल्पनेवर प्रश्नचिन्ह निर्माण होईल. लोकप्रतिनिधींनी आता घोषणांपलीकडे जाऊन वेळबद्ध आणि पारदर्शक अंमलबजावणीवर भर देणे गरजेचे आहे. रस्ते, पाणी, आरोग्य, वाहतूक आणि स्वच्छता या मूलभूत गरजा पूर्ण केल्या गेल्या तरच उरणचा विकास खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक ठरेल. अन्यथा विकासाची प्रतीक्षा हीच उरणची ओळख बनण्याची भीती तज्ज्ञांकडून वर्तविली जात आहे.



## लिपी संवर्गाचे कामबंद आंदोलन

**| पनवेल | प्रतिनिधी |**

जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटना पनवेल तालुका शाखेच्यावतीने लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांनी असहकार व बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करण्याची घोषणा केली आहे. विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन छेडण्यात आले आहे.

संघटनेच्या प्रमुख मागण्यांमध्ये लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना वेतनातील विसंगती दूर करून सुधारित वेतनश्रेणी लागू करणे, सर्वांना जुनी पेन्शन योजना लागू करणे तसेच पदनामात बदल करून पदोन्नतीची साखळी कमी करणे या मुद्द्यांचा समावेश आहे. या आंदोलनामुळे शासकीय व निमशासकीय कार्यालयांतील कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. संबंधित मागण्यांवर शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

## कारच्या धडकेत वृद्ध जखमी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल शहरातील नानासाहेब धर्माधिकारी पुलावर पंचमुखी हनुमान मंदीर सिग्नल जवळ पुल उतरत असताना एका कारचालकाने दुचाकीला धडक दिली. या धडकेत ६७ वर्षीय ज्येष्ठ नागरिक जखमी झाले. अतुल पाटणकर असे त्यांचे नाव असून ते पनवेल मधील रहिवासी आहेत. ते आपल्या स्कुटीवरून चिखले येथे जात होते. ते नानासाहेब धर्माधिकारी पुलाच्या उतरणीवर शिवशंभो सिग्नलच्या अलीकडे आले असता पाठीमागुन येणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या हुंदाई कंपनिची आय १० गाडीने धडक दिली. या धडकेत अतुल पाटणकर हे जखमी झाले. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## हिंदुस्तान पेट्रोलियमकडून मॉकड्रील





**| रसायनी | प्रतिनिधी |**

हिंदुस्तान पेट्रोलियमची रसायनी सह मुंबई, पुणे, सोलापूर आणि उरण, चाकण, शिक्रापूर एलपीजी पाइपलाइन संदर्भात आपत्कालीन प्रतिसाद आणि आपत्ती व्यवस्थापन यावर भिंगार येथे मॉकड्रील करण्यात आले.

यावेळी ऑफ साईट मॉकड्रील प्रात्यक्षिक करण्यात आले. त्यात एका ग्रामस्थाने ४२.२ किमी अंतरावर चेनेज येथील पाईपलाईनवर अनधिकृत जेसीबी खोदकाम सुरू असल्याची तक्रार नियंत्रण कक्षाला केली. त्याचवेळी, सिस्टम अलार्म आढळून आले. सुरक्षा पर्यवेक्षकांना ताबडतोब घटनास्थळी पाठवण्यात आले आणि त्यांनी उत्पादनाचा वास आणि माती विस्कळीत झाल्याची पुष्टी केली, त्यामुळे पाईपलाईन गळती असल्याचे दिसून आले. गळतीची तक्रार नियंत्रण कक्षाला करण्यात आली आणि साइट इन्सिडेंट कंट्रोलर (एसआयसी) ने आपत्कालीन परिस्थिती घोषित केली आणि ईआरडीएमपी सक्रिय केले. सुरक्षित परिस्थिती सुनिश्चित केल्यानंतर, खड्ड्यातून जास्तीचे उत्पादन काढून टाकण्यात आले आणि जखमी कामगार धोक्याबाहेर असल्याचे निश्चित करण्यात आले. देखभाल पथकाने पिनहोल गळती बंद करून आणि क्लॅम्प बसवून दुरुस्तीचे काम केले. दुरुस्तीनंतरच्या निरीक्षणे आणि एलईएल तपासणीत आणखी गळती नसल्याचे आढळून आले. यावेळी औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य संचालनायाचे उपसंचालक सुनील ठाकरे, विभागीय आपत्ती व्यवस्थापनाचे अधिकारी उमेश शिर्के, सरपंच रामदास वाघमारे, सचिन हिवरे, उमेश गुंजोम बिपीसीएल, सुशांत पाटील, निलू शर्मा, मोरीनेय देवघरे आदी उपस्थित होते.

## तक्रार, अभिप्राय पेटीची मागणी

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण शहरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध नागरी समस्यांचे वेळेत व पारदर्शक निवारण व्हावे यासाठी पालिका कार्यालयात तक्रार पेटी व अभिप्राय पेटी बसविण्यात यावी, अशी मागणी उरण तालुका मराठी पत्रकार संघाने नगराध्यक्षा भावना घाणेकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनात म्हटले आहे की, नागरिक अनेक वेळा संबंधित विभागाकडे तक्रारी सादर करतात; मात्र, त्या तक्रारींचे वेळेत निवारण होत नसल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. परिणामी




प्रशासनाबद्दल नागरिकांमध्ये नाराजीची भावना निर्माण होत आहे. नागरिकांच्या अडचणी थेट प्रशासनापर्यंत पोहोचाव्यात तसेच समस्यांचे पारदर्शक व वेळेत निवारण व्हावे यासाठी तक्रार पेटी व अभिप्राय पेटी बसविणे आवश्यक असल्याचे संघाने नमूद केले आहे.

## ड्रॉव्हरमधून रोख रकमेची चोरी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेलच्या गांधी हॉस्पिटलमधील रिसेप्शन काऊंटरच्या ड्रॉव्हरमध्ये असलेली ५१ हजार रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली आहे. रोहित भोसले याने गांधी हॉस्पिटलच्या रिसेप्शन काऊंटरच्या ड्रॉव्हर मध्ये असलेली ५१ हजार रुपयांची रोख रक्कम काढून नेली. त्याने रिसेप्शनीस्ट शीतल तुपसमुद्रे किंवा हॉस्पिटलच्या इतर स्टाफच्या संमतीशिवाय ती रक्कम नेली. त्यामुळे याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ज्येष्ठ नागरिकाची ऑनलाइन फसवणूक

**| पनवेल | प्रतिनिधी |**

रुग्णालयाच्या नावाचा वापर करून ज्येष्ठ नागरिकांची आर्थिक फसवणूक झाली. कर्नाटक येथील एका प्रसिद्ध आयुर्वेद रुग्णालयात उपचार घेण्यासाठी माहिती शोधत असताना कळंबोलीतील ज्येष्ठाने ऑनलाइन व्यवहारात तब्बल ६ लाख ४० हजार रुपये गमावले.

कळंबोली येथील सेक्टर १ मधील सोसायटीत राहणारे ६० वर्षीय ज्येष्ठ नागरिक उपचारांसाठी कर्नाटक राज्यातील नागरमोळी येथील एका रुग्णालयाची माहिती इंटरनेटवर शोधत होते. या वेळी अधिकृत रुग्णालयाच्या संकेतस्थळासारखे दिसणाऱ्या एका बनावट संकेतस्थळावरून त्यांचा संपर्क दोन संशयितशी झाला. संशयितांनी पीडित ज्येष्ठ नागरिकांच्या मोबाइलवर डॉट एपीके स्वरूपाची फाइल पाठवून ती डाऊनलोड करण्यास भाग पाडले. त्या फाइलमधील लिंकद्वारे बँक खात्यातून ६ लाख ४० हजार रुपयांची रक्कम अन्य खात्यात वर्ग करण्यात आली. नंतर पीडितांनी मूळ रुग्णालयाशी थेट संपर्क साधला असता, कोणतीही रक्कम प्राप्त झाली नसल्याचे स्पष्ट झाल्याने फसवणूक उघडकीस आली. त्यानंतर ज्येष्ठ नागरिकांनी कळंबोली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

## राज्यस्तरीय फलक लेखन स्पर्धेचा निकाल

**| माणगाव | प्रतिनिधी |**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रेरणादायी जीवनावर आधारित राज्यस्तरीय फलक लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये राज्यभरातील कला शिक्षकांनी अत्यंत उत्साहाने भाग घेतला होता. सर्व सहभागींनी फलक लेखनाचे कार्य अत्यंत कल्पक, सुबक आणि उत्कृष्ट पद्धतीने सादर केले होते. प्रत्येक फलकामधील विचारांची मांडणी, अक्षररचना, रंगसंगती आणि सादरीकरणाची गुणवत्ता पाहून आयोजक व परीक्षक यांना खूप समाधान वाटले. यामध्ये राहुल बागुल यांनी प्रथम क्रमांक, ज्ञानेश्वर सोनवणे यांनी द्वितीय क्रमांक तर अविनाश प्रभाकर कांबळे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. सर्व विजय स्पर्धकांना १५ मार्च रोजी कामोठे येथे गौरवण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष मेघा महाजन यांनी दिली.

## माणगाव पोलिसांची दमदार कामगिरी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

गतवर्षी ऑगस्ट महिन्यात माणगावातील विद्या नगर सिद्धी कॉम्प्लेक्स येथील रविंद्र पादीर यांच्या घरात चोरट्यांनी घरफोडी करून ८ लाख ६१ हजार रुपये किमतीचा मुद्देमल लंपास केला होता. तर, नोव्हेंबर २०२३ रोजी लोणशी येथील दिनेश केकाणे यांच्या घरात ६४ हजार ३०० रुपयांची चोरी झाली होती. माणगाव पोलिसांनी दोन्ही गुन्ह्यांचा उकल केला असून संबंधितांना मुद्देमाल परत केला आहे.

## दुधणीत अंगणवाडी इमारतीचे भूमीपूजन

**| पाली | प्रतिनिधी |**

सुधागड तालुक्यातील ताडगाव ग्रामपंचायत हद्दीतील दुधणी गावामध्ये नवीन अंगणवाडी इमारतीचे भूमिपूजन बुधवारी (दि.२५) जिल्हा परिषद शाळेजवळ पार पडले. दुधणी गावात स्वातंत्र्यानंतर प्रथमच अधिकृत अंगणवाडी केंद्राची सुविधा उपलब्ध झाली असून, हा गावाच्या शैक्षणिक व सामाजिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. यापूर्वी हे केंद्र स्वरदिव्या वेल्फेअर फाऊंडेशन पुणे-रायगड यांच्या माध्यमातून



तात्पुरत्या स्वरूपात चालविण्यात येत होते. सातत्यपूर्ण पाठपुरावा व संबंधित विभागांशी समन्वय साधून जून २०२५ पासून महिला व बालविकास विभागाअंतर्गत या अंगणवाडी केंद्राला मंजुरी मिळाली असून सध्या अंगणवाडी समाज मंदिर येथे सुरू आहे.

### भरधाव एसटी बसमधील चालकाला चक्कर | वाहकाच्या प्रसंगावधानाने टळला अनर्थ

# नितीन मोरे... प्रवाशांचे प्राण वाचवणारा नायक

**| कर्जत | संजय गायकवाड |**

पनवेलहून कर्जतकडे येणाऱ्या एसटी बसमध्ये तणावपूर्वक वातावरण निर्माण झाले होते. यावेळी चक्क बस चालकाला चक्कर आल्याने एकच गोंधळ उडाला होता. मात्र, बसचे वाहक नितीन मोरे यांनी प्रसंगावधान राखत बसचा ताबा आपल्या हातात घेतला. अत्यंत संयमाने आणि कौशल्याने त्यांनी बस सुरक्षितपणे कर्जतपर्यंत आणली. त्यांच्या या धाडसी आणि समयोचित कृतीमुळे संभाव्य अनर्थ टळला.



पनवेलहून कर्जतकडे येणारी एसटी बस सोमवारी (दि.२४) सायंकाळच्या सुमारास प्रवाशांनी खचाखच भरलेली होती. ती चौक फाटा येथे पोहोचली असता अचानक एकच गोंधळ उडाला. "अहो, यांना चक्कर येते!" असा आवाज पुढील बाजूने आला आणि काही क्षणांसाठी प्रवाशांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. सुरुवातीला नेमके कोणाला त्रास होत आहे, हे स्पष्ट होत नव्हते. मात्र, काही क्षणांतच समजले की, बसचे चालक संदीप सोनावणे यांना अचानक चक्कर आली आहे. परिस्थिती गंभीर बनण्याची शक्यता लक्षात येताच बसमधील वातावरण तणावपूर्ण झाले होते. पुढे काय होणार, हा प्रश्न सर्वांच्या मनात निर्माण झाला. याचवेळी बसचे वाहक नितीन मोरे यांनी अत्यंत प्रसंगावधान दाखवत तत्काळ पुढाकार घेतला. त्यांनी चालकाला सुरक्षितपणे बाजूला बसवले आणि स्वत: चालकाच्या सीटवर बसून बसचा ताबा घेतला. अत्यंत संयमाने आणि कौशल्याने त्यांनी बस सुरक्षितपणे कर्जतपर्यंत आणली. त्यांच्या या धाडसी आणि समयोचित कृतीमुळे संभाव्य अनर्थ टळला. साधारण सायंकाळी साडेसात वाजताच्या सुमारास एसटी बस कर्जत आगारात सुरक्षित पोहोचली. प्रवाशांनी वाहकाच्या या कार्याचे मनापासून कौतुक केले आणि समाधान व्यक्त केले.

घटनेनंतर सामाजिक कार्यकर्ते विकास चित्ते यांनी बस स्थानकापर्यंत जाऊन चालकाच्या प्रकृतीची चौकशी केली. तसेच, स्थानक अधिकाऱ्यांना संपूर्ण परिस्थितीची माहिती देऊन वाहकाने केलेल्या धाडसी कामाची नोंद घेण्याची विनंती केली. त्यानंतर बसचे वाहक नितिन मोरे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचे आभार मानले. चालक संदीप सोनावणे यांना तत्काळ दवाखान्यात दाखल करण्यात आले. उष्माघातामुळे त्यांना त्रास झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले असून सध्या त्यांची प्रकृती उत्तम असल्याची माहिती मिळाली आहे.

> **या संपूर्ण प्रसंगात वाहक नितीन राजाराम मोरे हे खऱ्या अर्थाने खाकी वर्दीतले देवदूत ठरले. त्यांच्या धैर्य, जबाबदारीची जाणीव आणि प्रसंगावधानामुळे अनेक प्रवाशांचे जीव सुरक्षित राहिले.**
> **– विकास चित्ते, सामाजिक कार्यकर्ते**

## श्रीवर्धन येथे समाज जनजागृती अभियान

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन कुणबी समाजोन्नती संघातर्फे भव्य रक्तदान शिबीर व समाज जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. समाजातील ऐक्य, परस्पर सहकार्य आणि मानवतावादी दृष्टिकोन अधिक दृढ व्हावा, या हेतूने दरवर्षीप्रमाणे यंदाही हा उपक्रम उत्साहात राबविण्यात येत आहे. कुणबी समाजाचे नेते ग.स. कातकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची परंपरा पुढे चालविण्याच्या उद्देशाने रविवारी (दि.८) भव्य रक्तदान शिबिरावे आयोजन करण्यात आले आहे. तसेच, या शिबिरात महिलांच्या आरोग्याविषयी विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. विविध स्त्रीरोग, त्यावरील उपचार, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि आरोग्य तपासणी याबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन केले जाणार आहे. यासाठी वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ. मधुकर ढवळे उपस्थित राहून महिलांना सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत. ग्रामीण भागातील महिलांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढावी, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे.




## राशीभविष्य

▶**मेष** : आर्थिकदृष्ट्या उत्पन्नाचा नवा मार्ग लाभेल. नवे संकल्प प्रत्यक्षात येऊ लागतील. सुसंधी लाभेल.
▶**वृषभ** : नव्या व्यवहारात धोका पत्करु नका. वारसाहक्काचे प्रश्न सामंजस्याने सोडवावे. विचाराने रहावं.
▶**मिथुन** : साथीदाराची प्रगती पाहून आनंद वाटेल. सौख्याच्या घटना घडतील. धनप्राप्ती होईल.
▶**कर्क** : वैवाहिक जीवनाची सुरूवात आनंददायी प्रसंगाने होईल. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल.
▶**सिंह** : नोकरी-व्यवसायात अपेक्षित प्रगती होईल. महत्त्वाचे प्रश्न मार्गी लागतील. प्रवास घडणार आहे.
▶**कन्या** : मौल्यवान वस्तूंची खरेदी कराल. साथीदाराची योग्य साथ मिळेल. अडचणी कमी होतील.
▶**तूळ** : आर्थिक फायद्याच्या बातम्या कळाल्याने समाधान वाढेल. बोलताना विचार करा. बाकी चिंता नको.
▶**वृश्चिक** : आवडीच्या गोष्टीसाठी वेळ देता येईल. उत्साहवर्धक घटना घडतील. मानसिक स्वास्थ लाभेल.
▶**धनु** : दिवसाची सुरूवात चांगल्या घटनेने होईल. महत्त्वाची जबाबदारी स्वीकारावी लागेल.
▶**मकर** : योजलेली कामं मनासारखी होतील. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. वेळीच योग्य निर्णय घ्या.
▶**कुंभ** : कार्यक्षेत्रात मनासारख्या घटना घडतील. निर्णय घेण्यासाठी विलंब करु नका. सुसंधी लाभतील.
▶**मीन** : संततीबाबत शुभघटना घडतील. घरातलं वातावरण आनंदी राहील. अडचणी सुटणार आहेत.

स्टाईल स्टेटमेंट

## फॅशन शरारा साडीची

खरं तर शरारा साडी हा प्रत्यक्षात साडीचा प्रकार नाही. मध्यंतरी आलियाने शराऱ्याला 'ट्विस्ट' देत हा साडी लूक कॅरी केला. तिने निळ्या शराऱ्यावर त्याच रंगाचा ब्लाउज घातला आणि तसाच दुपट्टाही घेतला. हाच दुपट्टा तिने साडीच्या पदरासारखा ड्रेप केला. या मुळे शराऱ्याला साडी लूक मिळाला. तुम्हीही याच पद्धतीने शरारा कॅरी करू शकता. यात वेगवेगळी कॉम्बिनेशन्स करता येतील. दुपट्ट्यांचे अनेकविध प्रकार उपलब्ध आहेत. त्यांचा वापर करून वेगवेगळ्या रंगसंगतींचे प्रयोग तुम्ही करू शकता. आलियाप्रमाणे इतर अभिनेत्रींनी या आधी हा पेहराव कॅरी केला होता. शिल्पा शेट्टीने बेज रंगाच्या ट्यूब टॉपसोबत त्याच रंगाचा शरारा घातला होता. त्यावर साडी स्टाईलने दुपट्टा घेतला. या लूकला वेस्ट बेल्टमुळे चार चांद लागले. कतरिना कैफही एका कार्यक्रमात लाल रंगाची शरारा साडी घालून मिरवत होती. तुम्हालाही एकाच प्रकारची साडी नेसून कंटाळा आला असेल किंवा नवं काही ट्राय करायचं असेल तर शरारा साडीचा परफेक्ट ऑप्शन आहे. चला तर मग, ठेवणीतला शरारा बाहेर काढा आणि त्याला आपल्या कल्पकतेने साडी स्टाईल ट्विस्ट द्या.

## २७ फेब्रुवारी

दिनविशेष

**१९१२** : ज्येष्ठ कवी आणि नाटककार वि. वा. शिरवाडकर यांचा जन्म.
**२०१४** : माजी लष्करप्रमुख जनरल व्ही.के.सिंह भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती.
**२०१६** : अमेरिकेतील न्यायालयात सॅमसंगविरुद्ध ॲपलमधील खटल्यात सॅमसंगच्या बाजूने निकाल लागला.
**२०१८** : पीएनबी गैरव्यवहारातील मुख्य आरोपी नीरव मोदीच्या 'फायरस्टार डायमंड' कंपनीचा दिवाळखोरीसाठी अमेरिकी न्यायालयात अर्ज.

सफर देशांची

## असा आहे गॅबॉन

'गॅबॉन' किंवा 'गॅबनिज रिपब्लिक' हा आफ्रिका खंडातला विषुववृत्तावरचा देश आहे. कॅमेरुन, कांगो हे गॅबॉनचे शेजारी. 'लिब्रेव्हिले' ही गॅबॉनची राजधानी. २,७०,००० चौरस किलोमीटर परिसरात पसरलेल्या गॅबॉनची लोकसंख्या दीड कोटींच्या आसपास आहे. गॅबॉन ही फ्रान्सची वसाहत होती. १७ ऑगस्ट १९६० या दिवशी त्यांना स्वातंत्र्य मिळालं. सुरूवातीला या देशात फक्त एकाच पक्षाची सत्ता होती. मात्र १९९० नंतर इथे आघाडीचं सरकार आलं. सब साहारन आफ्रिकेतल्या श्रीमंत देशांमध्ये गॅबॉनची गणना होते. हा देश मध्य आफ्रिकेतल्या अटलांटिक किनाऱ्यावर आहे. देशाचा ८५ टक्के भाग जंगलांनी व्यापला आहे. त्यामुळे इथे पक्ष्यांच्या ७७७ प्रजाती सुखाने नांदत आहेत. 'ऑग्यू' ही गॅबॉनमधली सर्वात मोठी नदी. १२०० किलोमीटर लांब असलेली ही नदी पाण्याचा मुख्य स्रोत आहे. या देशावर फ्रेंचांनी राज्य केल्यामुळे फ्रेंच इथली अधिकृत भाषा आहे. या देशात मँगनीज, युरेनियम, फॉस्फेट, लोह, नैसर्गिक वायू, सोनं, हिरे अशी नैसर्गिक साधनसंपत्ती सापडते. गॅबॉनला प्राचीन संस्कृती असून सांस्कृतिकदृष्ट्या हा देश समृद्ध आहे. पौराणिक कथा आणि लोककथांचं भांडार या देशात आहे.

### पंचांग

**शुक्रवार २७ फेब्रुवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, फाल्गुन शु. ११, चंद्रराशी : मिथुन, नक्षत्र : आर्द्रा, योग : आयुष्मान, सूर्योदय ७.०२, सूर्यास्त ६.४१

### फॉरवर्डस

**कुछ कश्तियाँ डुब जातीं हैं अपनीं हीं सुराखों क़ी वजह से...**

**यूँ हर बार इल्ज़ाम साहब तूफानों पर लगाना ठीक नहीं...!**

आरोग्यमंत्र

## सकारात्मक विचार करा

दंतवैद्यांची, डेंटल क्लिनिकमधील वातावरणाची भीती असणं यालाच डेंटल फोबिया किंवा एंग्झायटी म्हणतात. अशी भीती निर्माण होण्यामागे अनेक कारणं आहेत. आधीच्या वेदनादायी अनुभवानंतर पुन्हा असा अनुभव घेताना भीती वाटू शकते. असुरक्षिततेची भावना, उपचारासाठी खुर्चीवर बसल्यानंतर वाटणारी भीती, स्वत:वर नियंत्रण न राहणं, तोंड उघडताना वाटणारी अस्वस्थता, ओशाळलेपण यामुळे अशी समस्या निर्माण होऊ शकते. डेंटिस्टकडे जाण्याआधी अस्वस्थ वाटणं, झोप न येणं, डॉक्टरकडे गेल्यानंतर ताण येणं,



निराश, हताश वाटणं, डेंटिस्टकडे जाण्याआधी आजारी असल्यासारखं वाटणं, दातांची तपासणी होत असताना भीती वाटणं आणि श्वास घ्यायला त्रास होणं ही या त्रासाची लक्षणं मानता येतील. या विकारावर उपचार शक्य आहेत. आपली भीती दंततज्ज्ञाकडे व्यक्त करा. दातांच्या उपचारांविषयी डेंटिस्टशी बोलून घ्या. उपचारांदरम्यान लक्ष दुसरीकडे वळवा. गाणी ऐका, तीव्ही बघा. वेदना कमी करण्याचा प्रयत्न करा. त्यासाठी वेदनाशामक औषधं घेता येतील. याविषयी दंततज्ज्ञाशी बोला. ताण निवारणाच्या उपाययोजना करा. डेंटिस्टकडे जाण्यापेक्षा दातांच्या वेदना सहन करणं तुम्हाला अधिक योग्य वाटत असेल तर मानसोपचारतज्ज्ञाची मदत घ्या. उपचारानंतर दूर होणाऱ्या वेदनारहित आयुष्याचा विचार करा. सकारात्मकतेने ही भीती दूर सारा.

### वेगळ्या वाटा

दोस्तांनो, अगदी कमी भांडवलात तुम्ही व्यवसायाच्या वेगळ्या वाटा निवडू शकता. कमी बजेटच्या व्यवसायाचे हे काही पर्याय...

* सोशल मिडिया हे सध्याचं प्रभावी माध्यम आहे. प्रत्येक ब्रँडला सोशल माध्यमांवर जाहिराती करायच्या असतात. फेसबुकशिवाय इन्स्टाग्राम, लिंक्ड इनवरही सध्या व्यवसाय वृद्धी करण्याचा प्रयत्न होतो. नेटवर्किंगसाठीही हे माध्यम वापरलं जातं. अशा सेवा तुम्हीही देऊ शकता. यासाठी तुमच्याकडे कल्पकता हवी. इतरांपेक्षा वेगळ्या कल्पना लढवल्या तर कमी बजेटमध्ये उत्तम व्यवसाय करता येईल. **(क्रमश:)**

करिअरवाटा

## मदत स्पेशलाईज्ड कोर्सेसची

कोणत्याही कंपनीचं कामकाज विविध विभागांमध्ये चालतं आणि त्यासाठी कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असते. विविध विभागांसाठी विक्री व्यवस्थापक, मनुष्यबळ, वित्तीय व्यवहार, नियोजन अशा व्यवस्थापकांची आवश्यकता असते. परंतु प्रत्येक शाखेशी निगडित स्पेशलाईज्ड अभ्यासक्रम पूर्ण केलेले व्यवस्थापक मिळतातच असं नाही. शिवाय एवढे व्यवस्थापक नेमणं कंपनीला शक्य होतंच असं नाही. त्यामुळे एकाच व्यवस्थापकावर सगळ्या विभागांचं काम सोपवलं जातं. अशी कायपद्धती असल्यामुळेच



काही वेळा आय.टी.मध्ये तज्ज्ञ असणाऱ्या व्यवस्थापकाला अकौंटस्चं काम बघावं लागतं. याचाच विचार करूनच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट कोझिकोडे या संस्थेनं स्वतंत्र मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्रॅम तयार केला. या प्रोगॅममध्ये सध्या कामावर असलेल्या, अकौंटस्चं प्रशिक्षण न घेतलेल्या परंतु ते काम करावं लागणाऱ्या व्यवस्थापकांना प्रवेश दिला जातो. त्यांना इंडियन फिनान्शियल मार्केट, टाईम व्हॅल्यू ऑफ मनी, अंडरस्टँडींग फिनान्शियल स्टेटमेंट, कॅपिटल बजेटिंग, ब्रेक इव्हन ॲनेलिसीस, बजेटरी कंट्रोल आणि स्टँडर्ड कॉस्टिंग आदी विषयांचं ज्ञानही दिलं जातं.

खेचाखेची

## आर यू इंटरेस्टेड?

५५ वर्षाचा असलो तरी आज सकाळपासून सात जणींनी मला 'आर यू इंटरेस्टेड?', असं विचारलंय..

तिघींनी 'होम लोन' साठी, दोघींनी 'कार लोन' साठी आणि दोघींनी 'क्रेडिट कार्ड' साठी...!!!

### वेगळं काही

'एजिलिटी रोबोटिक्स' या अमेरिकन स्टार्ट अपने दोन पायांचा रोबो तयार केला आहे. 'डिजिट' नावाचा हा रोबो घरपोच सेवा देण्यासाठी वापरला जाऊ शकतो, असं या कंपनीचं म्हणणं आहे. 'डिजिट' १८ किलो वजन उचलू शकतो. आपल्या दोन हातांचा वापर तो वजन उचलणं, संतुलन साधणं आणि दार उघडण्यासारख्या कामांसाठी करू शकतो. इतकंच नाही, तर त्याचे हात चारही बाजूंनी फिरू शकतात. यासोबतच खाली पडणारी वस्तूही तो अलगद झेलू शकतो. या रोबोमध्ये दोन 'मल्टी कोअर सीपीयू' बसवण्यात आले आहेत. यासोबतच एका मॉड्यूलर पेलोडची सोयही आहे. यामुळे गरज असेल तर आणखी एक प्रोसेसरही बसवता येईल.

## खारं पाणी केसांसाठी घातक

भटकंती

सुट्टीतील भटकंती म्हणून अनेकजण बीचची निवड करतात. समुद्रात मनसोक्त डुंबलं जातं. दंगामस्ती होते. पण समुद्रस्नानामुळे केसांचा पोत बिघडतो. ते टाळण्यासाठी सोप्या ट्रिक्स वापरून केसांची काळजी कशी घ्यावी हे जाणून घ्या.



* समुद्रकिनारी वास्तव्य असेपर्यंत एक दिवसाआड केसांचं कंडिशनिंग करावं. धूळ, ऊन आणि रेतीमुळे केस कोरडे होतात. हे लक्षात घेता केसांवर हेअर मास्कचा वापरही करता येऊ शकतो. * समुद्रात जाण्यापूर्वी केस साध्या पाण्याने ओले करून घ्यावेत. त्यामुळे केसांकडून खारं पाणी कमी प्रमाणात शोषलं जाईल. * बीचवर जाताना स्कार्फ आणि हॅट्चा वापर करणं गरजेचं ठरतं. त्यामुळे केसांचं नुकसान टाळणं शक्य आहे. * बीचवर दिवसभर उन्हात राहिल्यानंतर केसांवर ड्रायरचा वापर करणं योग्य नाही. ब्लो ड्रायरने सुकवण्याऐवजी केस नैसर्गिकरित्या वाळवावेत. * बीचवर जाताना केसांसाठी कुठलं प्रॉडक्ट योग्य ठरेल याचा अंदाज घ्या. केसांसाठी अँटी फ्रीजिंग प्रॉडक्ट आणि सन प्रोटेक्शन शँपूचा वापर करा. सीरमचा वापरही लाभदायक ठरेल.

## सुडोकू ७०


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | | ७ | | | | | १ | ६ |
| | १ | | ६ | | २ | | | ८ |
| | ९ | | ८ | १ | ४ | २ | ३ | |
| | | ८ | ७ | ६ | | | | ९ |
| ७ | | | | ९ | | | | ५ |
| ९ | | | | ४ | ८ | ३ | | |
| | ८ | २ | ३ | ५ | ६ | | ९ | |
| ४ | | | १ | | ९ | | ६ | |
| ६ | ३ | | | | | ५ | | १ |

**टीप -**
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ६९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ८ | ३ | ५ | २ | १ | ७ | ६ | ४ |
| २ | १ | ६ | ९ | ७ | ४ | ३ | ८ | ५ |
| ५ | ४ | ७ | ८ | ३ | ६ | ९ | २ | १ |
| ६ | ५ | ८ | ३ | ४ | ९ | १ | ७ | २ |
| ७ | ९ | १ | २ | ५ | ८ | ४ | ३ | ६ |
| ३ | २ | ४ | ६ | १ | ७ | ५ | ९ | ८ |
| १ | ६ | २ | ७ | ९ | ५ | ८ | ४ | ३ |
| ४ | ३ | ९ | १ | ८ | २ | ६ | ५ | ७ |
| ८ | ७ | ५ | ४ | ६ | ३ | २ | १ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक ७०



**आडवे शब्द :-**
१) वाईट कृत्य केले नसल्यास भिण्याचे कारण नाही या अर्थाची म्हण
८) माफ
९) हजार किलो
१०) सोन्याचा धागा
११) श्रीमंत
१३) एक शिरोभूषण, गुच्छ
१५) लांबसडक नकली केस
१७) च्या आड लपून बसणे
२०) घरे वगैरे पाडण्याची क्रिया
२२) पृष्ठभागावरील निघालेला छोटा तुकडा
२४) बारीक केस
२५) जळजळीत, उग्र
२८) भांडणे लावण्याचा एक प्रकार
३०) घटस्फोट
३१) विळखा, मिठी
३२)पलंग
३४) करारातील अटीची भाषा
३७) भाषण, उक्ती
३९) लाकूड छिलण्याचे हत्यार
४१) खात्यावर आणणे वा परतफेडीच्या बोलीवर माल आणणे
४५) मिठाई तयार करणारा
४७) घोडे बांधण्याची जागा
४८) उत्सवाचे दिवस
५०) पाणी उकळताना होणारा आवाज
५२) श्रेष्ठ पुरुष
५४) सोन्याची शाई
५७) ऐतिहासिक गद्य लिखाण
५८) दालचिनी
५९) चक्र
६०)नावाचा जयघोष
६४) थेट, सरळ
६७)वांती
६८)एक पालेभाजी
७१)जय पराजय
७३) श्रीमंत, दैववान
७५) निमगोरी
७७) व्रत
७८) शरीर
७९) पोलीस
८०) काळ्या तोंडाचे माकड

**उभे शब्द :-**
१) परिस्थिती कधीही सारखी नसते या अर्थाची एक म्हण
२) अपशकुन स्वत:बदालची कमीपणाची भावना
४) फाजील सलगी, लघळपणा
५) मातीचा कण
६) कळलाव्या मुनी
७) कपड्याचा काठाला लावलेली चुणीदार पट्टी
८) नाशिवंत
११) श्रीविष्णूचे एक नाव
१२) रवाळ
१४) चिखल
१६) आश्चर्यचकीत करणारी गोष्ट
१८) बालवयात शौर्य गाजविणारा
१९) ताकद, शक्ती, बळ
२१) इमारतीचा मूळ आधार
२३) लबाडीचा हेतू
२६) उगाच, अकारण
२७) कोवळ्या दुधाचा (चिकाचा) पदार्थ
२९) लाजणारा
३०) पुष्कळ
३३) पचविणे, जठराग्नी
३५) चंचल, पातळ, क्षणिक
३६) मीठ
३८) तारणारा
३९) खराब
४०) समतल
४२) दोरा
४३) म्हातारपण
४४) गंध
४५) विरोध, प्रतिबंध
४६) उत्तराधिकारी
४९) मार्ग, रस्ता
५१) धोबी
५३) खोडण्याचे साधन
५५) चांदी
५६) मनावर ठेवलेला ताबा
५९) नोकर
६०) पडदा
६१) प्रजा, रयत
६२) लमाण, तांड्यातील माणूस
६३) किंमत
६५) पानांसह कोवळी फांदी
६६) रात्रभर
६९) पिकांवरील एक रोग
७०) त्या प्रमाणे
७२) आयुष्य
७४) अंगातील मस्ती, जोम
७६)छाती

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



विनायक दळवी

# श्रीलंकेतला विश्वचषक आता यजमानांशिवाय

यंदाच्या २० विश्वचषक स्पर्धेचे सह यजमान श्रीलंका, स्पर्धेबाहेर पडले आहेत. न्युझीलंड विरुद्ध सामन्यातील पराभव नंतर श्रीलंका संघ या स्पर्धेच्या बाहेर फेकला गेला. एकेकाळचा तडाखे बंद फलंदाजीसाठी प्रसिद्ध असलेला हा संघ फलंदाजीतील सुमार कामगिरी झाल्यामुळेच, स्पर्धेबाहेर गेला आहे.

सनथ जयसूर्यासारखा तडाखेबंद, स्फोटक फलंदाज ज्या संघाचा प्रशिक्षक होता. त्या संघावर फलंदाजी खराब झाल्यामुळे ही नमुष्की ओढावली आहे. कप्तान दसून शनका याची चिडचिड आणि अगदी कथा पाहिली की अपेक्षाभंगाचे दुःख काय असते याची जाणीव होते. त्याने सर्वप्रथम आपल्या देशवासीयांची, अपेक्षाभंग केल्यामुळे माफी मागितली. सभोवतालच्या नकारात्मक वातावरणावर सर्वप्रथम त्याने टीका केली. संघाविरुद्ध सतत मत व्यक्त होणे. स्टेडियममधील क्रिकेट रसिकांचा, काही वेळा तिरस्कार किंवा नकारात्मक सूर. तो आवाज श्रीलंका संघाला कायम निरुत्साही करणारा ठरला. परत श्रीलंका संघाने यावेळी फलंदाजीसाठी चांगल्या खेळपट्ट्या मिळतील अशी अपेक्षा केली होती. प्रामुख्याने त्यांचे सामने असलेल्या प्रेमदासा स्टेडियमवरील खेळपट्टी अगदी या गोष्टीच्या उलट ठरली. आणखी दुर्दैवी गोष्ट अशी की त्यांचे तीन प्रमुख आंतरराष्ट्रीय दर्जाचे फिरकी गोलंदाज जायबंदी होते. वाणेंगु हसरंगा, माथिशा पथीराना, ईशान मलिंगा येथील फिरकी गोलंदाज दुखापतीमुळे संघाबाहेरच होते. त्याचवेळी श्रीलंकेत खेळणाऱ्या सर्व आंतरराष्ट्रीय संघाच्या फिरकी गोलंदाजांनी, विकेटची लय लूट केली होती. त्यामुळे फिरकीसाठी प्रसिद्ध असलेल्या श्रीलंका संघाच दुःख आणखीनच वाढलं.

श्रीलंकेची फलंदाजी अपेक्षेप्रमाणे चांगली झाली नाही. दर्जेदार फिरकी गोलंदाज संघात नसल्यामुळे प्रतिस्पर्धी संघाने धावाही चांगल्याच फटकावल्या. श्रीलंकेच्या क्रिकेट संघाची अलीकडील कामगिरी पाहता, एकेकाळी जागतिक क्रिकेटवर अधिराज्य गाजवणारा हा संघ सध्या मोठ्या संकटातून जात असल्याचे दिसून येते. संघातील खेळाडूंचा फिटनेस चांगला नाही हीच त्यांची मुख्य समस्या आहे.या सततच्या घसरणीमागे अनेक तांत्रिक, प्रशासकीय आणि मानसिक कारणे आहेत. श्रीलंकेच्या फलंदाजीमध्ये सध्या मोठ्या प्रमाणावर अस्थिरता आहे. संघाला केवळ एक किंवा दोन खेळाडूंवर अवलंबून राहावे लागत आहे. 'पावरप्ले' मध्ये श्रीलंकेला आक्रमक खेळ करता आला नाही. त्यांची सुरुवात नेहमीच खराब होत होती.

न्यूझीलंडविरुद्ध महत्त्वाच्या सामन्यात श्रीलंकेने पावरप्लेमध्ये केवळ २० धावा केल्या. ही त्यांच्या इतिहासातील नीचांकी कामगिरी ठरली. तंदुरुस्तीचा ढासळलेला दर्जा हे श्रीलंकेच्या पराभवाचे एक मोठे कारण आहे. कर्णधार दसुन शनाकाने स्वतः मान्य केले की संघाचा फिटनेस जागतिक स्तरावर टिकणारा नाही. स्पर्धेच्या वेळी सर्व प्रमुख खेळाडू जायबंदी होणे किंवा अनफिट असणे हे संघासाठी मारक ठरल. श्रीलंका क्रिकेट बोर्ड हे जगातील सर्वात वादग्रस्त बोर्डांपैकी एक आहे. संघ निवड आणि क्रिकेट बोर्डाच्या प्रशासकीय कामात क्रीडा मंत्रालयाचा सतत हस्तक्षेप आणि अडथळा येत असल्याच्या अनेक तक्रारी आहेत. अलीकडच्या काळात श्रीलंकेने अनेक कर्णधार बदलले. त्यामुळे खेळाडूंमध्ये अस्थिरतेची भावना वाढायला लागते. संघ 'सेटल' होण्याच्या दृष्टीने देखील अडथळे निर्माण होतात.

कर्णधार शनाकाच्या मते, सोशल मीडिया आणि बाहेरील जगातून होणारी टीका खेळाडूंच्या मानसिक आरोग्यावर परिणाम करत आहे. त्यामुळे नकारात्मक वातावरणात संघ चांगली कामगिरी करू शकत नाही. अखेरच्या हाणामारीच्या षटकात फटकेबाजी करणारे फलंदाज श्रीलंकेकडे नव्हते. त्यामुळे श्रीलंकेला प्रतिस्पर्ध्यांपुढे आव्हानात्मक लक्ष ठेवता आले नाही. तसेच छोट्या धावसंख्येचा पाठलाग करताना देखील अंतिम ध्येयापर्यंत पोहोचता आले नाही. श्रीलंकेच्या क्रिकेटला पुन्हा वैभवाच्या शिखरावर नेण्यासाठी केवळ मैदानावरील बदल पुरेसे नसून, बोर्डाचे प्रशासन सुधारणे, खेळाडूंचा फिटनेस वाढवणे आणि राजकीय हस्तक्षेप पूर्णपणे थांबविणे गरजेचे आहे. तरच आणि तरच, श्रीलंका संघ एकेकाळी ज्या क्रिकेटसाठी प्रसिद्ध होता, लोकप्रिय होता, ते चित्र पुन्हा पहावयास मिळेल.

## चौघांचे करिअर धोक्यात; अभिषेक, तिलक, रिंकू , सूर्यावर टीकेची झोड

# विश्वचषकात फ्लॉप शो



| मुंबई | प्रतिनिधी |

२०२६ च्या टी-२० विश्वचषकात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मिळालेल्या दारूण पराभवानंतर भारतीय संघाचा उपांत्य फेरीचा मार्ग अत्यंत खडतर झाला आहे. या पराभवामुळे भारताचा नेट रन रेट उणे ३.८०० (-३.८००) पर्यंत खाली घसरला आहे. आता 'सूर्या ब्रिगेड'ला स्पर्धेत टिकून राहण्यासाठी स्वतःच्या कामगिरीसोबतचइतरसंघांच्या निकालावरही अवलंबून राहावे लागणार आहे. दरम्यान, स्पर्धेतील खराब कामगिरीमुळे अनेक बड्या खेळाडूंवर टीकेची झोड उठत असून, टीम इंडिया स्पर्धेतून बाहेर पडल्यास त्यांचे आंतरराष्ट्रीय करिअर धोक्यात येऊ शकते.

भारताला आता सुपर ८ मधील उर्वरित सामन्यांमध्ये चांगली कामगिरी करावी लागणार आहे. आज होणाऱ्या झिम्बाब्वे विरुद्धच्या सामन्यात विजय मिळवणे भारतासाठी आवश्यक आहे. मात्र, केवळ विजय पुरेसा नाही, भारताला दक्षिण आफ्रिकेच्या मदतीचीही गरज आहे. जर दक्षिण आफ्रिकेने वेस्ट इंडिजला पराभूत केले, तरच भारताच्या सेमीफायनलमध्ये पोहोचण्याच्या आशा जिवंत राहतील. याउलट, वेस्ट इंडिजचा विजय भारताला स्पर्धेबाहेर काढू शकतो.

### अभिषेक शर्मा

टी-२० क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या अभिषेक शर्माने या विश्वचषकात सर्वांना निराश केले. चार सामन्यांत त्याने केवळ १५ धावा केल्या आहेत, ज्यात तीन वेळा तो शून्यावर बाद झाला आहे. १ जानेवारी २०२५ पासून ३० सामन्यांत १०५६ धावा करणाऱ्या अभिषेकचा फॉर्म अचानक हरवल्याने संघ व्यवस्थापन चिंतेत आहे. त्याच्या जागी यशस्वी जयस्वाल किंवा १४ वर्षीय युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी यांचे पर्याय समोर येत आहेत.

### तिलक वर्मा

महत्त्वाच्या तिसऱ्या क्रमांकावर खेळणाऱ्या तिलक वर्माने पाच डावांत केवळ १०७ धावा केल्या आहेत. २१.४० ची सरासरी आणि ११८.८८ चा स्ट्राईक रेट या क्रमांकासाठी पोषक नसल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. खुद्द सुनील गावस्कर यांनीही त्याच्या शॉट सिलेक्शनवर ताशेरे ओढले आहेत. त्याच्या जागी श्रेयस अय्यरचा विचार होऊ शकतो.

### रिंकू सिंग

'फिनिशर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रिंकू सिंगला या विश्वचषकातफारशीचमकदाखवता आलेली नाही. पाच सामन्यांत त्याने केवळ २४ धावा केल्या आहेत. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध तो शून्यावर बाद झाला. काहींच्या मते त्याला पुरेशी फलंदाजी मिळालेली नाही, तरीही संघात जागा टिकवण्यासाठी त्याला चांगली कामगिरी करावी लागणार आहे.

### सूर्यकुमार यादव

कर्णधार सूर्याने पाच डावांत १८० धावा केल्या असल्या तरी, त्याच्या नॅच्युरल १६२.७७ च्या स्ट्राईक रेटच्या तुलनेत विश्वचषकातील १२७.६५ चा स्ट्राईक रेट खूपच कमी आहे. ३५ वर्षीय सूर्यासाठी हा विश्वचषक निर्णायक ठरू शकतो. जर भारत या स्पर्धेतून लवकर बाहेर पडला, तर त्याच्या कारकिर्दीबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ शकतात.

## कायदेशीर सामना धवनने जिंकला!

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतीय सलामीवीर शिखर धवनला दिल्लीतील कौटुंबिक न्यायालयाकडून दिलासा मिळाला. त्याची पहिली पत्नी आयशा मुखर्जी हिला त्याला ५.७२ कोटी द्यावे लागणार आहेत. शिखर धवन आणि ऑस्ट्रेलियन नागरिक असलेली आयेशा मुखर्जीबरोबर २०१२ मध्ये लग्न झाले होते. त्यानंतर २०१४ मध्ये त्यांना पुत्ररत्न प्राप्तीही झाली. मात्र ८ वर्षांच्या संसारानंतर ते वेगळे झाले. त्यानंतर त्यांचा २०२३ मध्ये घटस्फोट झाला होता. तेव्हापासून त्यांच्यात न्यायिक लढा सुरू आहे. खरंतर ऑस्ट्रेलियाच्या कुटुंबिय न्यायालयाने प्रॉपर्टी सेटलमेंटबाबत आदेश दिल्यानंतर हे प्रकरण सुरू झाले. तिने याबाबत ऑस्ट्रेलियन न्यायालयात धाव घेतली होती. प्रॉपर्टी सेटलमेंटमध्ये पती-पत्नीच्या वैवाहित संपत्तीची वाटणी केली होती. या प्रकरणात शिखर धवनला ५.७२ कोटी रुपये आयेशाला द्यायला सांगितले होते. यानंतर दिल्ली कौटुंबिक न्यायालयाने भारतात ऑस्ट्रेलियाच्या आदेशाच्या वॅलिडिटीला आव्हान दिले होते.

## ७२वी वरिष्ठ पुरुष गट कबड्डी स्पर्धा

# महाराष्ट्राचा बाद फेरीतील प्रवेश निश्चित

| बडोदा | वृत्तसंस्था |

महाराष्ट्राने ७२व्या वरिष्ठ पुरुष राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत आज दुसऱ्या दिवशीच्या सायंकाळ च्या सत्रात दुसऱ्या विजयाची नोंद केली. गुजरात बडोदा येथील सागा बंदिस्त क्रीडा संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेतील ड गटात महाराष्ट्राने कर्नाटकचा प्रतिकार ४९-२५ असा मोडून काढला. महाराष्ट्राची गटातील शेवटची साखळी लढत त्रिपुरा संघाशी होईल. आक्रमक सुरुवात करीत महाराष्ट्राने पूर्वार्धात २४-१३ अशी आघाडी घेत आपला इरादा स्पष्ट केला. उत्तरार्धात तोच जोश कायम ठेवत आपला विजय साकारला.महाराष्ट्राच्या असलम इनामदार यांनी चौफेर चढाया करीत कर्नाटकचा बचाव खिळखिळा करून टाकला.




**महाराष्ट्राची विजयी सलामी.**
रात्री उशीरा झालेल्या पहिल्या ड गटातील सामन्यात महाराष्ट्राने दिल्लीचे आव्हान ५०-३७ असे परतवून लावले. दोन्ही संघानी एकमेकांचा अंदाज घेत खेळ केल्याने मध्यंतरा पर्यंत सामना अत्यंत चुरशीने खेळला गेला. विश्रांतीला २४-२२ अशी अवघ्या २ गुणांची आघाडी महाराष्ट्र संघाकडे होती. विश्रांती नंतर मात्र महाराष्ट्राने टॉप गिअर टाकत गुणांचे अर्धशतक गाठले. दुसऱ्या डावात महाराष्ट्राने २६ गुण, तर दिल्लीने अवघ्या १५ गुणांची कमाई केली. महाराष्ट्राने १३ गुणांनी बाजी मारली. आदित्य शिंदे, असलम इनामदार, अजित चौहान यांच्या झंझावाती चढायांना दादासो पुजारी, संकेत सावंत, जयेश महाजन यांची मिळालेली बचावाची साथ यामुळे हा विजय शक्य झाला.

# नवगाव मराठा समाज क्रिकेट चषकाचा श्री गणेश कळंबोली विजेता

| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |

सुधागड रोहा नवगाव मराठा समाज सेवा संस्था यांच्या वतीने मर्यादित षटकांचे ओव्हर आर्म क्रिकेटच्या खुल्या सामन्याचे आयोजन २१ व २२ फेब्रुवारी रोजी हंडेवाडी येथे करण्यात आले होते.

या दोन दिवसीय स्पर्धेत पहिल्या दिवशी नवगाव मराठा समाज मधील १२ संघ तर दुसऱ्या दिवशी नवगाव समाजा व्यतिरिक्त बाहेरील १२ संघाना प्रवेश देण्यात आला होता. ही संपूर्ण स्पर्धा खेळीमेळीच्या वातावरणात दिमाखदार पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्व संघ तसेच नवगाव मराठा समाजातील सदस्यांनी मोलाचे सहकार्य करण्यात आले.



या स्पर्धेततील अंतिम लढत कळंबोली विरुद्ध आंबोलेवाडी या संघात झाली या लढतीत श्री गणेश कळंबोली संघ हा प्रथम क्रमाकांचा मानकरी ठरला.

या संघास रोख रक्कम ५१ हजार रु. व आकर्षक चषक तर द्वितीय क्रमांकाचा मानकरी ठरला. शिवशंभो इलेव्हन आंबोलेवाडी या संघास रोख रक्कम ३१ हजार रु. व आकर्षक चषक, तृतीय क्रमांक सिद्धेश्वर रोख रक्कम २१ हजार रु. व आकर्षक चषक,चतुर्थ क्रमांक श्री जय शिवराय दिघेवाडी रोख रक्कम ११ हजार रु. व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेतील सामनावीर नयनेश पवार, उत्कृष्ट फलंदाज आकाश काटकर, उत्कृष्ट गोलंदाज आयुष्य मेहता, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक सोहम चोरघे या खेळाडूंना आकर्षक बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले.

# रणजी फायनलच्या पहिल्याच दिवशी वाद

| मुंबई| प्रतिनिधी |

कर्णधार पारस डोगरा याने बुधवारी अर्धशतकी खेळी केली खरी; पण कर्नाटकचा बदली खेळाडू के. व्ही अनीश याला जाणूनबुजून ढुशी दिल्यामुळे दमदार जम्मू-काश्मीरच्या फलंदाजीला गालबोट लागले. जम्मू-काश्मीरने कर्नाटकविरुद्धच्या रणजी करंडक अंतिम सामन्याच्या दुसऱ्या दिवसअखेरीस सहा बाद ५२७ धावा केल्या आहेत.



डोगरासह यष्टीरक्षक-फलंदाज कन्हैया वाधवान, साहिल लोत्रा यांनीही भरीव योगदान दिल्याने कर्नाटकच्या गोलंदाजांचा घाम निघाला होता. फक्त प्रसिध कृष्णा (२९ षटकांत ९० धावांत तीन विकेट) हाच प्रभावी ठरला. मात्र, २१ रणजी मोसमांचा दांडगा अनुभव असणाऱ्या पारस डोगरा याच्या वर्तनाने साऱ्यांनाच चकित केले. प्रसिधच्या चेंडूवर एक चौकार लगावल्यानंतर त्याने सिली पॉइंट वरील क्षेत्ररक्षक अनीशला ढुशी मारली.

डोगराने आधी अनीशशी वाद घातला आणि नंतर त्याच्या हेल्मेटला डोक्याने टक्कर दिला. यानंतर कर्नाटकचा वरिष्ठ खेळाडू मयंक अगरवाल याने मध्यस्थी करत डोगराला थांबवले. अगरवाल-डोगरा यांच्यातील संवादानंतर मैदानातील पंच रोहन पंडित आणि उल्हास गंधे यांनीही मध्यस्थी केली. काही वेळानंतर कर्नाटकचा कर्णधार देवदत्त पडिक्कल यानेही पंचांकडे दाद मागत डोगराची तक्रार केली.

संबंधित प्रकाराबद्दल दंड म्हणून डोगरा याच्या सामन्याच्या मानधनातून ५० टक्के रक्कम कापून घेण्यात येऊ शकते. भारतीय क्रिकेट बोर्डाचे सामनाधिकारी नारायणन कुट्टी यांच्याकडून दंडाची अधिकृत घोषणा सामना संपल्यानंतरच होईल.

जम्मू काश्मीरची पहिल्या दोन दिवसांतील फलंदाजी पाहून १९८१-८२च्या दिल्ली-कर्नाटक सामन्याची आठवण होत आहे. त्या सामन्यात कर्नाटकने रॉजर बिन्नी, ब्रिजेश पटेल, सईद किरमाणी, रणजीत खानविलकर यांच्या शतकामुळे ७०५ धावा केल्या होत्या.

गुरशरण सिंग, मोहिंदर अमरनाथ यांचे शतक तसेच राजेश शुक्ला आणि राजेश पीटर यांनी नवव्या विकेटसाठी केलेल्या ११८ धावांच्या नाबाद भागीदारीमुळे दिल्लीने सहाव्या दिवशी पहिल्या डावात निर्णायक आघाडी घेत विजेतेपद जिंकले होते.

# रिंकूची वर्ल्ड कप स्पर्धेतून माघार?

| मुंबई | प्रतिनिधी|

भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातला ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेतील सुपर ८ चा सामना गुरुवारी चेन्नईत होणार आहे. या सामन्यासाठी काल भारतीय खेळाडूंनी कसून सराव केला, परंतु या सराव सत्रात रिंकू सिंग कुठेच दिसला नाही. रिंकूच्या वडिलांना कर्करोग झाला आहे आणि त्यांच्यावर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती बिघडल्याने रिंकूला तातडीने दिल्लीला जावे लागले. आता रिंकू पुन्हा वर्ल्ड कपसाठी मैदानावर येईल का, याबाबतचे अपडेट्स समोर आले आहेत. भारतीय संघाचे फलंदाज प्रशिक्षक सितांशू कोटक यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे.




रिंकूचे वडील लिवर कॅन्सरशी झुंज देत आहेत आणि प्रकृती बिघडल्यानं त्यांना रुग्णालयात दाखल केल गेलं आहे. ते सध्या व्हेंटिलेटर सपोर्टवर आहेत. रिंकू मंगळवारी चेन्नईहून दिल्लीला दाखल झाला आणि सध्या तो ग्रेटर नोएडात वडिलांवर उपचार सुरू असलेल्या रुग्णालयात आहे. कोटक यांनी आज झालेल्या पत्रकार परिषदेत रिंकूच्या उपलब्धतेबाबत महत्त्वाचे अपडेट्स दिले.

रिंकूच्या वडिलांची प्रकृती फार चांगली नाही. पण, तो आज संध्याकाळपर्यंत भारतीय संघाच्या ताफ्यात दाखल होईल, असे कोटक यांनी सांगितले.

# मेवेदर आणि पॅकियाओ यांच्यातील ऐतिहासिक री-मॅच सप्टेंबरमध्ये

## दोन्ही दिग्गज बॉक्सर पुन्हा एकदा आमनेसामने येणार



| लास वेगास | वृत्तसंस्था |

बॉक्सिंग जगातील दोन सर्वात मोठे दिग्गज, फ्लॉयड मेवेदर जूनियर आणि मॅनी पॅकियाओ, पुन्हा एकदा प्रोफेशनल रिंगमध्ये आमनेसामने येणार आहेत.

या ऐतिहासिक री-मॅचची घोषणा करण्यात आली आहे, जी १९ सप्टेंबर रोजी लास वेगासमधील अत्याधुनिक द स्फीअर येथे होईल.

दोन्ही खेळाडू ११ वर्षांनंतर पुन्हा एकदा आमनेसामने येतील. यापूर्वी २ मे २०१५ रोजी झालेल्या त्यांच्या पहिल्या लढतीने कमाई आणि प्रेक्षकसंख्येचे सर्व विक्रम मोडले होते.

त्या लढतीतून ४१० दशलक्ष डॉलर महसूल मिळाला होता, तर तिकीट विक्रीतून ७२.२ दशलक्ष डॉलर कमाई झाली होती. तो सामना मेवेदरने जिंकला होता.

अमेरिकेच्यामेवेदरनेनुकतीच रिंगमध्ये परतण्याची पुष्टी केली. ४९ वर्षीय मेवेदर २०१७ मध्ये कॉनर मॅकग्रेगरला हरवून ५०-० च्या निर्दोष विक्रमासह निवृत्त झाले होते. तर, फिलिपिन्सच्या ४७ वर्षीय पॅकियाओने देखील २०२५ मध्ये मारिओ बॅरिओस विरुद्ध ड्रॉ खेळून रिंगमध्ये वापसी केली आहे. त्यांनी कारकिर्दीत ७३ पैकी ६२ लढाया जिंकल्या आहेत.

## पॉवरप्लेमध्ये प्रभावी गोलंदाज | पहिल्या षटकात सर्वाधिक विकेट्स नावावर

# शाहीन आफ्रिदीने मोडला रबाडाचा वर्ल्ड रेकॉर्ड


| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

इंग्लंडनेपाकिस्तानला २ विकेट्सने पराभूत करत सेमीफायनलमध्ये धडक मारली आहे. यासह आता पाकिस्तान संघावर स्पर्धेबाहेर होण्याचं सावट आहे. पण पाकिस्तानने इंग्लंडला या सामन्यात चांगलीच टक्कर दिली होती. याच श्रेय गोलंदाज शाहीन आफ्रिदीला जातं. शाहीन आफ्रिदीने पाकिस्तानला दणक्यात सुरूवात करून दिली होती. इंग्लंडविरूद्ध सामन्यात शाहीन आफ्रिदी आपल्या नेहमीच्या फॉर्मात दिसला. या कामगिरीसह शाहीनने मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे.

इंग्लंडचा संघ पाकिस्तानने दिलेल्या १६५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी मैदानावर उतरला, पण शाहीन आफ्रिदीने इंग्लंडच्या फलंदाजांना फार काळ मैदानावर टिकू दिलं नाही. यादरम्यान इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रुक मात्र पाकिस्तानला भारी पडला आणि त्याने संघाला सहज विजय मिळवून दिला. पण शाहीन आफ्रिदीने इतर फलंदाजांना पळता भुई थोडी केली.




सेमीफायनलमध्ये पोहोचण्याचे लक्ष्य ठेवून उतरलेल्या इंग्लंडला शाहीनने पॉवरप्लेमध्येच दणके दिले. त्याने पहिल्याच चेंडूने सुरुवात केली. इंग्लंडविरुद्ध पहिलं षटक टाकण्यासाठी आला आणि पहिल्याच चेंडूवर फिल सॉल्टची विकेट घेतली. टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये पहिल्या चेंडूवर सर्वाधिक विकेट्स घेण्याचा विक्रम त्याच्या नावावर होता आणि आता त्यात भर घातली आहे. टी-२० विश्वचषकात पहिल्या षटकात सर्वाधिक विकेट्स घेणारा तो गोलंदाजही आहे.




शाहीन आफ्रिदी दुसरं षटक टाकण्यासाठी आला आणि बटलरची विकेट घेतली. शाहीनने पॉवरप्लेमध्ये तिसरं षटक टाकलं आणि जेकब बेथेलला बाद केलं. यासह त्याने पॉवरप्लेमधील ३ षटकांत १३ धावा देत तीन विकेट्स घेतल्या. पॉवरप्लेमध्ये इंग्लंडने फक्त ३५ धावांत तिन्ही विकेटस गमावल्या आणि त्यांची सुरुवात खराब झाली. पण ब्रुकने संघाचा डाव सावरला आणि त्याने शतकी खेळी केली. शतक केल्यानंतर शाहीनने त्याच्या स्पेलमधील चौथ्या षटकातही ब्रुकला क्लीन बोल्ड करत विकेट मिळवली. पॉवरप्लेमध्ये तीन विकेट्स घेत शाहीन शाह आफ्रिदीने कागिसो रबाडाचा विश्वविक्रम मोडला. तो आता पुरुषांच्या टी-२० विश्वचषकात पॉवरप्लेमध्ये सर्वाधिक विकेट्स घेणारा गोलंदाज बनला आहे. इंग्लंडविरुद्धच्या सामन्यापूर्वी शाहीन शाह आफ्रिदीने पॉवरप्लेमध्ये १५ विकेट्स घेतल्या होत्या. कागिसो रबाडाच्या नावावर १६ विकेट्ससह विश्वविक्रम होता. पण, इंग्लंडविरुद्ध तीन विकेट्स घेतल्यानंतर, शाहीनच्या टी- २० विश्वचषकातील पॉवरप्लेमध्ये आता १८ विकेट्स झाल्या आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)